# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# भारतीय राष्ट्रवादाचा उदय

(१८५८-१९०५)

## (Rise of Nationalism in India)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

**एम. ए. भाग-१**

**इतिहास**

HIST-108 (Optional Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग - १ करिता (भारतीय राष्ट्रवादाचा उदय)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-938801-3-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ इतिहास समन्वय समिती ■

अध्यक्ष - **प्राचार्य ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
| --- | --- |
| **प्रा. डॉ. डी. पी. खराडे**<br>बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी | १ |
| **डॉ. ऋतूजा व्ही. खोत**<br>माजी प्राध्यापक, एन. डी. पाटील नाईट कॉलेज, सांगली. | २ |
| **प्रा. श्रीधर भाऊसाहेब शिंदे**<br>मिरज महाविद्यालय, मिरज | ३ |
| **प्रा. आप्पासाहेब नामदेव केंगार**<br>बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. डी. पी. खराडे**
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१७-१८ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''**भारतीय राष्ट्रवादाचा उदय**'' या विषयाचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१८-१९ या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

भारतीय राष्ट्रवादाचा उदय या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये राष्ट्रवाद, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना, प्रारंभीचा राष्ट्रवाद, जहालमतवादी इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे.

शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे सर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूर शिक्षण केंद्र संचालक, समन्वयक, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. अवनिश पाटील, शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूर शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. डी. पी. खराडे**

बाळासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**

इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अबंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | राष्ट्रवाद | १ |
| २. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना | १८ |
| ३. | प्रारंभीचा राष्ट्रवाद | ४२ |
| ४. | जहालमतवादी | ५८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# राष्ट्रवाद

## (अ) राष्ट्रवाद – संकल्पना
## (ब) भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन
## (क) भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाची कारणे


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ 'राष्ट्रवाद' संकल्पना

  १.२.२ भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन

  १.२.३ भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाची कारणे

१.३ पारिभाषिक शब्द

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सारांश

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


### १.० उद्दिष्टे

- भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील आधारभूत मूल्ये समजतील.
- राष्ट्रवाद ही संकल्पना समजेल.
- भारतीय राष्ट्रवादाचा विकास कसा झाला ? याची माहिती होईल.
- सर्व समावेशक भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखनाची कल्पना येईल.
- राष्ट्रवादाच्या विविध व्याख्या समजतील.
- राष्ट्र-राज्य, राष्ट्र, राष्ट्रीयत्व या संकल्पना स्पष्ट होतील.

## १.१ प्रास्ताविक

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि विकास होऊ लागला. ब्रिटीश सत्तेविरुद्ध जनतेच्या मनामध्ये असंतोष निर्माण होऊन त्याचा परिणाम म्हणजे आपण पारतंत्र्यात असून आपण पारतंत्र्यातून मुक्त होऊन स्वतःचे एक राष्ट्र, सरकार स्थापन केले पाहिजे. त्यासाठी ब्रिटिशांना प्रथम भारतातून घालवून दिले पाहिजे अशी जाणिव जनतेमध्ये होऊ लागली. जनतेमध्ये निर्माण होणारी राष्ट्रवादाची भावना ब्रिटिशांना आवडणारी नव्हती. त्यांनी भारतीयांमध्ये निर्माण होणाऱ्या राष्ट्रवादी भावनेला विरोध करण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर लिखाण केले. कुपलँड हा अधिकारी म्हणतो "Indian Nationalism was the child of the British Raj, and the British authorities blassed its cradle." थोडक्यात त्याच्या मतानुसार 'भारतीय राष्ट्रवाद इंग्रज सत्तेचे अपत्य आहे' अशीच भूमिका जॉन स्ट्रॅचीने केंब्रिज विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांसमोर बोलताना घेतली होती. तो म्हणतो, ''भारतासंबंधी सर्वप्रथम व सर्वात आवश्यक जाणून घेण्यासारखी गोष्ट म्हणजे 'भारत' अस्तित्वात नाही आणि कधीही नव्हता.'' याच्याही पुढे जाऊन त्याने असे भाकीतही केले की, ''भारत कधीही एक राष्ट्र बनणार नाही'' (India will never become a United Nation) ब्रिटिशांच्या या वैचारिक मांडणीला विरोध करण्यासाठी सुशिक्षित भारतीय आपल्या गौरवशाली इतिहासाकडे वळले आणि त्यातून भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखनाला सुरुवात झाली.

ब्रिटिशांच्या सामाजिक-आर्थिक धोरणांमुळे तसेच त्यांनी येथे निर्माण केलेली आधुनिक व्यवस्थेमुळे भारतीय राष्ट्रवादाच्या उदयास चालना मिळाली.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ 'राष्ट्रवाद' संकल्पना

**प्रास्ताविक**

राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद या संकल्पना परस्परांशी संलग्न आहेत. विशिष्ट भू-प्रदेशात कायमस्वरुपी वस्ती करून राहणाऱ्या लोकांचा समुदाय जेव्हा सार्वभौम सरकार स्थापन करतो, तेव्हा त्यास राज्य म्हणतात. अशा राज्यातील लोकांना आपल्या प्रदेशाविषयी प्रेम, अभिमान वाटतो तेव्हा त्यास 'राष्ट्र' असे म्हणतात. राष्ट्राविषयी प्रेम, निष्ठा, अभिमान असणे यास राष्ट्रीयत्वाची भावना म्हणतात.

**राष्ट्र (Nation)**

राष्ट्र या संकल्पनेचा उदय युरोपमध्ये झाला. राष्ट्र या शब्दाला इंग्रजी भाषेत Nation हा शब्द आहे. Nation हा शब्द Natus (जन्म/वंश) या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. Natus किंवा Natio या अर्थ एकाच वंशात जन्मलेले लोक राष्ट्र निर्माण करू शकतात.

**व्याख्या**

'राष्ट्र' या संकल्पनेच्या विविध विचारवंतानी विविध व्याख्या केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

**१. प्रा गार्नर :**

राष्ट्र म्हणजे सांस्कृतिक एकता असलेला समूह होय. अशा समूहातील लोक आपल्या वैचारिक व मानसिक जीवनाची व आचारांची एकता टिकविण्याचा जागरूकतेने व चिकाटीने प्रयत्न करतात.

**२. बर्जेस :**

राष्ट्र म्हणजे भौगोलिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र म्हणतात.

**३. लिकॉक :**

वांशिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र असे म्हणतात.

**४. एम. हॅसर :**

समान भाषा किंवा समान वंश यामुळे नव्हे, तर लोकांच्या एकत्रित राहण्याच्या इच्छेतून राष्ट्र निर्माण होते.

**५. हॅन्स कोहोन :**

राष्ट्र म्हणजे निश्चित अशा भूप्रदेशावर वास्तव्य करणारा लोकसमुदाय की जो स्वतःस स्वतंत्र सार्वभौम सत्ताधारी राज्यात परावर्तित करण्याची इच्छा बाळगतो. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत कार्य करतो आणि आपण सर्व एक आहोत अशी समान भावना बाळगतो.

**राष्ट्रीयत्वाचे मुख्य घटक**

**१. भौगोलिक एकता**

समान भूप्रदेश व भौगोलिक समिपता ही तेथे राहणाऱ्या लोकांमध्ये एकत्वाची भावना निर्माण करते. जगातील बहुतेक राष्ट्रे भौगोलिक एकतेतून निर्माण झाली आहेत.

**२. समान ऐतिहासिक पार्श्वभूमी**

ज्या लोकांचा इतिहास स्फूर्तिदायी असतो, असा इतिहास तेथील लोकांत एकात्मतेची भावना जागृत करण्यास कारणीभूत ठरतो.

राष्ट्रीयत्वाचे मुख्य घटक :

- भौगोलिक एकता
- समान ऐतिहासिक पार्श्वभूमी
- समान हितसंबंध
- समान वंश
- समान भाषा
- समान धर्म
- समान संस्कृती
- समान राजकीय उद्दिष्टे
- समान आदर्श
- स्व-राज्य

**३. समान हितसंबंध**

लोकांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक हितसंबंध समान असतील, तर असे लोक सहजपणे एक होऊ शकतात.

**४. समान वंश**

एकाच वंशाचे लोक नैसर्गिकदृष्ट्या फार लवकर एकत्र येतात व त्यांच्यात एकतेची भावना प्रबळ असते.

**५. समान भाषा**

विचारांचे, भावनांचे आदान-प्रदान होण्यासाठी भाषा हे प्रभावी साधन आहे. त्याचा वापर राष्ट्रभावनेसाठी केला जातो.

**६. समान धर्म**

धर्म ही मानवी जीवनाच्या जडणघडणीतील सर्वात प्रभावी घटक आहे. समान धर्मियांनी आपल्या स्वतंत्र राष्ट्रनिर्मितीसाठी युद्धे लढली. हौतात्म्य पत्करले. मात्र धार्मिक आधारावर राष्ट्रांची झालेली निर्मिती पुढे प्रगतीला अडसर ठरलेली आहे. उदा. पाकिस्तान, इराक....

**७. समान संस्कृती**

संस्कृती हा घटक लोकसमुदायाला एकत्र आणणारा फार मोठा आधार आहे. ही एकता कायम राखण्यासाठी संस्कृतीच्या ठेव्याचे जतन केले जाते.

**८. समान राजकीय उद्दिष्टे**

एकाच राजकीय उद्दिष्टातून राष्ट्रीयत्व निर्माण होते. जगाच्या इतिहासात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी या समान राजकीय उद्दिष्टासाठी विभिन्न लोकसमुदायात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**९. समान आदर्श**

राष्ट्रीयत्वाची ज्योत सतत धगधगती राहण्यासाठी त्या त्या राष्ट्रातील थोर व्यक्तींची चरित्रे, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज ही प्रतिके राष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी महत्त्वाची आहेत.

**१०. स्वराज्य**

लोकांना एकत्र ठेवण्यास स्वराज्य उपयुक्त ठरते. पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी झालेले संघर्ष राष्ट्रभवनेचे द्योतक असतात.

**✤ भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे**

**१. प्रेरणा–प्रतिक्रिया संघर्ष**

परंपरागत भारतीय इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रवादाची वाढ म्हणजे इंग्रजांच्या संस्था, साधनसामग्री आणि संधीमुळे मिळालेल्या प्रेरणेने झालेल्या भारतीय प्रतिक्रियेचा परिणाम म्हटले आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास काही मर्यादेपर्यंत त्याची प्रतिक्रिया ह्यांचा परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रवाद.

**२. ब्रिटिश सत्तेचा प्रभाव :**

ब्रिटिश शासकांनी भारतावर आपली पकड मजबूत करण्यासाठी भारतीयांचे सर्वच क्षेत्रात शोषण करण्याचे आणि आधुनिक पद्धतीचे बदल करण्याचे धोरण अवलंबले. त्यांनी प्रशासनाचे आधुनिकीकरण घडवून आणले. परिणामी राष्ट्रवादाला चालना मिळाली.

**३. भारताचे राजकीय ऐक्य**

ब्रिटिश सत्तेचे संपूर्ण भारतावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नियंत्रण होते. इंग्रजी सत्तेने संपूर्ण भारतावर राजकीय ऐक्य लादले. एकच सत्ता, समान कायदेव्यवस्था, एकच प्रशासनव्यवस्था यामुळे भारत एकछत्री अमलाखाली आणला. ब्रिटिशांनी भारताचा बहुतेक भाग एका राजकीय व्यवस्थेअंतर्गत ठेवून सर्व प्रदेशांमध्ये एककेंद्री व एकसंघ प्रशासन व्यवस्था निर्माण केली. परिणामी भारतीयांमध्ये 'एकता' व 'राष्ट्राभिमानाची' भावना निर्माण झाली.

**४. इंग्रजी शिक्षणाचा परिणाम**

इंग्रजांनी आपल्या प्रशासनाच्या सोयीसाठी इंग्रजी शिक्षण देण्याचे धोरण स्वीकारून शाळा सुरू केल्या. भारतीय तरुणांची पाश्चात्त्य जगताशी ओळख होऊन त्यांना स्वातंत्र्य, लोकशाही, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीयता या संकल्पनांची तोंडओळख झाली. शिवाय सर्व भारतीयांना संपर्क भाषा म्हणून इंग्रजीचे महत्त्व समजून आले.

त्याचा त्यांनी राष्ट्रप्रेम प्रसारासाठी वापर केला. इंग्रजी भाषेमुळे भारतीय लोक पाश्चात्य राजकीय विचारवंत बर्क, लॉक, मिल, रुसो व व्हॉल्टेअर यांचे साहित्य वाचू लागले. त्यातून त्यांना राष्ट्रवाद, लोकशाही, स्वयं-शासनाबद्दलची माहिती झाली. तसेच त्यांनी इटली-जर्मनीच्या एकीकरणाबद्दलच्या चळवळीचाही अभ्यास केला. परिणामी त्यांना स्वतःच्या देशाच्या मुक्तीसाठी लढा देण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

**५. दळणवळण आणि संचार साधनांचा विकास**

दळणवळणाच्या साधनातून संपूर्ण भारतातील प्रांत एकमेकांशी जोडले गेले. भारतात १८५३ नंतर रेल्वेरूळ टाकण्याचे काम सुरू झाले. १८५० नंतर सुरू झालेल्या डाक व्यवस्थेने तसेच विजेच्या तारायंत्राने संपूर्ण देशाला जोडण्याचे कार्य केले. यामुळे देशाच्या एका भागातून दुसऱ्या भागात माहितीचे आदान-प्रदान सहज करता येऊ लागले. लोकांना एकमेकाशी सहज संपर्क साधता येऊ लागल्याने एकता निर्माण होण्यास मदत होऊन राष्ट्रवादी भावना उदयास येऊ लागली. परिणामी राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण झाली.

**६. वर्तमानपत्रांचा उदय**

युरापियनांनीच भारतात छापखाना सुरू केला. त्यातून भारतीय वृत्तपत्रांचा विकास झाला. भारतात १८७७ पर्यंत भारतीय वृत्तपत्रांची संख्या १६९ पर्यंत होती. या वर्तमानपत्रांनी राष्ट्रवादाच्या प्रसारात व जनमत तयार करण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली. उदा. इंडियन मिरर, रास्तगोफ्तार, अमृत बझार पत्रिका, दर्पण, मराठा, केसरी या वर्तमानपत्रांनी लोकांमध्ये राष्ट्रीय भावना, चैतन्य निर्माण केले.

**७. ऐतिहासिक संशोधनाचा प्रभाव**

विलियम जोन्स, मॅक्समुल्लर ह्या पाश्चात्त्य विद्वानांनी प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करून भारताची समृद्ध संस्कृती जगासमोर आणली. तसेच युरोपियन विद्वानांनी असा सिद्धांत मांडला की, ''भारतातील आर्यांचा व युरोपियनांचा मूळ मानववंश एकच आहे.'' त्यामुळे सुशिक्षित भारतीयांमध्ये एक आत्मविश्वास निर्माण होऊन राष्ट्रवादाला चालना मिळाली.

**८. सामाजिक व धार्मिक चळवळी**

१९व्या शतकात भारतात सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळीस सुरुवात झाली. त्यांनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या आधारे आपल्या धार्मिक श्रद्धा, चाली-रिती तपासून पाहण्यास सुरुवात केली. त्यातूनच प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज, आर्य समाज यांसारख्या समाजाची स्थापना करण्यात आली. त्यांनी समाजात वैज्ञानिकता आणून राष्ट्रवाद निर्माण करण्यास सुरुवात केली. राजा राममोहन रॉय, स्वा. दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद या सुधारकांनी हिंदू समाज व धर्म सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अंधविश्वास, कर्मकांड दूर करून लोकांमध्ये ऐक्य तर्कसंगत व वैज्ञानिकु विचार, महिला सक्षमीकरण व देशभक्तीचे प्रेम पसरविले.

### ९. वंशवाद

ब्रिटिशकाळात वंशवादाचा हत्यार म्हणून वापर केला जात होता. येथील सर्व प्रशासन व्यवस्था, सोई-सवलती फक्त 'गोऱ्या ब्रिटिशांसाठीच' राबविण्यात येत होत्या. न्याय व्यवस्थेमध्ये गोऱ्यांसाठी स्वतंत्र यंत्रणा राबविण्यात आली होती. हिंदी लोकांना ब्रिटिश अधिकारी, कर्मचारी अती नीचपणे वागवीत होते. पदोपदी त्यांचा अपमान करीत होते. त्यामुळे हिंदी लोकांमध्ये ब्रिटिशांविषयी अत्यंत द्वेषाची भावना निर्माण झाली.

### १०. पाश्चात्य विचारवंतांचे प्रभावी तत्त्वज्ञान

इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांची पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाशी ओळख झाली. रुसाचे 'सार्वभौमत्वाचे तत्त्व', माँटेस्क्यूचा 'सत्ताविभाजनाचा सिद्धांत', लॉक, हॉब्ज यांचा 'सामाजिक करार सिद्धांत', कार्ल मार्क्सचे 'साम्यवादी तत्त्वज्ञान' यासारख्या अनेक तत्त्ववेत्त्यांच्या विचारांची ओळख होऊन राष्ट्रवादी भावना निर्माण होण्यास पोषक अशी पार्श्वभूमी आणि मनोभूमिका तयार झाली.

### ११. लिटनची दडपशाही

लॉर्ड लिटन १८७६ ते १८८० या काळात भारताचा गव्हर्नर जनरल होता. त्याने आपल्या काळात दडपशाहीचे धोरण स्वीकारले. १८७८ ला 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' व 'आर्म्स ॲक्ट' हे कायदे करून व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणण्याचा त्याने प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर त्याने मँचेस्टरहून येणाऱ्या कापडावरील आयात कर कमी करून देशी कापड उद्योग बुडविला. यामुळे त्याच्या विरोधात लोकमत होऊन राष्ट्रभावना वाढीस लागली.

### १२. इल्बर्ट विधेयकावरील वाद :

लिटन नंतर आलेल्या ग. ज. रिपनने लिटनचे दडपशाहीचे कायदे रद्द केले. त्याने न्यायव्यवस्थेमधील पक्षपातीपणा दूर करण्यासाठी तत्कालीन कायदा सल्लागार इलबर्ट यास न्यायालयनी भेदभाव दूर करण्यासाठी विधेयक मांडण्यास सांगितले. या विधयकानुसार हिंदी न्यायाधिशांना युरोपियन गुन्हेगारासंबंधी खटला चालविण्यास परवानगी मिळणार होती. पण हा आपला अपमान झाल्याची भावना युरोपियनांनी करून त्यांनी या विधेयकास विरोध करण्यासाठी 'युरोपियन डिफेन्स असोसिएशन' स्थापना केली. या विधेयकाविरुद्ध इंग्रजांनी केलेला युक्तिवाद भारतीयांचे डोळे उघडणारे होता तसेच सुशिक्षित भारतीयांसाठी ब्रिटिश वसाहतीचे खरे स्वरूप दाखवणारा होता.

अशा प्रकारे वरील सर्व कारणांमुळे आपण सर्व एक आहोत. आपल्या सर्वांचा देश, संस्कृती समान आहे, एक आहे ही भावना हिंदी लोकांमध्ये निर्माण होऊन हिंदी राष्ट्रवादाचा उदय झाला.

## भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन

१९३० सालापर्यंत स्वदेशी व परकीय इतिहासकारांनी 'आधुनिक भारत' या विषयाकडे दुर्लक्ष केले. परंतु नंतर मात्र आधुनिक भारताविषयी विविध पैलू समोर येऊ लागले. प्रशासकीय अधिकारी, केंब्रिज व ऑक्सफर्ड

विद्यापीठामधील संशोधक यांनी भारतीय इतिहासासंबंधी लिखाण करण्यास सुरुवात केली. भारतीय संस्कृती व भाषा यांची त्यांना पूर्ण कल्पना नसल्याने त्यांच्या लिखाणात काही चुका झाल्या. त्या चुका दुरुस्त करण्याचे काम भारतीय इतिहासकारांनी केले. त्यामध्ये के. पी. जयस्वाल, आर. सी. मुजूमदार, एस. एन. सेन, ताराचंद यासारख्या अनेक इतिहासकारांचा समावेश होता.

१९व्या शतकात राष्ट्रवाद ही संकल्पना आशिया, आफ्रिका खंडात निर्माण झाली. साम्राज्यवाद वसाहतवादाच्या विरोधात जागृतीतून राष्ट्रवादाचा उदय झाला.

**राष्ट्रवादी इतिहासलेखन व भारत**

राष्ट्रवादी विचार, इतिहासलेखन राष्ट्रीय प्रगतीस पोषक असतो. या इतिहासलेखनातून धर्म, भाषा, संस्कृती, समाज, राष्ट्रनिष्ठा, समर्पण, त्याग, बलिदान इत्यादींची जपणूक केली जाऊ शकते.

**उद्दिष्टे**

१. भारतीय इतिहास व संस्कृतीवर परकियांनी केलेल्या दोषारोपणाचे खंडन करणे.

२. परकीय इतिहासकारांच्या लिखाणातून प्रस्तुत झालेले गैरसमज दूर करणे.

३. भारतीयांमध्ये निर्माण झालेला न्यूनगंड दूर करणे.

४. उपलब्ध साधनांचे पुनः परीक्षण व पुनर्मूल्यांकन करणे.

**साम्राज्यवाद्यांच्या विरोधी भूमिका**

राष्ट्रवादी इतिहासकारांनी प्रथम साम्राज्यवादी विचारसरणीला विधो केला. त्यांनी भारत कधीही राष्ट्र नाही तर जात, धर्म, पंथ, भाषा यांच्यात विभागलेला आहे. थोडक्यात, साम्राज्यवादाला पूरक इतिहासाचे लिखाण भारताच्या संदर्भात केले गेले. राष्ट्रवादी इतिहासलेखनाची दृष्टी ही साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या प्रतिविरोधी भावनेतून पुढे आली.

**राष्ट्रवादी इतिहासलेखन निर्मितीसाठी संस्था आणि संशोधन पत्रिकेची निर्मिती**

१९व्या शतकाच्या अखेरीला राष्ट्रवादीला प्राधान्य देणाऱ्या इतिहास लेखनाच्या उद्देशाने काही संस्था आणि त्यांच्या द्वारा संशोधन पत्रिकांची सुरुवात करण्यात आली. उदा. बंकिमचंद्रकृत 'ऐतिहासिक चित्र-१८९९', के. एन. सेन कृत 'काव्येतिहास संग्रह-१९७८', पुणे येथे १९१० साली स्थापन करण्यात आलेले 'भारत इतिहास संशोधन मंडळ'.

**स्वातंत्र्य लढ्यास पूरक लिखाण**

१९व्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीय भावनांना संस्कृती, धर्म, समाज, यांना प्राधान्यक्रम देणारे इतिहास-लेखन झाले. त्यांनी आपला गौरवमय इतिहास जनतेसमोर मांडून आपल्या पारतंत्र्याची जाणीव जनतेस करून दिली.

**आर्थिक-राष्ट्रीय प्रवाह**

ब्रिटीश भारताचे आर्थिक शोषण कसे करत आहेत यावर प्रथम दादाभाई नौरोजी यांनी 'Poverty and Un-British Rules in India' या ग्रंथातून आर्थिक निःसारणाचा सिद्धांत मांडून प्रकाश टाकला. यातून आर्थिक राष्ट्रवादाचा उदय झाला. पुढे रजनी पामदत्त यांचा 'India Today' आणि एम. जी. रानडे यांचा 'Essays in Indian Economics' या ग्रंथांनाही आर्थिक राष्ट्रवादाच्या विकासास हातभार लावला.

**राष्ट्रवादी इतिहासलेखकांनी केलेली इतिहासाची पुनर्मांडणी**

**(अ) प्राचीन भारताचे अभ्यासक, इतिहासकार**

**१. काशी प्रसाद जयस्वाल**

यांचा जन्म १८८१ मध्ये उत्तर प्रदेशात झाला. त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून कायद्याची पदवी घेऊन कलकत्ता उच्च न्यायालयात वकिली केली. त्यांन प्राचीन भारतीय इतिहासावर साम्राज्यवादी इतिहासकारांनी जे आरोप केले होते त्यांचे 'Hindu Polity' आणि 'History of India' या दोन ग्रंथातून खंडन केले.

**२. राधा कुमुद मुखर्जी**

त्यांनी Local Self-government in Ancient India, Ancient Indian Education, The Fundamental Unity of India, The Gupta Empire इत्यादी महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. यातून त्यांनी प्राचीन भारतीय लोक दैवी दृष्टीवर विश्वास ठेवणारे होते, त्यांनी कोणतीही भौतिक किंवा शास्त्रीय प्रगती केली नाही हे ब्रिटीश इतिहासकारांचे आरोप कसे चुकीचे आहेत हे दाखवून दिले.

**३. डॉ. रा. गो. भांडारकर**

भांडारकर यांनी संस्कृत, प्राकृत व इंग्रजी भाषा तसेच तत्त्वज्ञान व धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. The Early History of the Dekken & A peep into the early History of India हे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. त्यांनी उपलब्ध ऐतिहासिक साधनांचा चिकित्सक विश्लेषण करून, वस्तुनिष्ठ व संतुलित वृत्तीने निष्कर्ष काढून ते सोप्या परंतु परिणामकारक भाषेत शब्दबद्ध करण्याचा शास्त्रीय इतिहासलेखन प्रवाह रूढ केला.

**४. डॉ. ए. एस. आळतेकर**

आळतेकर हे प्राचीन भारतावर लिखाण करणारे अभ्यासक व प्राध्यापक होते. ते काशी प्रसाद जयस्वाल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक झाले. त्यांनी Education in Ancient India या ग्रंथाद्वारे शैक्षणिक क्षेत्रात पाश्चात्त्यांच्या तुलनेत प्राचीन भारत मागासलेला होता हा आरोप त्यांनी दूर केला. मनुस्मृती, शुक्रनीती, अर्थशास्त्र, बौद्ध वाङ्मय यांचा सूक्ष्म अभ्यास करून येथे गणराज्ये व प्रतिनिधी गृहे होती, राज्यसत्तेचे वेगवेगळे सिद्धांत प्रचलित होते हे त्यांनी साधार सिद्ध केले.

### (ब) मध्ययुगीन भारताचे इतिहासकार

#### १. डॉ. महंमद हबीब

वस्तुनिष्ठ व निधर्मी दृष्टीकोनातून भारतातील मुस्लीम शासनाचा अभ्यास करणारे इतिहासकार म्हणून डॉ. हबीब ओळखले जातात. त्यांनी संशोधनासाठी गझनीच्या महंमदाचा विषय निवडला. त्यांचे लिखाण हिंदू-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार करणारे होते. मुस्लिम शासनाचे सखोल अध्ययन करणारे ते पहिले आधुनिक मुस्लिम इतिहासकार होत. त्या काळी मुस्लिम लेखकात कट्टर मूलतत्त्ववादी व हिंदूविरोधी लेखनाचा प्रवाह प्रामुख्याने अलिगढ रूढ होता. त्या प्रवाहाला छेद देणारे ते इतिहासकार होते.

#### २. के. एम. अशरफ

यांनी सुलतानशाहीचा राष्ट्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला. Life and Conditions of the People of Hindustan (1200-1500 AD) या ग्रंथातून त्यांनी हिंदू व मुस्लीम समाजात कोणताही संघर्ष झाला नाही. या दोन्ही समाजात सांस्कृतिक समन्वयाचे वातावरण निर्माण झाले होते हे स्पष्ट केले. समाजातील भिन्न गट अमीर उमराव, गुलाम शेतकरी, कारागीर, करमणुकीची साधने यांचा त्यांनी ऊहापोह केला. त्यांनी हिंदू-मुस्लीम गटात कोणताही संघर्ष झाला नाही, उलट दोन्ही समाजात सांस्कृतिक समन्वय होते असे त्यांनी सांगितले.

#### ३. सर जदुनाथ सरकार

यांना इंग्रजी, संस्कृत, फारशी, फ्रेंच, पोर्तुगिज व मराठी भाषा अवगत होत्या. सत्याधिष्ठित, चिकित्सक, व वस्तुनिष्ठ इतिहासलेखनाच्या सैद्धांतिक भूमिकेवर संशोधनात्मक लेखन केले. त्यांच्या History of Aurangzeb आणि Shivaji and His Times, History of Shivaji या ग्रंथात राष्ट्रवादी दृष्टीकोन दिसून येतो. सरकारानी मूळ कागदपत्रांचे केलेले चिकित्सक संपादन आणि त्या ग्रंथाना लिहिलेल्या प्रस्तावना मोलाच्या आहेत.

### (क) ब्रिटिश काळातील इतिहासकार

#### १. दादाभाई नौरोजी

सन १८७६ मध्ये दादाभाईंनी Poverty of India हा ग्रंथ लिहून हिंदी दारिद्र्यविषयक माहिती दिली. तर १९०१ मध्ये Poverty and Un-British Rule in India या ग्रंथात Drain of Wealth हा सिद्धांत मांडून हिंदी दारिद्र्य सतत वाढत गेले तर इंग्रजी साम्राज्य नष्ट होईल असा इशारा त्यांनी दिला.

#### २. रोमेशचंद्र दत्त

हे राष्ट्रीय विचारसरणीचे अर्थतज्ञ होते. त्यांनी 'इंग्लंड व भारत' आणि 'भारताची अर्थव्यवस्था' हे ग्रंथ लिहून हिंदी जनतेची आर्थिक स्थिती स्पष्ट मांडली. त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाची मूळे शोधून काढली. १८९९ साली राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाचे त्यांना देण्यात आलेले अध्यक्षपद हा त्यांच्या राष्ट्रवादी भूमिकेचा भारतीयांनी केलेला सन्मान व गौरव होता.

### ३. डॉ. रमेशचंद्र मुजूमदार

प्राचीन भारतीय समाज, संस्कृती, भारतीय संस्कृतीचा देशाबाहेर झालेला प्रसार, ब्रिटिश सत्तेची स्थापना व विस्तार, भारतीय स्वातंत्र्यलढा इत्यादी विषयांवर राष्ट्रीय भूमिकेतून त्यांनी लिखाण केले. Corporate Life in Ancient India, History of the freedom movement, The Sepoy Mutiny and the Revolt of 1857 हे महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले.

**गुण-दोष**

**(अ) गुण**

१. राष्ट्रवादी इतिहासलेखनाने ब्रिटिश राजवटीचे साम्राज्यवादी स्वरूप उलगडून दाखवले.

२. राष्ट्रीय चळवळीतील वैचारिक आधार दिला.

३. या इतिहासकारांनी राजकीय इतिहासाबरोबरच इतर पैलूंवरही प्रकाश टाकला.

४. आपला इतिहास जाणून घेण्याच्या जिज्ञासेने मुलभूत संशोधन कार्याला गती दिली.

**(ब) दोष**

१. राष्ट्रवादी इतिहासकारांनी आपल्या मतांच्या समर्थनासाठी कधी-कधी अतिशयोक्तीपूर्ण विधाने केली आहेत.

२. काही वेळा त्यांनी पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनातून लिखाण केले आहे.

३. अतिरेकी राष्ट्रवादी लेखकाने राष्ट्रवादाचे पोषण करताना मध्ययुगातील वीरपुरुषांच्या कार्याचा गौरव करताना नकळत जमातवादाची बीजे रोवली गेली.

## ❖ भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाची कारणे

भारतीय राष्ट्रवादाच्या उद्रेकात अनेक घटकांनी योगदान दिले ते खालीलप्रमाणे -

**राजकीय व प्रशासकीय एकता**

ब्रिटिशांच्या भारतातील विजयाच्या अनेक परिणाांपैकी एक लक्षणीय परिणाम म्हणजे केंद्रीय राज्य. त्यामुळे भारताचे राजकीय व प्रशासकीय एकीकरण झाले. ब्रिटीश-पूर्व भारत अनेक सरंजामशाही राज्यात विभागला होता. सतत त्यांच्यात राज्याच्या सीमा वाढविण्यासाठी आपापसांत संघर्ष होत असत. ब्रिटिश सरकारने भारतात मध्यवर्ती प्रशासकीय व्यवस्थेची स्थापना केली. त्यांनी राज्यातील प्रत्येक नागरिकांना एकसमान कायदे बनवून नियमबद्ध अंमलबजावणी केली. या कायद्यासमोर सर्व समान होते. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या सार्वजनिक सेवांनी देशाचे प्रशासकीय एकीकरण घडवून आणले. एकसमान चलनप्रणाली, सामान्य प्रशासन, सर्वसाधारण कायदे आणि न्यायिक संरचना यांच्या स्थापनेमुळे भारताच्या एकीकरणात योगदान दिले. परिणामी राष्ट्रवादी भावनेचा विकास होण्यास मदत झाली.

### इंग्रजी भाषा आणि पाश्चात्य शिक्षण

पाश्चिमात्य शिक्षण हा एक राष्ट्रवाद विकासातील एक महत्त्वाचा घटक होता. ज्याने राष्ट्रवादाच्या विकासाचा मार्ग मोठ्या प्रमाणावर प्रशस्त केला. भारतात शिक्षणाच्या प्रसारासाठी ख्रिश्चन मिशनरी, ब्रिटिश सरकार आणि पुरोगामी भारतीय हे तीन मुख्य घटक जबाबदार होते. भारतीय लोकांमध्ये ख्रिस्ती धर्म प्रसारित करण्याच्या हेतूने, ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आधुनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी विस्तृत कार्य केले. ते भारतात आधुनिक शिक्षणाचे अग्रदूत होते. भारतातील आधुनिक शिक्षणाची सुरुवात प्रामुख्याने भारतातल्या ब्रिटनच्या राजकीय, प्रशासकीय आणि आर्थिक गरजांनी प्रेरित होते. ब्रिटिश सरकारने भारतात शाळा आणि महाविद्यालयांचे एक नेटवर्क स्थापन केल्याने अनेक भारतीयांना आधुनिक ज्ञानाची ओळख झाली.

राजा राममोहन रॉय, ईश्वर चंद्र विद्यासागर यासारखे काही भारतीय पाश्चात्य शिक्षणाचे अग्रगण्य होते. शिक्षणाची जुनी पद्धत केवळ अंधश्रद्धा व रूढीपरिवर्तन घडवून आणत होती. इंग्रजी शिक्षणाला पश्चिमेकडील वैज्ञानिक आणि लोकशाही विचारांचा खजिना मानला गेला. भारतातील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय चळवळीचे नेतृत्व करणारे राजा राममोहन रॉय, विवेकानंद, गोखले, दादाभाई नौरोजी, फिरोज शाह मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इत्यादी सर्व पाश्चात्य शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. सुशिक्षित भारतीयांमध्ये इंग्रजी भाषा संप्रेषणाचे माध्यम बनले ज्यामुळे ते एकमेकांशी सहज संपर्क करू शकत. ते इंग्रजी भाषेच्या माध्यमाने पाश्चात्त्य विचार, संस्कृती आणि संस्था यांच्या संपर्कात आले. त्यांच्यामध्ये लोकशाही आणि बुद्धीवादी दृष्टीकोन तयार होण्यास मदत झाली. राष्ट्रवाद, लोकशाडी, स्वातंत्र्य, समता, समाजवाद इ. कल्पना भारतीयांमध्ये रुजू लागल्या. मिल्टन, जे. एस. मिल, थॉमस पेन, जॉन लॉक, रूसो, मॅझिनी इत्यादी विचारवंतांच्या विचारांनी भारावून गेले. त्यामुळे राष्ट्रवादी भावनेचा विकास झाला. ही भावना विविध संघटनांच्या निर्मितीमधून अभिव्यक्त होऊ लागली. जेथे लोक त्यांच्या मातृभूमीच्या विविध समस्यांबद्दल चर्चा करू शकत. राष्ट्रीय पातळीवर सामाजिक, राजकीय आणि आर्थिक हितसंबंध असलेल्या विविध विषयांवर विचार करणे त्यांना शक्य झाले. या सुशिक्षित भारतीयांमध्ये राजकीय जागृती आणि भारतातील राजकीय चळवळीचे संघटन करण्याची भावना निर्माण झाली.

### वाहतूक व दळणवळण साधनांचा विकास

वाहतुकीची आधुनिक साधने आधुनिक राष्ट्रांमधील लोकांमध्ये एकत्रीकरण घडवून आणण्यासाठी मदत करतात. भारतातही रेल्वेची स्थापना, रस्ते निर्माण, कालवे आणि पोस्ट, टेलिग्राफ आणि बिनतारी सेवांची सुरुवात करण्यात आली. त्यांनी संपूर्ण भारतातील लोकांना एक राष्ट्र म्हणून बनविण्यास हातभार लावला. अर्थात, या सर्व सुविधा ब्रिटिश उद्योगांच्या हितासाठी आणि राजकीय, प्रशासकीय आणि लष्करी कारणास्तव विकसित करण्यात आल्या होत्या. तथापि, या आधुनिक संप्रेषणाच्या माध्यमांनी राष्ट्रीय स्तावर आणि सांस्कृतिक जीवनाचे एकीकरण घडवून आणण्यास मदत केली. इंडियन नॅशनल काँग्रेस, अखिल भारतीय किसान सभा, यूथ लीग, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस इत्यादीसारख्या अनेक राजकीय संघटनांचे संघटन व कामकाज करणे या साधनामुळे सहज शक्य झाले. रेल्वेने अधिक शहरे, गावे, जिल्हे आणि प्रांताच्या लोकांना एकमेकांशी

जोडले. राष्ट्रीय परिषद, विचारांची देवाणघेवाण, राष्ट्रवादी हालचालींसाठी कार्यक्रमावर नियंत्रण ठेवणे यासारख्या राष्ट्रवादी कृती वाहतुकीच्या आधुनिक साधनांशिवाय अशक्य होत्या.

### आधुनिक प्रेसची सुरुवात

एक प्रभावशाली सामाजिक संस्था म्हणून प्रेस थोड्याच काळात उदय होऊन मोठ्या प्रमाणावर विचारांच्या देवाणघेवाणीस उपयुक्त ठरले. राजा राम मोहन रॉय भारतातील राष्ट्रवादी प्रेसचे संस्थापक होते. बंगालीत त्यांना 'संवाद कौमुदी' १८२१ मध्ये प्रकाशित झाला आणि फारसी भाषेतील 'मिरत-उल-अकबर' १८२२ मध्ये प्रकाशित झाला. हे स्वतंत्र राष्ट्रवादी आणि लोकतांत्रिक प्रगतीशील प्रवृत्तीचे प्रकाशन होते. अमृत बझार पत्रिका, द बॉम्बे क्रॉनिकल, द ट्रिब्यून, द इंडियन मिरर, द हिंदू, द पायोनियर, मद्रास मेल, मराठा, केसरी यासारख्या राष्ट्रवादी आणि देशी भाषांच्या अनेक वृत्तपत्रांच्या उभारणीमुळे जनतेस एकत्रित करणे आणि राष्ट्रवादी भावना निर्माण करणे ही अतिशय महत्त्वाची भूमिका बजावणे सहज शक्य झाले. भारतीयांसाठी कल्याणकारी उपाय प्रदान करण्यामध्ये राष्ट्रीय वृत्तपत्रांमधील वृत्त प्रसारित करण्यात वृत्तसंस्थांमधील द फ्री प्रेस न्यूज सर्विसने सर्वात महत्त्वाची भमिका बजावली. प्रसारमाध्यमामुळे राजकीय चळवळ आणि राजकीय शिक्षण यांचा प्रसार करणे सहज शक्य झाले. प्रेसमुळे आंतराष्ट्रीय घडामोडी भारतीयांना लगेच समजू लागल्या.

भारतातील राष्ट्रवादी स्वातंत्र्यासाठी, त्याच्या संरक्षणासाठी द्वारकानाथ टागोर, हरचंद्र घोष, चंद्रकुमार टागोर, प्रसन्नकुमार टागोर यासारखे अनेक भारतीय तयार होते. राजा राममोहन रॉय हे पहिले सैनिक होते ज्यांनी प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यासाठी कोलकाताच्या सुप्रीम कोर्टात एक याचिका दाखल केली होती. भारतीयांचा प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष हा भारतातील राष्ट्रीय चळवळीचा अविभाज्य भाग बनला.

### आर्थिक शोषण

भारतीय ब्रिटिश राजवटीचे सर्वात वाईट वैशिष्ट्य म्हणजे सर्व वर्गांचे आर्थिक शोषण. ब्रिटिश व्यापारी भारतात आले आणि त्यांचा प्राथमिक हेतू आर्थिक लाभ कसा मिळवावा हाच होता. ब्रिटनच्या औद्योगिक क्रांतीमध्ये परकीय देशांतील कच्चा माल आयात करणे जरूरीचे होते आणि पक्क्या मालाच्या विक्रीसाठी व्यापक बाजारपेठ शोधणे गरजेचे होते. भारत त्यांना या दोन्ही गोष्टींसाठी अनुकूल होता. ब्रिटिशांच्या औद्योगिक वस्तूंच्या सार्वजनिक विस्तृत मागणीसाठी भारतीय उद्योग नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ब्रिटिश बाजारपेठेत भारतीय मालास प्रवेश प्रतिबंधित करण्यासाठी भारतीय वस्तूवर आयात शुल्क आकारले जात असतानाच भारतात कच्चा माल किंवा ब्रिटिश वस्तूंच्या व्यवहारांसाठी मुक्त व्यापार धोरणाची अंमलबजावणी केली होती. दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे, जी. के. गोखले इत्यादींनी ब्रिटिशांनी भारताचे केलेले आर्थिक शोषण आणि त्याचे परिणाम भारतीयांना सप्रमाण दाखवून दिले. त्यांनी भारतातील वसाहतीच्या आर्थिक प्रभावाचे विश्लेषण केले. ब्रिटिशांच्या उच्च प्रमाणावरील आर्थिक शोषणामुळे भारतीय राष्ट्रवादाच्या विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली.

### वैभवशाली भारतीय परंपरेचे पुनरुज्जीवन

भारतीयांमध्ये जेव्हा वसाहतवादी राजवट न्यूनगंड घडवून आणत होती तेव्हा मॅक्स मुलर, विल्यम जोन्स, चार्ल्स विल्किन्स इत्यादी परकीय विद्वान भारताचा वैभवशाली वारसा पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांनी काही संस्कृत ग्रंथ इंग्रजी भाषेत अनुवादीत केले. त्यांनी प्राचीन भारतीय संस्कृतीचा सर्वोच्च वारसा आणि तत्त्वज्ञान प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला. आर. जी. भांडारकर, एच. पी. शास्त्री यासारख्या काही भारतीय विद्वानांनी भारताचे भूतकाळातील वैभव लोकांसमोर पुन्हा आणण्याचा प्रयत्न केला. परिणामी, भारतीयांमध्ये आत्मविश्वास आणि देशभक्तीची भावना निर्माण होण्यास मदत होऊन राष्ट्रवादी भावनेचा विकास झाला.

### आंतरराष्ट्रीय घटनांचा परिणाम

परदेशातील अनेक हालचाली आणि घटना यामुळे राष्ट्रीय भावना जागृत होण्यास मदत झाली. १७७६ मध्ये स्वातंत्र्याचा जाहीरमाना, १७८९ मध्ये फ्रेंच क्रांती, १७८० मध्ये इटली आणि जर्मनीचे एकीकरण, १९०४ मध्ये जपानने रशियाचा केलेला पराभव, इत्यादी घडामोडींनी भारतीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास हातभार लावला. ब्रिटिश सरकारला पराभूत करणे शक्य आहे असा विश्वास या घटनांनी भारतीयांत निर्माण केला. अशा प्रकारे जागतिक प्रसंगांनी प्रेरित भारतीयांमध्ये राष्ट्रवादाचा विकास होण्यास मदत झाली.

### सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळ

उदारमतवादी पाश्चात्य संस्कृती आत्मसात करणाऱ्या नव्या सुशिक्षित वर्गाने सामाजिक संस्था आणि धार्मिक दृष्टीकोनांमध्ये सुधारणा करण्याची गरज ओळखली. त्यांच्या मते सामाजिक-धार्मिक मागासलेपणा हा राष्ट्रीय चळवळीमधील सर्वात मोठा अडथळा आहे. आर्य समाज, ब्राह्मो समाज, राजकृष्ण मिशन, थिऑसॉफीकल सोसायटी इत्यादींनी भारतातील सामाजिक-धार्मिक सुधारणांना आणि पुनरुत्थानाच्या चळवळींना चालना देण्यास मदत झाली. या आंदोलनांचा उद्देश सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील विशेषाधिकार नष्ट करणे, देशाच्या सामजिक आणि धार्मिक संस्थांचे लोकशाहीकरण करणे आणि वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक समानतेला चालना देणे हे होते. त्यांनी सर्व व्यक्तींना समान अधिक आहेत हे सांगितले. अशा प्रकारे सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीनी प्रशासकीय सुधारणा, स्व-शासन, लोकशाही तसेच स्वातंत्र्य चळवळीला जन्म दिला. सामाजिक-धार्मिक प्रबोधन चळवळीने प्रत्येक क्षेत्रात भारतीयांना अभिव्यक्ती प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. परिणामी राष्ट्रवादी भावनेचा विकास झाला.

### ब्रिटिशांची दडपशाही धोरणे

ब्रिटिशांनी केलेल्या बऱ्याच कायद्यामुळे भारतीय लोकांमध्ये व्यापक असंतोष निर्माण झाला. वर्नाक्युलर प्रेस ॲक्टने भारतीय प्रेसच्या स्वातंत्र्यावर गदा आणली. शस्त्रास्त्र कायद्याने भारतीयांना शस्त्र जवळ ठेवण्या-पासून रोखले. परदेशी कापूस वस्त्रावर आयात कराचे उच्चाटन केल्यामुळे भारतीय कापड उद्योगाला नुकसान पोहोचले. लॉर्ड रिपनच्या कारभाराच्या काळात भारतीय न्यायाधीशांना इलबर्ट बिलच्या तरतुदीनुसार भारतीयांना

युरोपीन गुन्हेगारांना शिक्षा करण्याचा अधिकार देण्यात आला होता. परंतु इंग्रजांनी या विधेयकाला दाद दिली नाही व त्यास विरोध केला अखेरीस ते विधेयक दुरूस्त करावे लागले. या दुरूस्त्यामुळे ब्रिटिश सरकारच्या जातीय भेदभावाची धोरणे उघड झाली. लॉर्ड कर्झन बंगालमधील वाढत्या भारतीय राष्ट्रवादाला दडपण्यासाठी बंगालच्या विभाजनाचे धोरण आखले. या विभाजन आदेशाने लोकांमध्ये व्यापक असंतोष निर्माण झाला. त्यास विरोध म्हणून 'स्वदेशी' वस्तूंचा वापर आणि परदेशी वस्तूंचा बहिष्कार हे प्रभावी तंत्र स्वीकारण्यात आले. अशा प्रकारे भारतीय राष्ट्रवाद बळकट होण्यामध्ये ब्रिटिशांचे दडपशाही धोरण आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांचा जातीय भेदभाव यांनी हातभार लावला.

**जागरूक मध्यमवर्गांचा उदय**

भारतीय राष्ट्रीय चळवळीची स्थापना आधुनिक बुद्धिवादी उदयोन्मुख समुदायाने केली अशी बिपिनचंद्र यांची ही धारणा होती. सुरुवातीला या गटांनी वसाहतवादी नियमांकडे अतिशय सकारात्मक दृष्टीकोन अवलंबला होता. व्यापारी, जमीनदार, सावकार, सुशिक्षित भारतीय, नोकरदार वर्ग, वकील, कारकून यांचा समावेश मध्यम वर्गात होत होता. या वर्गाला ए. आर. देसाई 'नव-सामाजिक वर्ग' म्हणतात. या गटांनी लोकांमध्ये देशभक्तीची भावना विकसित करण्यामध्ये अग्रगण्य भूमिका बजावली. अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होण्याआधीच या नव-सामाजिक वर्गाने राष्ट्रीय भावनेच्या विकासास सुरुवात केली होती. अखेरीस भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही संघटना राष्ट्रीय चळवळीचे एक व्यासपीठ म्हणून उदयास आले.

या सर्व घटकांनी संयुक्तपणे, भारतामध्ये राष्ट्रवादाच्या वाढीस प्रोत्साहन दिले होते. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयामध्ये व विकासामध्ये कोणत्याही एका विशिष्ट वर्गाचा हात नव्हता, तर त्यामध्ये सर्व वर्गातील लोकांचा हात होता. हा राष्ट्रवादी भावनेच्या विकासाचा सर्वात मोठा परिणाम होता. १८८५ पासून इंडियन नॅशनल काँग्रेसने राष्ट्रवादाच्या वाढीच्या प्रक्रियेला बळकटी देण्यास आणि एकत्रीकरणास मदत केली.

**उच्च पदासाठी योग्य भारतीयांना नाकारणे**

१८३३ च्या चार्टर अधिनियमात असे सांगितले की, फिटनेस हे नोकरीसाठी पात्रतेचे निकष ठरले पाहिजे. १८५८ च्या राणीच्या घोषणे पुन्हा एकदा त्याची पुनरावृत्ती करण्यात आली. पण इंग्रजांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले की भारतीयांना उच्च पदांवर विशेष करून भारतीय नागरी सेवांमध्ये प्रवेश नाकारता येईल. एस. एन. बॅनर्जी, अरविंद घोष इ. भारतीयांना सिव्हिल सर्व्हिसमध्ये प्रवेश नाकारण्यात आले. भारतीय सिव्हिल सर्व्हिसमधील भारतीय उमेदवारांचे प्रमाण कमी करण्यासाठी १८७७ मध्ये आय.सी.एस. ची वयोमर्यादा २१ वरून १९ करण्यात आली. तसेच ही परीक्षा ब्रिटनमध्ये घेण्यात आली. या बदलामागे प्रत्यक्षात भारतीयांना नागरी सेवांमध्ये प्रवेश करण्यास मनाई करणे हा होता. भारतीयांची पात्रता असूनही त्यांना उच्च पदावरील नोकऱ्यांत समाविष्ट करण्यात येत नव्हते. या उलट ब्रिटिश व्यक्तीची पात्रता नसतानाही त्यांना उच्च पदावर नियुक्त करण्यात येत असे. नोकरीतील हा भेदभाव सर्वच क्षेत्रात सुरू होता. परिणामी भारतीयांमध्ये असंतोष वाढून राष्ट्रवादी चळवळीस सुरुवात झाली.

## १.३ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

**१. साम्राज्यवाद** : दुसऱ्या प्रदेशावर वर्चस्व स्थापन करण्याची वृत्ती

**२. वाणिज्यवाद** : व्यापारविषयक विचार

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दादाभाई नौरोजी यांनी ............. सिद्धांत मांडला.

(अ) आर्थिक निःसारण (ब) समता (क) अतिरिक्य मूल्य (ड) विषमता

२. रोमेशचंद्र दत्त हे ............. होते.

(अ) उद्योगपती (ब) अर्थतज्ञ (क) समाजसेवक (ड) राजकीय नेते

३. ............. हे राष्ट्रवादी इतिहासकार होते.

(अ) के. पी. जयस्वाल (ब) म. गांधी (क) रजनीपाम दत्त (ड) सुमीत सरकार

४. Education in Ancient India हा ग्रंथ ............ यांनी लिहिला.

(अ) ए. एस. आळतेकर (ब) सुमीत गुहा (क) रणजित गुहा (ड) बिपिन चंद्र

५. Nation हा शब्द ............ शब्दापासून झाला आहे.

(अ) Natus (ब) State (क) Nationalism (ड) Natio

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. Shivaji and His Time हा ग्रंथ कोणी लिहिला ?

२. व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट केव्हा अंमलात आला ?

३. भारत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना कोणी केली ?

४. Hindu Polity हा ग्रंथ कोणी लिहिला ?

५. Drain of Wealth हा ग्रंथ सिद्धांत कोणी मांडला ?

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. आर्थिक निःसारण २. अर्थतज्ञ ३. के. पी. जयस्वाल

४. ए. एस. आळतेकर ५. Natus

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. सर जदुनाथ सरकार    २. १८७८    ३. वि. का. राजवाडे

४. के. पी. जयस्वाल    ५. दादाभाई नौरोजी

## १.६ सारांश

गतेतिहासाचा अभ्यास बारकाईने व साक्षेपी स्वरूपात करून त्याचा अन्वयार्थ लावताना जेव्हा राष्ट्राची अस्मिता जागृत करण्याचा, राष्ट्रीय चारित्र्य वृद्धिंगत करण्याचा, साम्राज्यवादी इतिहासकारांनी काढलेल्या निष्कर्षाने खंडण करण्याचा प्रयत्न जेव्हा राष्ट्रातील इतिहासकार करतात तेव्हा त्याला राष्ट्रवादी इतिहासलेखन म्हणतात. इतिहासलेखनाचे जे विविध प्रवाह आहेत त्यातील हा एक प्रवाह आहे. भारतात ब्रिटिशांनी सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर ब्रिटिश इतिहासकारांनी भारताचा इतिहास लिहित असताना त्यांच्या साम्राज्यवादाला पोषक असा इतिहास लिहिला. परिणामी भारतीय समाजाच्या अस्मितेला धक्का बसला. त्याला विरोध म्हणून भारतीय इतिहासकारांनी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून भारताचा इतिहास नव्याने लिहिण्यास सुरुवात केली. आणि एक राष्ट्रवादी विचारसरणीची राष्ट्रवादी इतिहासकारांची एक फळी तयार झाली.

भारतात १९व्या शतकापासून राष्ट्रवादी भावनेच्या उदयास सुरुवात झाली. या राष्ट्रवादी भावनेच्या उदयाला, विकासाला, तिच्या वाढीला पाश्चात्त्य तसेच स्वदेशी अशी दोन्ही स्वरूपाची परिस्थिती कारणीभूत होती.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) दीर्घोत्तरी प्रश**

१. राष्ट्रीय दृष्टीकोनाची चर्चा करा.

२. राष्ट्रवादी ही संकल्पना स्पष्ट करून भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाची कारणे स्पष्ट करा.

**(ब) टीपा लिहा.**

१. राष्ट्रीय दृष्टीकोन

२. राष्ट्रवाद संकल्पना

३. भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाची कारणे.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


- इतिहास तंत्र आणि विज्ञान : वैद्य सुमन व शांता कोठेकर.
- मॉडर्न इंडिया : सरकार सुमित
- इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डस् : बिपिनचंद्र


✡✡✡

# घटक – २

# भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ सन १८८५ च्या पूर्वीच्या राजकीय संघटना

  २.२.२ काँग्रेसची स्थापना

  २.२.३ उगमस्थानाशी संबंधीत मतभेद

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.० उद्दिष्टे

या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- भारतात सन १८८५ च्या पूर्वी विविध राज्यात कोणत्या राजकीय संघटना होत्या त्याचा अभ्यास करता येईल.
- या राजकीय संघटनांनी 'राजकीय ऐक्य' निर्माण करण्यामध्ये कसा सहभाग घेतला हे लक्षात येईल.
- या राजकीय संघटनांनी 'भारतीय काँग्रेस स्थापनेसाठी (१८८५) कसे प्रयत्न करता येतील याची चर्चा करता येईल.
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेच्या उद्दिष्टांची चर्चा करता येईल.
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उगमस्थानाशी संबंधीत कशी मत–मतांतरे होती याचा अभ्यास करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

आधुनिक काळात 'राष्ट्र व राष्ट्रभावना' ह्या संकल्पना पूर्णतः नवीन आहेत आणि भारताच्या इतिहासात या संकल्पनेचा विचार सन १८५७ च्या उठावानंतर प्रथमच केला गेला आहे. 'राष्ट्रभावना' म्हणजे आपल्या राष्ट्रावर वा मातृभूमीवर प्रेम करणे असा अर्थ अभिप्रेत असेल तर हिंदुस्थानातील लोक मातृभूमीवर प्रेम करीत नव्हते असा होईल. हिंदुस्थानात प्राचीन काळापासून राजसत्ताक राज्य पद्धती अस्तित्वात होती. राजा राज्याचे प्रतीक होते. 'प्रजेच्या हितात राजाचे हित' असे कौटिल्यही सांगतात. राजा-प्रजा-राज्य यांचे एकरूपत्व होते.

युरोपात प्रबोधनानंतर ज्या नव्या संकल्पनांचा उदय झाला. त्यात राष्ट्रभावना ही एक संकल्पना होती. आधुनिक युगात १७८९ साली झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने 'स्वातंत्र्य-समता-बंधुता' ही तत्त्वे प्रस्तुत केली. त्यात स्वातंत्र्याशी संबंधित राष्ट्रभावना हे तत्त्वही होते. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी 'महाराष्ट्र धर्म' वाढविण्याचे जे आवाहन केले होते त्यात राष्ट्रभावना निश्चितपणे होती. परंतु त्यानंतर १८५७ पर्यंत ही भावना हिंदुस्थानातून लुप्त झाली होती. १८५७ च्या उठावानंतर राष्ट्रभावनेचा उदय इंग्रजांच्या जुलमी राजवटीमुळे झाला व हळूहळू अनेक घटकांनी या राष्ट्रभावनेच्या विकासास हातभार लावला. थोडक्यात, युरोपात १७व्या शतकात राष्ट्रभावनेची जागृती झाली. हिंदुस्थानात ती सुमारे दोन शतकानंतर १९व्या शतकात झाली असे म्हणता येईल.

कारण १८५७च्या भारतीयांच्या महान उठावानंतरचे सुमारे एक दशक दिङ्मूढ अवस्थेत गेले. भारतीयांच्या उठावाचा बिमोड करताना हजारो भारतीयांच्यावर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केलेले अनन्वित अत्याचार व अमानुष छळ पाहून भारतीयांची मने उद्विग्न झाली. ब्रिटिशांच्या राक्षसी दमननीतीच्या प्रयत्नामुळे काही काळ भारतीय लोक आवाक् झाले. या पहिल्या धक्क्याचा भर हळूहळू ओसरू लागल्यानंतर सुबुद्ध भारतीयांच्यात विचारमंथन सुरू झाले. प्रबळ ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र लढा यशस्वीरित्या देणे अशक्य आहे याची जाणीव त्यांना प्रकर्षाने झाली. परंतु त्याबरोबर भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाला व वाढलेल्या अर्थशोषणाला वाचा फोडण्याची निकडही त्यांना जाणवू लागली. अशा परिस्थितीत पाश्चात्य उदारमतवादी विचारप्रणालीने प्रभावित झालेल्या सुशिक्षित भारतीयांच्यात सनदशीर मार्गाने सरकारच्या अन्याय धोरणांना विरोध करण्याची कल्पना बळावली. त्याचीच परिणती १८६७ च्या सुमारास सनदशीर मार्गाने राजकीय चळवळ करणाऱ्या संघटना जन्मला येण्यात झाली.

भारतात १९व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रवादाच्या उदयाला व विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. भारतीयांनी सुरू केलेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमुळे नवविचारांनी समाज जागृत झाला. जागृत झालेल्या या समाजाला ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाने ज्ञान झाल्याने या समाजात राष्ट्रवादाच्या विकासाला गती मिळत गेली. इंग्रजी शिक्षणाची संधी उपलब्ध झाल्याने पाश्चिमात्य तत्त्ववेत्याचे ज्ञान आत्मसात करणे भारतीयांना शक्य झाले. स्वातंत्र्य, सामाजिक समता, व्यक्तिस्वातंत्र्य, उदारमतवाद यासारख्या विचारांनी भारतीय समाज प्रभावित झाला. याच काळात निर्माण झालेल्या भारतीय वृत्तपत्रांनी भारतीय समाजात नवविचारांचा प्रसार करणे व राष्ट्रवादाच्या विचारांना चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. वृत्तपत्रातील या

लेखांच्यामुळे तसेच या काळातील प्रादेशिक भाषेतील विविध प्रकारच्या वाङ्मयामुळे भारतीयाना ब्रिटिश साम्राज्यवादाचे स्वरूप स्पष्ट झाले. राष्ट्रवादाचा विचार येथील समाजात रुजविण्यास सुरुवात झाली.

राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना हा केवळ योगायोग नव्हता. त्यामागे भारताची दीर्घकालीन राजकीय परिस्थिती सामाजिक व वैचारिक प्रबोधन कारणीभूत होते. सन १८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापन झाली. तेव्हापासून भारताच्या राजकीय जीवनातील एक नवा कालखंड सुरू झाला. अखिल भारतीय काँग्रेस या नावाचे एक संघटनात्मक व्यासपीठ अस्तित्वात आले. या व्यासपीठाने मात्र पुढच्या अनेक वर्षातील सर्व राजकीय हालचालींवर आणि एकूण स्वातंत्र्य चळवळीवर प्रचंड प्रभाव टाकला. सन १९०७ च्या सुरत अधिवेशनात या व्यासपीठात विभाजन जरी झाले तरीही अखिल भारतीय स्वरूपाचे व्यासपीठ म्हणून या संघटनेचे महत्त्व कायम राहिले. पुढील वाटचालीत ही संघटना महत्त्वपूर्ण योगदान देत राहिली. स्वातंत्र्य चळवळीच्या पाऊण शतकाच्या वाटचालीवर काँग्रेसचा प्रभाव राहिला. जगाच्या इतिहासात असे उदाहरण क्वचितच आढळेल. परंतु अखिल भारतीय काँग्रेसच्या उगम स्थानाशी संबंधीत मतभेद निर्माण झाले होते. त्यासंदर्भात वाद-विवाद तसेच मते-मतांतरे निर्माण झाली होती. त्याचा अभ्यासदेखील महत्त्वपूर्ण आहे.

## २.३ विषय विवेचन

### २.२.१ सन १८८५ च्या पूर्वीच्या राजकीय संघटना

सन १८८५ मध्ये झालेली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ही एकाएकी घडलेली क्रांतिकारी घटना नव्हती. भारतात राजकीय जागृती १८५७च्या बंडापूर्वीपासूनच सुरू होती. कारण ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या आर्थिक हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी समाजविस्ताराच्या धोरणाचा हिरीरीने पुरस्कार केला. व्यापाराच्या तसेच साम्राज्य विस्तारानंतर त्यांनी वाढविलेल्या महसुलाच्या माध्यमातून भारतीय समाजाची मोठ्या प्रमाणावर लूट केली गेली. त्यामुळे भारतीयांना ब्रिटिश साम्राज्यवादाचे स्वरूप स्पष्ट झाले. राष्ट्रवादाचा विचार येथील समाजात रुजविण्यास सुरुवात झाली. दळणवळण व संदेशवहनाच्या क्षेत्रात झालेल्या मोठ्या प्रमाणावरील प्रगतीमुळे समाजात एकजिनसीपणा निर्माण होणे शक्य झाले. विचारांचे आदान-प्रदान झाल्यामुळे भारतातील निरनिराळ्या प्रांतात राहणाऱ्या समाजाच्या विचारांमध्ये काही प्रमाणात एकवाक्यता निर्माण झाली. भारतीय समाजाच्या आर्थिक, दैन्यावस्थेस, बेकारीस, व्यापार, उद्योगधंदे बंद होण्यास ब्रिटिशांचे धोरणच कारणीभूत आहे याची जाणीव भारतीय समाजाला झालेली होती. त्यामुळे परकीय सत्ता नष्ट करणे व भारताचे स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित करणे भारतीय समाजाला आवश्यक वाटण्यास सुरुवात झाली.

अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी राजकीय संघटना भारतात अस्तित्वात आल्या होत्या. तथापि या संघटनांची व्याप्ती स्थानिक व प्रादेशिक स्तरापर्यंत मर्यादित होती आणि त्यांनी अर्ज विनंत्या करून ब्रिटिश पार्लमेंटकडे व हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्कर्त्यांकडे काही राजकीय मागण्या सादर केल्या होत्या. या मागण्यांच्यामध्ये प्रशासकीय सुधारणा हिंदी लोकांना प्रशासनात सहभाग देणे व शिक्षण प्रसार अशा प्रमुख

मागण्या होत्या. हे कार्य करणाऱ्या राजकीय संघटनांमध्ये वकील, पत्रकार, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक इ. सुशिक्षित मध्यमवर्गीयांचा भरणा होता. शिक्षणामुळे व विस्तृत वाचनामुळे या मध्यमवर्गीयांची दृष्टी काहीशी व्यापक व सर्वस्पर्शी झाली होती. लॉर्ड मेकॉले सन १८३३ मध्येच म्हणाला होता की, ''इंग्रजी शिक्षण घेतलेले भारतीय पुढील काळात निश्चितच युरोपिअन संस्थांची मागणी करतील.'' हळूहळू लोकशाही व सनदशीर राजकारण हा नव्या सुशिक्षित पिढीचा आदर्श बनू लागला होता. त्यादृष्टीने काही राजकीय संघटना अस्तित्वात आल्या त्या पुढीलप्रमाणे -

**बंगाल प्रांतातील राजकीय संघटना**

**१. वंगभाषा प्रकाशिका सभा** : भारतीयांची पहिली राजकीय संघटना म्हणून हिचा उल्लेख केला जातो. कारण राष्ट्रवादाचा पहिला प्रकट आविष्कार म्हणजे सुशिक्षित भारतीयांनी बांधलेली त्यांची 'वंगभाषा प्रकाशिका सभा' होय. हिची स्थापना सन १८३६ मध्ये झाली. राजा राममोहन रॉय यांच्या सहकार्याने कलकत्ता येथे ती स्थापन केली गेली. धार्मिक व सामाजिक कार्यासाठी माणसे एकत्र येते. परंतु राजकीय प्रश्नांना किंवा आर्थिक प्रश्नांना घेऊन संघटना बांधण्याचा हा पहिला प्रयत्न होता. या संघटनेच्या बैठकीमध्ये राजकीय विषय, सरकारी धोरणाबाबत, त्यात सुधारणा करण्यासंबंधी सरकारकडे प्रस्ताव पाठविले जात असत.

**२. जमिनदारांची संघटना** : द्वारकानाथ टागोर यांनी ही संघटना इ.स. १८३७ साली स्थापन केली. कंपनीच्या काळात बरेचसे इनामदार व जमिनदार डबघाईस आलेले होते. ही संघटना प्रामुख्याने बंगाल, बिहार, पर्यंत प्रसारित झालेली होती. बंगालमधील मोठ्या जमिनदारांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली होती. या संघटनेचे उद्दिष्ट जरी मर्यादित असले तरी आपल्या गाऱ्हाण्यांची सरकार दरबारी दाद लावून घेण्यासाठी सनदशीर राजकीय मार्ग त्यांनी अनुसरला होता. भारतातील काही ब्रिटिशांची तिला सहानुभूती तर होतीच पण इंग्लंडमधील ब्रिटिश इंडिया सोसायटीशी देखील संपर्क होता.

**बंगाल ब्रिटिश इंडिया सोसायटी**

या सोसायटीची स्थापना सन १८४३ मध्ये करण्यात आली. या सोसायटीचा मुख्य उद्देश होता बंगालमधील लोकांच्या संपर्कात राहून प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेणे. ती सर्व माहिती लोकांच्यामध्ये प्रसारित करणे. त्यानंतर या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी सनदशीर व शांततापूर्ण मार्गाने प्रयत्न करणे.

**ब्रिटिश इंडियन असोसिएशन**

इ.स. १८५१ साली ह नवी संघटना स्थापन झाली होती. अर्थात पूर्वीच्या अस्तित्वात असणाऱ्या 'जमिनदार असोसिएशन' तसेच 'ब्रिटिश इंडिया सोसायटी' या दोन असोसिएशनचे एकीकरण करून ही नवी 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली होती. या असोसिएशनने प्रामुख्याने केलेले कार्य म्हणजे, दर वीस वर्षांनी ब्रिटिश पार्लमेंटकडून 'चार्टर ॲक्ट' लागू केला जात असे. ते इ.स. १८५३ ला चार्टर ॲक्ट लागू केला जाणार होता. त्यामुळे वरील संघटनेने चार्टर ॲक्टमध्ये आपल्या मागण्याचा विचार करून नंतर ॲक्ट लागू करण्यात यावा यासाठी पुढील सूचनांची मागणी केली होती. उदा. -

१. न्यायविषयक अधिकार कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र ठेवावेत.

२. लोकांचा सहभाग असलेल्या स्वतंत्र कायदेमंडळाची स्थापना करण्यात आली.

३. स्टँप ड्युटी, अबकारी कर आणि मिठावरील कर रद्द करण्यात यावा.

४. उच्च अधिकाऱ्यांच्या वेतनात कपात करण्यात यावी.

या वरील सूचनांचा ब्रिटिश पार्लमेंटने सहानुभूतीपूर्वक विचार करून कायदेविषयक कामकाजासाठी इ.स. १८५३ च्या नव्या चार्टर ॲक्टमध्ये गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलमध्ये सहा हिंदी सभासदांचा समावेश करण्यात आला.

**ईस्ट इंडिया असोसिएशन**

सन १८६६ मध्ये लंडन येथे दादाभाई नौरोजीनी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या सहकार्याने 'ईस्ट इंडिया असोसिएशन'ची स्थापना केली होती. याचा प्रमुख उद्देश होता ब्रिटिश जनतेला भारतीय समस्यांची ओळख करून देणे. भारताच्या उन्नतीबाबत आस्था असलेल्या सर्वांनाच या संघटनेची दारे मोकळी होती. त्यामुळे विलियम वेडरबर्न सारखी भारताविषयी सहानुभूती असलेली सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकारही या संघटनेत होते. या असोसिएशनच्या या संस्थेच्या नियमित बैठका होत असत. त्यात भारतीय समस्यावर चर्चा होई. त्यामध्ये राजकीय सुधारणांची मागणी केली जाई. एका दशकात या संस्थेच्या शाखा मद्रास, मुंबई, कलकत्ता येथेही स्थापन झाल्या. पण भारतातील शाखांच्या पेक्षा लंडन येथील शाखेचे कार्य अधिक महत्त्वाचे ठरले. लंडन येथे हेन्री फॉसेट, चार्लस ब्रॅडलॉ, विलियम डिग्बी, विलियम वेडरबर्न इ. उदारमतवादी इंग्रजांनी या संस्थेच्या व्यासपीठावरून भारताविषयी ब्रिटिश लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. फॉसिटने तर पार्लमेंटचेही लक्ष भारतीय प्रश्नांच्यावर केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. भारतात राष्ट्रीय चळवळीचे बीजे रुजू लागल्यानंतर साहजिकच या संस्थेचे कार्य मंदावू लागले.

**इंडियन लीग**

सन १८७० नंतर बंगालमध्ये नव्या राजकीय विचारांचे स्फुरण दृष्टोत्पत्तीस येऊ लागले. राजकीय हक्कांची जाणीव होऊ लागलेल्या सुशिक्षित महत्त्वाकांक्षी बंगाली तरुणांना आपल्या विचारांच्या अभिव्यक्तीसाठी जुन्या राजकीय संस्थांची व्यासपीठे अपुरी आहेत, या संघटना नव्या विचारांना वाचा फोडण्यास असमर्थ आहेत याची जाणीव होऊ लागली व त्यासाठी नव्या संघटना प्रस्थापित करण्याची निकड त्यांना जाणवली. त्यातूनच 'अमृत बझार' पत्रिकेचे संपादक शिशिरकुमार घोष यांनी पुढाकार घेऊन 'इंडियन लीग'ची सन १८७५ साली स्थापना केली. भारतीय जनतेत राष्ट्रवाद जागृत करून राजकीय जागृती करण्याचा या संस्थेचा हेतू होता. बंगालमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी कार्य करीत असलेल्या स्थानिक संस्थांशी संपर्क साधून परिणामकारकरित्या राजकीय कार्य करण्यासाठी सर्वांनी संघटित होण्याचे आव्हान इंडियन लीगने दिले. या लीगच्या कार्याबद्दल कलकत्ता येथील 'इंग्लिशमन' या वृत्तपत्राने 'भारतीय जनतेतील राजकीय जागृतीचा आविष्कार प्रथमच स्पष्ट करणारी संघटना' असा या संस्थेचा उल्लेख केला आहे. परंतु पुढे कलकत्ता येथे स्थापन झालेल्या 'इंडियन असोसिएशन' या राजकीय संस्थेपुढे ही संस्था गौण ठरली.

**इंडियन असोसिएशन**

सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे या संस्थेचे संस्थापक. त्यांनी २६ जुलै, १८७६ रोजी कलकत्त्याच्या अलबर्ट हॉलमध्ये भरलेल्या सभेत 'इंडियन असोसिएशन'च्या स्थापनेची घोषणा केली होती. इंडियन असोसिएशन स्थापन करण्यामागे त्यांचा उद्देश होता सुशिक्षित महत्त्वाकांक्षी मध्यम वर्गीयांच्या व्यथांना वाचा फोडून त्यांना सार्वजनिक कार्यासाठी संघटित करण्याची गरज त्यांना प्रकर्षाने जाणवू लागली. बंगालमधील तत्कालीन राजकीय संस्था जमीनदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व त्यांच्या हितसंबंधाची जपणूक करणाऱ्या असल्यामुळे त्या मध्यम-वर्गियांच्या कल्याणासीच काळजी वाहू शकणार नाहीत असे वाटून त्यांनी नवी स्वतंत्र संस्था स्थापन केली. या असोसिएशनच्या स्थापनेवेळीच त्याची उद्दिष्टे त्यांनी स्पष्ट केली होती. ही संस्था अखिल भारतीय चळवळीचे केंद्र असावी असा त्यामागील हेतू होता. कारण सर्व भारतीयांना एका समान राजकीय व्यासपीठावर एकत्र आणण्याची गरज बंगालमधील भारतीय नेत्यांना प्रकर्षाने जाणवत होती. या संस्थेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१. समान राजकीय हितसंबंधाच्या व आशा-आकांक्षाच्या जाणिवेद्वारा भारतातील भिन्न वंशीय व भिन्न जातीय लोकांची (एकी घडवून आणणे.)

२. देशात प्रबळ लोकमत तयार करणे.

३. महत्त्वाच्या समस्यांची उकल व्हावी याकरिता सार्वजनिक चळवळ संघटित करून त्यात सहभागी होण्यास सामान्य नागरिकांना उद्युक्त करणे.

४. हिंदू-मुसलमानात मैत्रीची भावना जोपासणे. इ.

आनंद मोहन बोस हे या संस्थेचे पहिले सचिव होते. राजकीय जागृतीचे माध्यम म्हणून 'बंगाली' हे वृत्तपत्र या संस्थेमार्फत १८७९ मध्ये प्रकाशित होऊ लागले. या संस्थेने राज्यकर्त्यांच्या प्रतिगामी धोरणावरच टीकेचे अस्त्र चालविले तर वेळोवेळी भारताच्या हितसंबंधाना बाधक होणाऱ्या शासकीय धोरणाबाबत लोकमत जागृत करण्यासाठी सार्वजनिक सभा भरवल्या. अफगाण युद्धाच्या वेळी सरकारने केलेला भारतीय निधीचा अपव्यय, परदेशी कापडाच्या आयातीवर घटविलेला आयात कर, दुष्काळाबाबतचे शासनाचे औदासिन्य इ. विषयावर लोकमत जागृत करण्यात या संस्थेला यश मिळाले. थोडक्यात, भारताच्या राजकीय चळवळीला व्यापक राष्ट्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करणारी पहिली संघटना म्हणून इंडियन असोसिएशनचे स्थान भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात महत्त्वाचे मानले जाते.

**मुंबई प्रांतातील राजकीय संघटना**

**बॉम्बे असोसिएशन**

बंगालप्रमाणेच मुंबई इलाख्यातही राजकीय जागृतीची सुरुवात झाली होती. त्यामध्ये जगन्नाथ शंकरशेट यांच्या पुढाकाराने मुंबईतील काही सुशिक्षित, उत्साही तरुणांनी एकत्र येऊन 'बॉम्बे असोसिएशन' नावाची संस्था मुंबई येथे सन १८५२ मध्ये स्थापन केली. जनतेचे प्रश्न, अडचणी सरकार पर्यंत पोहोचविणे आणि सनदशीर

मार्गाने सोडविणे असे संस्थेचे उद्देश होते. मुंबईतील पारशी, मुसलमान, हिंदू, पोर्तुगीज, ख्रिश्चन इ. विभिन्न धर्मगटांचा या संस्थेला पाठिंबा होता. भारतीयांच्या अडचणी राज्यकर्त्यांच्या कानी घालून त्या सोडविण्याचा प्रयत्न ह्या संस्थेचा होता. सन १८५३ साली ब्रिटिश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचे नूतनीकरण करणार हे ध्यानात घेऊन सन १८५२ मध्ये कंपनी सरकारच्या धोरणावर प्रखर टीका करणारे आणि भारतीयांच्यासाठी अधिकाराची मागणी करणारे एक लांबलचक निवेदन तयार करून ते त्यांनी पार्लमेंटला सादर केले. या निवेदनातील विचार इतकी सुसूत्रपणे व तर्कशुद्ध मांडले होते की इंग्लंडचे उदारमतवादी पुढारीही प्रभावित झाले. नोकरीत भारतीयांना उच्चपदे मिळावीत अशा मागण्याही ह्या संस्थेने सरकारकडे केल्या होत्या.

**सार्वजनिक सभा**

सनदशीर राजकीय चळवळीची पायाभरणी मुंबई इलाख्यात करणारी पहिली उल्लेखनीय संस्था म्हणजे सन १८७० पासून पुण्यात कार्यरत असलेली सार्वजनिक सभा. यापूर्वीच या सभेची स्थापना १८६७ साली 'पूना असोसिएशन' म्हणून झाली होती. त्यानंतर जवळ जवळ तीन वर्षांनी त्याचे नामकरण 'सार्वजनिक सभा' म्हणून करण्यात आले. या संस्थेच्या स्थापनेच्या पुढाकारामध्ये गणेश वासुदेव जोशी यांचा सहभाग होता. त्यांना तत्कालीन काळात आणि त्यानंतरही 'सार्वजनिक काका' म्हणूनच ओळखले जाते. सार्वजनिक काका स्वतः काढलेल्या सुताचे कपडे वापरत. त्यांनी ठिकठिकाणी स्वदेशी मालाची दुकाने उघडले व स्वदेशी मालाला उत्तेजन देऊन राजकीयदृष्ट्या लोकमत जागृत करण्यास व राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यास मदत केली. पुण्याच्या जवळ असणाऱ्या मराठे राजेरजवाड्यांचा या संस्थेशी निकटचा संबंध होता. काही सरदार या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिवही होते. न्या. रानडे हे या संस्थेचे प्रेरणाशक्ती आणि सुत्रचालक होते.

सन १८७७ साली महाराष्ट्रावर दुष्काळाची छाया पडली असता या संस्थेने गावोगावी कार्यकर्ते पाठवून दुष्काळग्रस्तांना मदत देण्याचे कार्य हाती घेतले. सरकारी मदत कार्याला सहकार्य दिले. त्याचबरोबर दुष्काळ-पिडीत जनतेच्या व शेतकऱ्यांच्या मागण्या निवेदनाद्वारे शासनाला सादर करून, लोकमताचे दडपण सरकारवर आणून शेतकऱ्यांच्यासाठी सवलतीही मिळवल्या. या संस्थेच्या अविरत व निःस्वार्थ कार्यामुळे सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे सार्वजनिक सभा ही महाराष्ट्रातील लोकमान्य राजकीय संस्था बनली. तिच्या शाखा वाई, सातारा, सोलापूर, नाशिक येथेही स्थापन झाल्या. सन १८९१ ते १८९६ च्या दरम्यान गो. कृ. गोखले या संस्थेचे सचिव होते. तर सन १८९६ साली या सभेची सूत्रे टिळकांच्या जहाल गटाच्या हाती आली. त्यांनी या संस्थेचा राजकीय जागृतीसाठी अधिक हिरीरीने उपयोग करून घेतला. थोडक्यात, सार्वजनिक व राजकीय जागृतीचे जे कार्य केले व सनदशीर राजकीय चळवळीचा पाया पश्चिम महाराष्ट्रात घालून आर्थिक उन्नतीसाठी औद्योगिकरणाचा आणि स्वदेशीचा मंत्र या संस्थेने घालून दिला म्हणून सार्वजनिक सभेला आगळे स्थान आहे.

**बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन**

सन १८८५ साली फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तय्यबजी, न्या. के. टी. तेलंग यांनी ही संस्था स्थापन केली. ह्या पुढाऱ्यांचा भारतातील ब्रिटिश सत्तेची स्थापना ही ईश्वरी योजना आहे असा विश्वास होता. कारण तत्कालीन

काळात या व्यक्ती पाश्चात्य शिक्षणाने व उदारमतवादी विचारप्रणालीने प्रभावित झालेल्या होत्या. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर त्यांची श्रद्धा होती. अर्थात त्यावेळी मुंबईत अस्तित्वात असलेल्या बॉम्बे असोसिएशन व 'ईस्ट इंडिया असोसिएशन' या संस्था फारशा क्रियाशील नव्हत्या. त्यामुळे न्या. तेलंग, फिरोजशहा मेहता इ. नी नवी संस्था प्रस्थापित करण्याची गरज वाटली त्यामुळे 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन'ची स्थापना केली. या संस्थेने प्रामुख्याने ब्रिटिशांच्या शोषक धोरणावर व दडपशाहीवर टीका करीत असत. भारतीयांना स्वशासनाचे अधिकार मिळावेत ही त्यांची प्रामुख्याने मागणी होती. त्यासाठी त्यांनी सार्वजनिक सभातून भारतीयांच्या प्रश्नांची चर्चा करून राजकीयदृष्ट्या लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. तसेच जनतेच्या मागण्या निवेदन, अर्ज, विनंत्या याद्वारे सरकारला सादर करण्याचे मुख्य कार्य केले.

**मद्रास इलाख्यातील संघटना**

**मद्रास नेटिव्ह असोसिएशन**

मद्रासमध्ये सन १८५२ साली 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन'ची स्थापन करण्यात आली. बंगालमधील ब्रिटिश इंडियन असो.ची शाखा म्हणून पाहिले जात असे. या संस्थेने कंपनी सरकारच्या गैर कारभाराबाबत प्रकाश टाकणारे एक निवेदन पार्लमेंटला सादर केले होते. या निवेदनामध्ये शेतकऱ्यांवर लादला गेलेला अवास्तव कर, त्याचबरोबर महसूल अधिकाऱ्यांच्याकडून होणारी शेतकऱ्यांच्या पिळवणूक याचा उल्लेख केलेला होता. धरणे, कालवे व पूल बांधण्याची, शिक्षणप्रसाराची व स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याची मागणीसुद्धा केली होती.

**मद्रास महाजन सभा**

'मद्रास महाजन सभे'ची स्थापना सन १८८४ साली करण्यात आली होती. रंगय्या नायडू, सुब्बराव पंतलू, एम. वी. राघवाचार्य, सुब्रह्मण्यम् इ. विद्वान मंडळानी हिच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतला होता. सन १८८५ मध्ये या सभेने एक मोठी परिषद आयोजित केलेली होती. त्यामध्ये त्यांनी विधिमंडळाचा विस्तार करून त्यात भारतीय प्रतिनिधींचा अंतर्भाव करण्याचा व कार्यकारी मंडळ व न्यायमंडळाचे अधिकार वेगळे करण्याचा ठराव पास करण्यात आले होते.

## स्वयं अध्ययन प्रश्न १

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'जमिनदारांची संघटना' ............. साली स्थापन करण्यात आली.

(अ) सन १८३७ (ब) सन १८३८ (क) सन १८३९

२. ............. हे इंडियन असोसिएशनचे संस्थापक होते.

(अ) दादाभाई नौरोजी (ब) सुरेंद्रनाथ बॅनर्जी (क) लॉर्ड वेडनबर्ग

३. 'बॉम्बे असोसिएशन'ची स्थापना ............. या ठिकाणी झाली.

(अ) बंगाल (ब) मद्रास (क) मुंबई

४. सार्वजनिक सभेची स्थापना ............ यांनी केली.

(अ) न्या. रानडे (ब) न्या. तेलंग (क) गणेश वासुदेव जोशी

५. मद्रास नेटिव्ह असोसिएशनची स्थापना ............ साली झाली.

(अ) सन १८५२ (ब) सन १८५३ (क) सन १८५४

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. राष्ट्रवाद म्हणजे काय ?

२. भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) स्थापना किती साली झाली ?

३. सन १८३६ ला बंगालमध्ये कोणत्या संघटनेची स्थापना झाली ?

४. ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना कोणत्या देशात करण्यात आली ?

५. 'इंडियन लीग'ची स्थापना कोणत्या व्यक्तीने केली ?

## १.२.२ काँग्रेसची स्थापना

सन १८५७ च्या महान उठावानंतरच्या पुढील २५-३० वर्षांचा काळ हा राष्ट्र-जागृतीचा आणि राष्ट्रवादाचा प्रारंभिक आणि विकासाचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात खालील शिक्षित लोकांमध्ये झपाट्याने जागृती झाली. वेगवेगळ्या प्रांतात राजकीय संघटनांची स्थापना करण्यात आल्या होत्या. या संघटनांनी आपापल्या प्रदेशात राष्ट्रीय जागृती मोठ्या प्रमाणात केली. त्यामुळे व्यापक राष्ट्रीय कार्यक्षेत्राची गरज जाणवू लागली. याच जाणिवेतून सन १८८५ साली अखिल भारतीय स्तरावर राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली. या काँग्रेसने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत शेवटपर्यंत देशाचे नेतृत्व केले. त्यामुळेच 'काँग्रेसची स्थापना' भारताच्या इतिहासातील क्रांतिकारक घटना म्हणून मानली जाते. अर्थात अशा घटना आकस्मिक घडत नसून पाठीमागे वर्षानुवर्षांची पार्श्वभूमी असते. अनेक कारणांची परंपरा असते. अशा घटनांची बीजे काळात ओघात वर्षानुवर्षे दडलेली असतात. काँग्रेसच्या स्थापने ही हाच सर्वसामान्य ऐतिहासिक नियम लागू असलेला दिसतो. आधुनिक भारतात काँग्रेसच्या स्थापनेला प्रमुख्याने पुढील गोष्टी कारणीभूत ठरल्या.

### पाश्चात्य शिक्षण

ब्रिटिश प्रशासनाच्या काळात त्याच्या शैक्षणिक धोरणामुळे इंग्रजी शिक्षण हे भारतीयांच्यासाठी एक वरदानच ठरले होते. अर्थात इंग्रज शिक्षणाचा आरंभ १८व्या शतकाच्या शेवटी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केला असला तरी त्यास खरी चालना मिळाली ती सन १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉलेने केलेल्या पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावी

पुरस्कारानंतर त्यामुळे भारतीय तरुणांना, रुसो, व्हॉल्टेअर, मिल, बर्क इ. पाश्चात्य विचारवंताचे तत्त्वज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळाली आणि त्यांची वैचारिक प्रगल्भता वाढू लागली. तसेच युरोपियन राष्ट्रांच्यामध्ये असलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, उदारमतवाद, मानवतावाद, राष्ट्रवाद इ. संकल्पना यांचा परिचय होऊ लागला. त्याचे महत्त्व जाणवू लागले. ती राष्ट्रे आणि त्यांचे विकास आणि भारताच्या मागासलेपणा याचा तुलनात्मक अभ्यास होऊ लागला. परिणामी त्याची वैचारिक भूमिका तयार होऊ लागली. त्यांनी भारतामध्ये पाश्चात्य विचारसरणी येऊन भारताचा मागासलेपणा घालवून विकास घडवून आणण्याची मागणी सुरू केली. समाजसुधारक चिपळूणकरांनी म्हटल्याप्रमाणे 'इंग्रजी शिक्षण' हे भारतीयांना लढावू राष्ट्रवादाचे बाळकडू पाजणारे वाघिणीचे दूध ठरले. पाश्चात्य राष्ट्रांच्यामध्ये झालेल्या भौतिक, औद्योगिक, शास्त्रीय, तांत्रिक व वैज्ञानिक विकासाची माहितीही भारतीयांना झाली. त्यामुळे भारतातही या सर्व बाबींचा स्वीकार होऊन भारताने आधुनिकतेकडे वळावे अशी जिद्द त्यांच्यात निर्माण झाली. परंतु इंग्रजाचा हा हेतू नव्हता. त्यांना खंडप्राय असणाऱ्या भारताचा राज्यकारभार चालविण्यासाठी एतद्देशियांची मदत हवी होती. त्यांना गरज असल्यामुळे बऱ्याच उलटसुलट चर्चेनंतर त्यांनी इंग्रजी शिक्षणास सुरुवात केली होती.

इंग्रजी शिक्षणाचा भारतीय तरुणांच्यावर झालेला एक चांगला परिणाम म्हणजे काही महत्त्वाकांक्षी तरुण उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जावून विद्यासंपादन करू लागले. तेथील वास्तव्यात इंग्लंडमध्ये प्रचलित असलेली उदारमतवादी तत्त्वप्रणाली आणि शासनव्यवस्था तसेच भारतातील ब्रिटिशांची शासनपद्धती यामध्ये असलेली प्रचंड तफावत त्यांच्या लक्षात आली. त्या संदर्भात ते स्पष्टपणे बोलू लागले. त्यामुळे भारतीयांना न्याय अधिकार मिळवून घ्यावयाचे असतील तर ते आंदोलनाच्या मार्गानेच मिळवावे लागतील. याची तीव्रतेने जाणीव झाली. आणखी एक महत्त्वाचा फायदा या इंग्रजी शिक्षणाने भारतीयांना झाला तो म्हणजे वैचारिक देवाण-घेवाणीसाठी आवश्यक असलेल्या समान भाषा माध्यमाची भारतातील वेगवेगळ्या प्रांतात भिन्न जाती व संप्रदाय तसेच भिन्न भाषा प्रचलित असल्यामुळे असा समान भाषेचा दुवा अस्तित्वात नव्हता. त्यामुळे परस्पर संपर्क करणे कठीण होई. इंग्रजी भाषेने ही अडचण दूर केली. या माध्यमाने परस्पर संपर्क साधने, एकमेकांच्या अडचणी जाणून घेणे व त्यावर परस्पर विचारविनिमय करणे सुशिक्षितांना शक्य झाले. परिणामी भारतीयाना राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करणे गरजेचे वाटू लागली.

**धार्मिक व सामाजिक प्रबोधन**

पाश्चात्य ज्ञानाने प्रभावित झालेली परंतु देशाच्या उद्धाराची तळमळ असलेली सुशिक्षितांची पिढी पाश्चात्य विचारप्रणालीच्या आधाराने भारतीय समाजाची पुनर्रचना करणे अत्यंत गरजेचे आहे याची जाणीव होऊन ते कार्यरत बनले. परंतु सुरुवातीस पाश्चात्य शिक्षणाने भारतीय तरुणांची एक पिढी इतकी भारावून गेली होती त्यांनी भारतीय गोष्टींना त्याज्य ठरवून भारतीय समाजापासून फटकून राहण्यात व पाश्चात्यांचे अंधानुकरण करण्यास व त्यांच्यासारखे जीवन जगण्यामध्ये ते धन्यता मानू लागले. परंतु त्यांची ही विचारणी फार काळ तग नाही धरू शकली. यावरून सर्वच आंग्ल शिक्षित भारतीयांच्यात सुधारणांच्या बाबत एकमत नव्हते. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारताच्या प्राचीन संस्कृतीच्या पुनरुत्थानाच्या समाजाची प्रगती साधने शक्य आहे असे

मानणारा एक गट पुढे येऊ लागला. भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनाची प्रेरणा प्राचीन भारतीय संस्कृतीत शोधणारा हा गट 'पुनरुज्जीवनवादी' म्हणून ओळखला जातो. या गटाने तत्कालिक काळात भारतावरील पाश्चात्य संस्कृतीचे अतिक्रमण थोपवून धरण्याचे तसेच भारताच्या गतकालीन वैभवाची जाणीव करून देऊन भविष्यकाळही तितकाच उज्वल असल्याचा स्फूर्तिदायक संदेश देवून चेतनाहीन भारतीय समाजात नवे संजीवन ओतण्याचे मौलिक कार्य या गटाने केले. त्यामुळे त्यांची ही कामगिरी भारतीयांच्यात स्वाभिमानाची भावना जागृत करण्याच्या दृष्टीने अत्यंत मोलाची ठरली. त्यामुळे पं. नेहरूंनी केलेले पुढील विधान संयुक्तिक वाटते. त्यांच्या मते, 'भारतीय प्रबोधनाच्या दोन प्रेरक शक्ती होत्या. पहिली पाश्चात्योन्मुख सुधारणावादाची आणि दुसरी भारतीय प्राचीन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची'.

### धार्मिक व सामाजिक प्रबोधन

या काळात भारतीय समाजात जातिसंस्था व कडक जातिनिर्बंधाना विशेष महत्त्व मिळालेले दिसते. भौतिक विद्या, बुद्धिप्रामाण्यवाद यापेक्ष सामाजिक जीवनातही परंपरेला, ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्त्व दिलेले होते. आध्यामिक व धार्मिक आचारांचा प्रभाव तत्कालीन समाज जीवनावर पडलेला दिसतो. जातिसंस्थेमुळे समाजाचे निरनिराळ्या गटात विभाजन झाले. एका जातीत अनेक उपजाती निर्माण झाल्या. या जातीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरविलेले असल्याने प्रत्येक जातीला समाजात विशिष्ट स्थान मिळाले. सामाजिक एकतेची किंवा अभिसरणाची प्रक्रिया नष्ट झाली. जातिसंस्थेची बंधने कडक होती. परदेशगमन, इतर जातींबरोबर रोटी-बेटी व्यवहार निषिद्ध मानलेले होते. यांचे उल्लंघन केल्यास सामाजिक बहिष्कार टाकला जाई. तत्कालीन कनिष्ठ जातीतील समाजाची अवस्था अतिशय दयनीय झाली. अस्पृश्यमधून मानल्या गेलेल्या जातीतील समाजाचे जीवन अतिशय कठीण अवस्थेचे होते. शिक्षणाचा अधिकार त्यांना नव्हताच. या काळातील स्त्रियांची स्थिती करुणाजनक होती.

तसेच या काळातील समाजजीवनावर धार्मिक विचारांचा व आचारांचा प्रभाव होता. धार्मिक जीवनातील मूलभूत तत्त्वे बाजूला पडली. धार्मिक आधार परंपरा व्रतवैकल्य व साचेबंद स्वरूपाचे कर्मकांड यांना महत्त्व मिळाले. या परिस्थितीत बदल झाला तो ब्रिटिश राजवटीत. ब्रिटिशांनी भारतात आपली राजवट स्थिर केल्यामुळे या देशातील लोकांचा पाश्चात्य संस्कृतीशी सर्वांग संपर्क प्रस्थपित झाला. काही गव्हर्नर जनरलनी येथील जनतेला शिक्षण देण्याबरोबरच समाजात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या बदल्यांच्यामुळे धार्मिक, सामाजिक जीवनावर परिणाम होऊ लागले. दरम्यानच्या काळात मिशनरी, शासन व काही स्थानिक संस्था यांच्या प्रयत्नामुळे नवविद्या-विभूषितांचा एक जागृत वर्ग निर्माण झाला. समाजाची झालेली अधोगती त्यांच्या लक्षात आली. धार्मिक व सामाजिक सुधारणेविषयी विचार मांडून चळवळी सुरू केल्या. त्यामध्ये राजा राममोहन रॉय, ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, थिऑसॉफीकल सोसायटी, सत्यशोधक समाज इ. नी तसेच वैयक्तिक स्तरावर देखील मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले. त्यांचे कार्य समाजात प्रबोधन करणारे ठरले.

### मध्यमवर्गाचा उदय

ब्रिटिश कालखंडात महत्त्वाचे स्थित्यंतर घडून आले ते म्हणजे मध्यमवर्गाचा झालेला उदय. या वर्गाने भारतीय राष्ट्रवादाच्या उदयास मोठ्या प्रमाणात हातभार लावला. पाश्चात्यांच्या आधुनिक विचार प्रणालीने

प्रभावित झालेल्या या वर्गाने सर्वांगीण सुधारणेच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली. ब्रिटिश शासनाच्या आरंभी हा वर्ग पाश्चात्य विचारप्रणालीने प्रभावित झाला होता. त्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधात जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. एवढेच नव्हे तर १८५७ च्या उठावाकडे पाहण्याची त्यांची भूमिकाही तटस्थतेची दिसून येते. परंतु ब्रिटिश शासनाचे खरे स्वरूप हे शोषक आणि अन्यायी असल्याचे अनुभवाने लक्षात येऊ लागले. तेव्हा जुलमी परकीय राजसत्तेला विरोध करण्यास पुढे येऊ लागला. साधारणतः १८७० नंतर राष्ट्रीय भावनेचा उदय याच वर्गात प्रकर्षाने दिसून येऊ लागला. याच वर्गाने भारतीयांच्या पुढे ब्रिटिशांच्या कडून होणाऱ्या अन्यायाचे आकडेवारीसहित पुरावे देऊन लोकमत राजकीयदृष्ट्या जागृत करण्याचे व सनदशीर मार्गाने राजकीय चळवळीचा श्रीगणेशा करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. पुढील काळात याच वर्गाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. हा मध्यम वर्ग कित्येक वर्षे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा कणा बनला होता.

**ब्रिटिश राजसत्तेविरुद्धचा असंतोष**

ब्रिटिश राजवटीमुळे भारतीयांचे स्वातंत्र्य नष्ट झाले होते. त्यांचे साम्राज्यवादी धोरण हळूहळू भारतीयांच्या नजरेत येऊ लागले होते. अर्थात परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली राहण्याचा अनुभव यापूर्वीही भारतीयांनी घेतला. उदा. मुघल कालखंडात परंतु केंद्रिय सत्ता ब्रिटिशांनी प्रथम भारतात स्थापन केली. वेगवेगळ्या प्रांतातील विभिन्न जातीय, धार्मिय भारतीयांना ब्रिटिश सत्तेने एकाच केंद्रिय सत्तेखाली नियंत्रित केले होते. त्यांच्या प्रशासनात सर्वांना समान नियम, समान कायदा, समान नीति लागू करण्यात आल्यामुळे सर्व भारतीयांना समान अडचणींचा, समस्यांचा जुलमी धोरणाचा सामना करावा लागला व त्यामुळे सर्व भारतीय लोक एकाच जुलमी सत्तेच्या वटवंट्याखाली भरडले जात आहेत ही जाणीव निर्माण होऊन १९व्या शतकापर्यंत भारतीयांच्यात नसलेली एकत्वाची भावना जागृत होऊ लागली. म्हणजेच (एकराष्ट्रीयत्वाची जाणीव दृढमूल होत गेली आणि सर्वांचे समान शोषण करणाऱ्या परकीय राजवटीविरुद्ध एकत्र येऊन लढा देण्याची निकड भारतीयांना जाणवू लागली.

अर्थात स्वातंत्र्याची आकांक्षा ही मानवी मनाची नैसर्गिक भावना आहे. या स्वातंत्र्यावर निर्बंध घालणाऱ्या शक्तीला प्रतिकार करणे ही स्वाभाविक मानवी प्रतिक्रिया होती. ब्रिटिश राजवटीत सतत राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यातील दरी सतत वाढत चालली होती. त्यामुळे जुलमी शोषक परकीय सत्ता उलथून टाकून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी काहीवेळा सशस्त्र प्रतिकारही करण्यात आले. परंतु त्याचा परिणाम झाला नाही म्हणून शांततापूर्ण सनदशीर चळवळीचा विचार मूळ धरू लागला आणि या मार्गाचा अवलंब करून राष्ट्रीय स्तरावर कार्य करणारी काँग्रेस ही संघटना उदयास आली आणि तीने टप्प्या-टप्प्याने राष्ट्रीय चळवळीस चालना दिली.

**आर्थिक शोषण**

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी अतिशय संपन्न व समृद्ध म्हणून जगात प्रसिद्ध असणारा हिंदुस्थान त्याच्या आगमनानंतर एका शतकाच्या आत दारिद्र्य, बेकारी, उपासमार यास तोंड देऊ लागला होता. यांचा अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनातून काही सुशिक्षित भारतीय करू लागले. तसे त्यांच्या लक्षात येऊ लागले की ग्रामीण भागातील वाढत्या आर्थिक हलाखीचे, कर्जबाजारीपणाचे मूळ बिटिशांनी लावलेल्या अवास्तव शेतसाऱ्यात,

त्यांनी सुरू केलेल्या कायमधारा व रयतवारी पद्धतीत आहे. १७ व्या शतकापर्यंत हस्तव्यवसायासाठी व कलाकौशल्याच्या कामगिरीसाठी जगात प्रसिद्ध असलेल्या, शतकानुशतके व्यापार, उदीम मध्ये भरभराटीस असलेला देश एका शतकात दारिद्र्याच्या गर्तेत लोटला जाण्यास ब्रिटिशांचे शोषक, व्यापारी, धोरण कारणीभूत असल्याची त्यांना जाणीव झाली. देशातील भरमसाठ संपत्ती नानाविध मार्गांनी लुटून इंग्लंडला नेली जात आहे. भारतीय हस्तउद्योग व्यापार उदीम हेतूपुरस्सर दडपले जात असून भारतातून कच्च्या मालाचा ओघ इंग्लंडकडे वळवून तेथील पक्का माल भारतावर लादला जात आहे. भारतात अठराव्या शतकापर्यंत अस्तित्वात असलेली स्वयंपूर्ण अर्थरचना नष्ट करून ब्रिटिश औद्योगिक साम्राज्यवादाने भारताला आपल्या आर्थिक वसाहतवादाने भक्ष्य बनविले आहे याची स्पष्ट जाणीव सुशिक्षित भारतीयांना होऊ लागली.

सन १८५८ नंतर ब्रिटिशांचे अर्थशोषणाचे मार्ग जसे वाढू लागले आणि सतत दुष्काळाचे साम्राज्य भारतीय समाजावर पसरू लागले तसे ब्रिटिश शासनाच्या शोषक नीतीच्या दुष्परिणामांचे विश्लेषण उघडपणे वृत्तपत्रातून कोठे जावू लागले. या क्षेत्रात दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, रमेशचंद्र दत्त यांनी केलेली कामगिरी अतिशय मोलाची ठरते. त्यांनी आकडेवारीच्या साहाय्याने ब्रिटिशांच्या शोषक नीतीचे दुष्परिणाम विशद करून भारतीयांचे आर्थिक हितसंबंध व ब्रिटिश साम्राज्यवादी सरकारचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत. इंग्लंडच्या आर्थिक पोषणासाठी भारताची लूट केली जात आहे. त्यामुळे परकीय छत्राखाली भारताची आर्थिक उन्नती होऊ शकेल अशी आशा भ्रममूलक असून भारतीयांनी स्वावलंबनाचा मार्ग पत्करणे निगडीचे आहे. या आर्थिक शोषणाच्या जाणिवेतूनच राष्ट्रीयत्वाची बीजे भारतीय समाजात रोवली गेली. त्यातूनच राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली गेली.

**भारतीय वृत्तपत्रे**

ब्रिटिश राजवटीकडून होणारा राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक इ. मार्गाने होणारा अन्याय भारतीय समाजा-समोर पुराव्यानिशी आणून त्यांच्यात राष्ट्रवाद जागृत करण्यामध्ये भारतातील तत्कालीन वृत्तपत्रांनी फार मोठे योगदान दिले आहे. वृत्तपत्र व्यवसाय ही लोकमत जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण साधन मानले जाते. थॉमस मन्रो सारख्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भारतात मुद्रणस्वातंत्र्य देणे विघातक ठरेल असा इशाराही दिला होता. सुदैवाने कंपनीच्या काळातच भारताला मुद्रणस्वातंत्र्य मिळाले. सन १८५७ च्या उठावानंतर वृत्तपत्रांची संख्या वाढली. भारतातील वेगवेगळ्या प्रांतांच्यामध्ये तेथील स्थानिक भाषांच्यामध्ये वृत्तपत्रे प्रकाशित होऊ लागली. त्या भिन्न भाषांच्यामध्ये प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांची संख्या १४७ होती. वृत्तपत्रांनी ब्रिटिश शासनाची अन्यायी वृत्ती, मोठ्या प्रमाणात केली जाणारी आर्थिक लूट, धार्मिक भावना दुखविण्याचे धोरण इ. मुळे भारतीयांच्या मनात असलेला असंतोष प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न सातत्याने केला. त्यामध्ये मुंबई इलाख्यातील केसरी, मराठा, काळ, ज्ञानप्रकाश तर बंगालमधील हिंदू पेट्रिअट, बंगाली, अमृतबझार पत्रिका, इंडियन मिरर आणि मद्रास मधील 'द हिंदू' ही वृत्तपत्रे राजकीय जागृतीच्या बाबतीत आघाडीला होती. अर्थात यामुळे ब्रिटिश सत्ता अस्वस्थ होऊ लागली. 'स्वतंत्रता' नावाच्या वृत्तपत्राने १८७८ सली 'ब्रिटिशांनी लादलेली गुलामगिरी फार काळ टिकणार नाही. स्वातंत्र्य हाच सुखाचा व यशाचा बाले किल्ला आहे' असे मत मांडून स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून

देण्याचा प्रयत्न केला. बंगालमधील 'अमृतबझार पत्रिकेने' 'एका राष्ट्राचे रक्तशोषण करून त्याला शक्तिहीन बनविणे हा एक सामान्य ब्रिटिश अधिकाऱ्यांवर विषप्रयोग करण्यापेक्षा कितीतरी अधिक गंभीर गुन्हा आहे असे भाष्य वर्तवून ब्रिटिशांना टोला हाणला. थोडक्यात राजकीय जागृतीस आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेस मोठ्या प्रमाणात वृत्तपत्रांनी हातभार लावला.

**वंशविद्वेषी धोरण**

ब्रिटिशांनी स्वीकारलेले 'वंशविद्वेषी धोरण' भारतीयांच्यात राष्ट्रीय भावना जागृत करण्यास व राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेस उपयुक्त ठरले. ब्रिटिश अधिकारी वर्ग, राज्यकर्ते यांना स्वतःच्या आपली संस्कृती आणि वंशश्रेष्ठत्वाचा जास्त अभिमान होता. परंतु भारतीयांना ते कमी लेखत मग तो कितीही प्रतिष्ठित, सुसंस्कृत, उच्च घराण्यातील किंवा उच्च पदावर असोत. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात हे प्रमाण कमी होते. परंतु त्यानंतर १९५८ नंतर हे प्रमाण जास्त वाढले. याचा परिणाम म्हणजे राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यात दरी वाढत चालली. रस्त्याने गोरा माणूस दिसला की समोरून येणाऱ्या भारतीयांनी त्यांना लवून सलाम ठोकावा ही ब्रिटिशांची अपेक्षा होती आणि तसे न केल्यास त्याचा दंड त्या भारतीयाला सोसावा लागे. गोऱ्या मळेमालकाकडून भारतीय मजुरांना होत असलेली मारहाण गोऱ्या अधिकाऱ्यांनी व सैनिकांनी हाताखालील भारतीय कर्मचाऱ्यांचा चालविलेला अमानुष छळ व स्त्रियांनी केलेली बेअब्रू, सार्वजनिक जागीही सुशिक्षित भारतीयांनी मानहानी या गोष्टी नित्याच्या होऊन बसल्या. अशा अनेक घटनांचा उल्लेख ब्रिटिशांच्या लिखाणात आढळून येतो. त्याचप्रमाणे हेन्री कॉटन यांचे 'इंडियन अ‍ॅण्ड होम मेमरीज' यांचे 'इंडिया अंडर रीपन' या पुस्तकातील उद्धृत केलेले प्रसंग कोणत्याही स्वाभिमानी व्यक्तीला चीड आणणारे आहेत. राष्ट्रपती म. गांधी यांनाही मानहानीचा प्रसंग सोसावा लागला. न्याय खात्यातही वांशिक पक्षपात केला जात असे. गोरे किंवा ब्रिटिश न्यायाधीश गंभीर गुन्हे केलेल्या गोऱ्या लोकांना कायद्याच्या कचाट्यातून सहिसलामत सोडवत असत. याचे पुरावे अनेक ब्रिटिश लेखक, उदा. ब्लंट, कॉटन, मॉरिसन इ.नी दिलेली आहेत. परकीय राज्यकर्त्यांच्या कडून भारतीयांना निःपक्षपातीपणे न्याय मिळण्याची शक्यता नाही असे ठाम मत वृत्तपत्रातून जाहीर होऊ लागले. त्यामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या न्यायप्रियतेवरील भारतीयांचा विश्वास उडू लागला. या अपमानास्पद पक्षपातामुळे भारतीयांची मने डिवचली गेली अशा राज्यकर्त्यांच्या विरोधात चळवळ उभारण्याची गरज त्यांना वाटू लागली.

भारतीयांना हीन लेखून त्यांना प्रशासनापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केलेला दिसून येतो. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात लॉर्ड हेस्टिंग्ज, लॉर्ड कॉर्नवालिस यांनी भारतीयांच्या पात्रतेबाबत अनेकवेळा संशय व्यक्त केलेला दिसून येतो. त्यांना शासकीय नोकऱ्यांमध्ये घेण्यास त्यांनी नकार दिला होता. त्यानंतर १८५७ च्या उठावानंतर सन १८५८ च्या कायद्याने जाहीरनामा काढून भारतीयांच्या बाबत कोणत्याही प्रकारचा पक्षपात केला जाणार नाही असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांना दडपून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न असे. भारतीयांना मुलकी सेवेत घेण्यासाठी किंवा त्यांची नियुक्ती करण्यासाठी स्पर्धा परीक्षा फक्त इंग्लंडमध्येच होत असत. या परीक्षांना त्यांना बसता येऊ नये असे नियम केले जात. या नियमांचे पालन करून जे भारतीय तरुण या परीक्षांमधून उत्तीर्ण झालेच तर त्यांची नेमणूक अडचणीच्या ठिकाणीच केली

जाई. या अन्यायी ब्रिटिश धोरणांच्यामुळे भारतीयांच्या मनात असंतोष निर्माण होऊन आपले प्रतिनिधित्व करणारी एक अखिल भारतीय स्तरावर संघटना असावी असे प्रयत्न सुरू होऊन राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली.

**दळणवळणाची साधने**

ब्रिटिश भारतावर आपले कायमस्वरूपी नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांना भौगोलिकदृष्ट्या भारतीय प्रदेश एकत्र आणणे सोयीचे होते तसेच भारतातील विविध प्रदेशात विखुरलेल्या प्रदेशातील लोकांशी संपर्क साधणेही गरजेचे होते. त्यासाठी भारतात दळणवळणाची साधनांची निर्मिती करणे आवश्यक होते. त्यासाठी ब्रिटिशांनी लोहमार्गांचे जाळे देशभर विणण्याचा उपक्रम हाती घेतला. त्यामुळे ब्रिटिश प्रशासनाचे नियंत्रण भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचण्यास सहज शक्य झाले. देशातील दळणवळण वाढले प्रवास सुरक्षित व सोयीचा झाला. कमी वेळात एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जाणे शक्य झाले. लोहमार्गाप्रमाणे टपाल व तारायंत्रामुळे परस्पर संबंध वाढण्यास मदत झाली. अर्थात ब्रिटिशांच्या बरोबरच भारतीयांनाही या सुधारणाचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला. एका प्रांतातील घटना दुसऱ्या प्रांतातील नागरिकांना कळू लागल्या आणि त्यामुळे एकीची भावना वाढीस लागण्यास मदत झाली. भारतीय प्रदेश व व्यक्ती एकसंघ होऊन त्यांच्यातील राष्ट्रीय भावना अधिक तीव्र होत जावून एकादी अखिल भारतीय स्तरावर सर्वांचे नेतृत्व करणारी संघटना अस्तित्वात येणे अत्यंत गरजेचे आहे याची जाणीव होऊन राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.

**भारतीय साहित्य**

तत्कालीन भारतीय साहित्यिकांनी केलेल्या लिखानामुळे किंवा साहित्य निर्मितीमुळे भारतीयांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत होण्यास मोठी मदत झाली. चिपळूणकरांसारख्या व आगरकर इ. नी भिन्न विषयावर अभ्यासपूर्ण निबंध लिहून ब्रिटिश शासनाच्या शोषक धोरणावर प्रकाश टाकला. इतिहासकार ग. ह. खरे, वि. का. राजवाडे, न्या. रानडे, पारखनीस इ. सारख्या इतिहासकारांनी परकीयांनी लिहिलेला भारताचा इतिहास हा चुकीचा असल्याचे प्रतिपादन केले. एवढेच नव्हेतर संशोधनात्मक लिखाण करून परकीयांच्या इतिहासातील चुका दाखवून देण्यात आल्या. काहींनी इंग्रजी भाषेतील विचारप्रवर्तक ग्रंथाचे भारतीय भाषात अनुवाद करून ते प्रेरक विचार भारतीय वाचकांपर्यंत पोहोचविले. त्यामध्ये बंगालमधील बंकीमचंद्र ईश्वरचंद्र विद्यासागर, दीनबंधू मित्र, अक्षयकुमार दत्त इ. चे कार्य उल्लेखनीय मानले जाते. बंकीमचंद्र यांचे आनंदमठ, दुर्गेश, नंदिनी ह्या कलाकृती विशेष गाजल्या. 'आनंदमठ' मधील 'वंदे मातरम' हे गीत स्वातंत्र्यलढ्यातील काळामध्ये प्रेरणास्रोत बनले होते. महाराष्ट्रातील श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या नाटकांनीही ऐतिहासिक आणि पौराणिक कथांच्या आधारे असे प्रभावी लोकजागृतीचे कार्य केले आहे. तत्कालीन भारतातील साहित्यिक साहित्याच्या क्षेत्रातील राष्ट्रवादी प्रचाराचे अग्रदूत ठरले. थोडक्यात, साहित्याच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रवादाच्या जागृतीचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले.

**राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना**

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यास आवश्यक अशी पार्श्वभूमी तयार झाल्यानंतर ती प्रत्यक्षात स्थापना करण्यासाठी ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये निवृत्त ब्रिटिश सनदी अधिकारी सर ॲलन

ऑक्टेव्हिएन ह्युम यांचे नाव प्रथम घ्यावे लागते. ए. ओ. ह्युम हे पंजाबचे माजी ले. गव्हर्नर व गव्हर्नर जनरल सेक्रेटरी होते. उदारमतवादी विचारसरणीचे असल्यामुळे त्यांना हिंदी लोकांच्याबद्दल सहानुभूती होती. हिंदी लोकांना सन्मानाने वागवावे, त्यांचा प्रशासना सहभाग असावा अशी त्यांची इच्छा होती. ग. ज. लिटनच्या जुलमी कारभारामुळे भारतातील लोकांच्यात असंतोष निर्माण होऊन त्याचा परिणाम बंडात किंवा उठावात होईल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. तसे झाल्यास नाहक ब्रिटिश बायका-मुले बळी पडतील हे टाळण्यासाठी त्यांनी दूरदृष्टीने भारतीय लोकांच्या असंतोषास योग्य मार्गाने नेण्यासाठी सुशिक्षित भारतीय लोकांची संघटना तयार केली. सामाजिक प्रश्नांसाठी महत्त्वाच्या भारतीय सुशिक्षितांना एकत्र आणणे हा उद्देश होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश येऊन सन १८८४ ला 'इंडियन नॅशनल युनियन' ही देशव्यापी संघटना स्थापन झाली. तिच्या सर्वत्र शाखा निघाल्या. भारतातील प्रमुख नेत्यांच्यापैकी सुरेंद्रनाथ बॅनर्जी व आनंदमोहन या दोघांनी भारतातील सर्व प्रमुख नेत्यांची सभा २२ डिसेंबर, १८८५ रोजी पुणे येथे बोलावली होती. सभेचे यजमानपद पुण्याच्या 'सार्वजनिक सभे'कडे होते. परंतु याच वेळी पुण्यात कॉलराची साथ सुरू झाली. त्यामुळे ही सभा मुंबई येथे २८ डिसेंबर, १८८५ रोजी झाली. याच सभेत २८ डिसेंबर, १८८५ रोजी झाली. याच सभेत २८ डिसेंबर, १८८५ रोजी अधिकृतपणे 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'ची स्थापना झाली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन मुंबई येथे २८ डिसेंबर १८८५ रोजी बॅ. उमेशचंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या अधिवेशनात भारतातून एकूण ७२ प्रतिनिधी उपस्थित होते.

### राष्ट्रीय काँग्रेसची उद्दिष्टे

उमेशचंद्र बॅनर्जी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय काँग्रेसची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगितले.

१. महत्त्वाच्या व निकडीच्या प्रश्नांवरील लोकांच्या मागण्या एकत्रित करून त्या सरकारपुढे मांडणे.

२. देशातील विविध भागातील राष्ट्रवादी राजकीय कार्यकर्त्यांमध्ये मैत्री संबंध प्रस्थापित करण्यास उत्तेजन देणे.

३. देशात विविध प्रश्नावर लोकमत तयार करणे व त्यांना एकत्रित करणे. पहिल्या अधिवेशनानंतर राष्ट्रीय जागृती होऊ लागली तशा अनेक मागण्या पुढे येऊ लागल्या. त्यानुसार काँग्रेसच्या उद्दिष्टातही बदल होत गेले.

४. जात, धर्म, प्रांत विरहित राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचा विकास करणे.

### 'सेफ्टी व्हॉल्व म्हणून राष्ट्रीय काँग्रेस

ए. ओ. ह्युम यांनी भारतीय जनतेत असणारा असंतोष, उठाव, बंड किंवा स्फोटक स्वरूपात उग्र रूप धारण करून बाहेर पडू नये तर तो सनदशीर व शांततापूर्ण मार्गाने व्हावा अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणजेच राष्ट्रीय काँग्रेसचा उपयोग 'सेफ्टी व्हाल्व्ह' म्हणून व्हावा अशी अपेक्षा होती. अर्थात राष्ट्रीय काँग्रेसने असे काही केले नाही. उलट राष्ट्रवाद निर्माण झालेल्या भारतीय लोक राजकीय, आर्थिक, सामाजिक इ. मागण्यांसाठी प्रयत्नशील राहिले. या राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सुरुवातीस भारतातील दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशां वाच्छा, न्या. के. टी. तेलंग, पं. मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय, गोपाळकृष्ण गोखले, बाळ गंगाधर टिळक, पं. मदनमोहन मालवीय, गोपाळ गणेश आगरकर, रंगय्या नायडू, सुरेंद्रनाथ सेन, गणेश हरी जोशी, सिताराम हरी चिपळूणकर इ. नेते होते.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. सन १८७० नंतर राष्ट्रीय भावनेचा उदय ............. वर्गात प्रकर्षाने दिसून येऊ लागला.

(अ) वरिष्ठ वर्ग (ब) मध्यम वर्ग (क) कनिष्ठ वर्ग

२. भारतातील स्वयंपूर्ण असलेली अर्थरचना ............. सत्तेने नष्ट केली.

(अ) फ्रेंच (ब) पोर्तुगिज (क) इंग्रज

३. लोकमत जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून ............. यांचा उल्लेख केला जातो.

(अ) वृत्तपत्र (ब) आर्थिक शोषण (क) धार्मिक शोषण

४. हेन्री कॉटन यांनी ............. हे पुस्तक लिहिले आहे.

(अ) इंडियन ॲन्ड होम मेमरीज (ब) दि इंडियन कॉमेंट्री (क) इंडिया अंडर रिपन

५. बंकीमचंद्र यांनी ............. या महत्त्वपूर्ण साहित्यकृतीची निर्मिती केली.

(अ) दुर्गेश (ब) नंदिनी (क) आनंदमठ

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. सन १८३५ मध्ये पाश्चात्य शिक्षणाचा प्रभावी पुरस्कार कोणी केला ?

२. इंग्रजी शिक्षण हे भारती यांच्यासाठी काय म्हणून ओळखले जाते ?

३. 'भारतास मुद्रणस्वातंत्र्य देणे विधायक ठरेल' असा कोणत्या ब्रिटिश अधिकाऱ्याने इशारा दिला होता?

४. मद्रास मधील कोणते वृत्तपत्र राष्ट्रीय जागृती करण्यामध्ये आघाडीला होते ?

५. १८७८ मध्ये कोणत्या वृत्तपत्राने 'ब्रिटिशांनी लादलेली गुलामगिरी फार काळ टिकणार नाही, स्वातंत्र्य हाच सुखाचा व यशाचा बालेकिल्ला आहे' असे म्हटले आहे ?

### १.२.३ उगमस्थानाशी संबंधीत मतभेद

राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना सन १८८५ ला झाली. परंतु ही स्थापना ज्या परिस्थितीत, ज्या पद्धतीने आणि ज्या ब्रिटिश व्यक्तीच्या पुढाकाराने झाली ती म्हणजे ॲलन ऑक्टेव्हिअन ह्युम आणि त्यांची या स्थापने-मागील भूमिका याबाबत बराच उहापोह राजकीय पुढाऱ्यांनी आणि इतिहासकारांनी केला आहे. त्यासंबंधीत बरीच मतांतरे व मतभेदही दिसून येतात. तसेच तत्कालीन पुढाऱ्यांनी यासंदर्भात वेगवेगळी वक्तव्ये केलेली असल्यामुळे हा विषय अधिक वादग्रस्त बनला आहे. खरे तर भारतात ब्रिटिश साम्राज्यवादी सत्ता प्रस्थापित झालेली असताना एका सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्याने (सर ह्युम) ब्रिटिश मुत्सद्यांच्या व अधिकाऱ्यांच्या पूर्वसंमतीने राष्ट्रीय स्वरूपाची राजकीय संस्था स्थापना करण्यामध्ये हिरीरीने भाग का घ्यावा अशी शंका बऱ्याच

विचारवंताच्या मनात निर्माण होणे साहजिकच आहे. त्यामुळेच हा विषय मते-मतांतरे मतभेद यांनी एकत्रित गुंफला गेला आहे. इतिहासकार डॉ. पद्मश्री पट्टाभि-सितारामय्या यांनी 'काँग्रेसच्या स्थापनेची मूळ कल्पना कोणाची हे अजून गूढच राहिले आहे' असे मत व्यक्त केले आहे.

## राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची मूळ कल्पना कोणाची

सन १८८५ ला राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. परंतु ह्या स्थापनेची मूळ कल्पना कोणाची होती याबाबत मतभेद किंवा मतांतरे दिसून येतात. सर ह्युम यांची ही कल्पना होती की लॉर्ड डफरीन यांची होती असा प्रश्न निर्माण झाला. या संदर्भात काँग्रेसचे पहिले अध्यक्ष वोमेशचंद्र बॅनजी यांनी असे स्पष्टीकरण केले आहे की, सर ह्युम यांची आरंभीची कल्पना समाजोन्नतीसाठी राष्ट्रीय संघटना स्थापण्याची होती. परंतु लॉर्ड डफरीन यांच्या सांगण्यावरून तिला राजकीय स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला. या मताला वेडरबर्ननी लिहिलेल्या सर ह्युमच्या चरित्रातील वक्तव्याने मिळाले. या संदर्भात आणखी एक मत आपणास प्रा. सुंदर रामन यांनी दिलेले दिसून येते. हे राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनास उपस्थित होते. त्यांच्या मते, ह्युम यांना इंग्लंडमधील लोकमत जागृत करण्यासाठी तेथे अशी एक संस्था स्थापन करण्याची इच्छा होती. परंतु डफरीन यांच्या मते ब्रिटनमध्ये अशा प्रकारची संस्था स्थापन करून फारसा परिणाम होणार नाही. उलट भारतात अशा प्रकारची संस्था स्थापन झाल्यास अधिक फायदेशीर ठरेल. लॉर्ड डफरिन यांचे मत पटून ह्युम यांनी भारतात अशी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

## स्थापनेचे यश 'ह्युम' यांना जाते

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतरच्या काही कालावधीत वक्तव्यावरून त्यांना राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेस मोठा हातभार लावला असा असे दिसून येत नाही. उदा. ३० नोव्हेंबर, १९८८ रोजी सेंट ॲण्ड्र्यूज दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या समारंभाच्या भोजनाच्या वेळी तो म्हणाला, 'राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर ही संख्या सामाजिक कार्य हाती घेऊन भारतातील सामाजिक समस्या सोडवेल असे वाटत होते. कारण भारतीयांच्या असलेल्या अनेक चालीरीती व रूढी यात हस्तक्षेप सरकार करू शकत नाही. परंतु काँग्रेस सारखी संघटना या क्षेत्रात कार्य करू शकते, तथापि काँग्रेसने मात्र अशा विषयांचा विचार न करता सरकारला न रुचणाऱ्या विषयांचा खल सुरू केला आहे' यावरून राष्ट्रीय काँग्रेसने राजकीय क्षेत्रात हस्तक्षेप न करता सामाजिक क्षेत्रात कार्य करावे अशी अपेक्षा होती हे लक्षात येते. तसेच काँग्रेस पास करीत असलेल्या मवाळ स्वरूपाच्या ठरावांनाही त्याचा पत्रव्यवहार पाहिल्यास आणि त्याची काम करण्याची पद्धत लक्षात घेतल्यास त्याची नापसंती जाणवते. यावरून असे वाटते राष्ट्रीय काँग्रेसची कल्पना ह्युम यांची असावी आणि त्यास लॉर्ड डफरीन यांनी विरोध दर्शविला नसावा. तसेच सर ह्युम यांच्या सन १८८३ पासूनच्या भाषणांचा व लिखाणांचा सूर लक्षात घेतल्यास तसेच भारतातील वाढती स्फोटक परिस्थिती पाहून सर ह्युम यांना राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची अत्यंत गरज वाटू लागली व ते प्रयत्नशील बनले. रे वेडरबर्न यांचे विधान लक्षात घेतल्यास सर ह्युम यांनी राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्याची कल्पना मांडली असावी असा निष्कर्ष निघू शकतो.

### थिऑसॉफीकल सोसायटीच्या बैठकीत स्थापना

थिऑसॉफीकल सोसायटीच्या स्थापनेतील एक प्रमुख व्यक्ती श्रीमती ॲनी बेझंट यांनी एक वेगळाच मुद्दा मांडला आहे. तो म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची मूळ कल्पना मद्रास येथे भरलेल्या थिऑसॉफीकल सोसायटीच्या बैठकीला उपस्थित असलेल्या सतरा प्रमुख भारतीय पुढाऱ्यांच्या भेटीत झाला. परंतु अद्याप त्यांच्या या विधानाला पुष्टी देणारा कोणताच पुरावा उपलब्ध झाला नसल्याने त्यांचे मत ग्रहीत धरता येत नाही.

### सर ह्युम यांची नेमकी भूमिका कोणती होती

सर ह्युम यांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेसाठी जे प्रयत्न केले त्यामध्ये त्यांचा नेमका हेतू कोणता असावा ? कोणत्या उद्देशासाठी त्यांनी प्रयत्न केले असावेत याबाबत साशंकता निर्माण होते. त्यावरून

१. भारतीय नेत्यांना राजकीय व्यासपीठ मिळवून देण्याचा उद्देश होता.

२. ब्रिटिश शासनाबाबत तीव्र होत चाललेल्या असंतोषाला वाट करून देताना सनदशीर मार्गांचा अवलंब करून देणे.

३. ब्रिटिश शासनाला असणारा संभाव्य धोका नाहीसा करणे हा होता.

या सर्वांचा विचार करता सर ह्युम यांचे जे चरित्रमध्ये उद्धृत केलेल्या त्यांच्या विधानावरून भारतीयांच्या राजकीय आकांक्षांना खतपाणी घालण्यासाठी नव्हे तर भारतातील ब्रिटिश राजवटीला निर्माण होणारा संभाव्य धोका दूर करण्यासाठी भारतीयांच्यातील असंतोषाला शांततापूर्ण सनदशीर सोडवाट मिळावी (safty valve) म्हणून काँग्रेसची निर्मिती करण्याचे त्यांनी योजले असे सर्वसामान्यतः मानले जाते. या सेफ्टी व्हॉल्व्हला दुजोरा देणारे आणखी एक विधान सी. एफ. ॲण्ड्र्यूज व मुखर्जी यांनी 'राइज ॲन्ड ग्रोथ ऑफ काँग्रेस इन इंडिया' लिखित ग्रंथात 'भारतातील उदयोन्मुख महत्त्वाकांक्षी असंतुष्ट मध्यमवर्गीय सुशिक्षितांनी शेतकऱ्यांच्या बंडाचे नेतृत्व स्वीकारून राष्ट्रीय उठावाला प्रोत्साहन देऊ नये म्हणून त्यांच्या असंतोषाला राष्ट्रीय स्तरावर वाचा फोडण्यास एक व्यासपीठ निर्माण करणे ह्युमना आवश्यक वाटले असे म्हटले आहे. तर लाला लजपतराय यांनी 'यंग इंडिया' मधील लेखात 'भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेने प्रेरित होऊन काँग्रेसची स्थापना करण्यात आली नाही, तर काँग्रेस संस्थापकांचा प्राथमिक उद्देश ब्रिटिश साम्राज्याला उपस्थित झालेला धोका नाहीसा करण्याचा होता' असे म्हटले आहे.

### सर ह्युम यांचे उदारमतवादी धोरण

वरील सर्व विवेचनावरून सर ह्युम यांचे धोरण फक्त ब्रिटिशधार्जिणे होते असा समज नक्कीच होणारा आहे. त्यामुळे केवळ ब्रिटिश साम्राज्याच्या रक्षणाच्या हेतूने काँग्रेसच्या स्थापनेस ते प्रवृत्त झाले अशी ही शंका मनात येऊ शकते. ब्रिटिश साम्राज्याचे एक हस्तक म्हणून ते केवळ कामाला लागले असे मानणे मात्र सत्याला धरून होणार नाही. भारतीयांच्या बाबतीत त्यांना अत्यंत सहानुभूती होती. तसेच ज्यांच्यावर आपण राज्य करतो त्यांच्या कल्याणाची जबाबदारी आपल्यावर आहे याची जाणीवही ब्रिटिश शासनकर्त्यांना असली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळे शासनकर्त्यांच्याकडून भारतीयांच्यावर अन्याय होतो आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी त्यास

विरोध दर्शविला होता याचा परिणाम म्हणजे सरकारी नोकरीत असेपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची बढती मिळाली नव्हती. हे भारतीयांनी दुर्लक्षित करून चालणार नाही.

सन १८८५ ला राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. सुरुवातीच्या काळात काँग्रेसने मवाळ किंवा नेमस्त धोरण स्वीकारले होते. त्यांना सरकारला अर्ज, विनंत्या, शिष्ठमंडळे इ. पाठवून आपल्या मागण्या मान्य करून घ्यावयाच्या होत्या. सतत चार-पाच वर्षे हा मार्ग अनुसरून सरकारवर काही परिणाम होत नाही हे भारतीयांच्या बरोबरच सर हेन्री यांच्याही ही बाब लक्षात आली तेव्हा त्यांनी 'काँग्रेसने सामान्य जनतेत जागृती करण्याची मोहीम हाती घ्यावी' ही सूचना केली. परंतु अशा धाडसी सूचनेला पाठिंबा देण्यास काँग्रेसमधील वांच्छा, मेहता यासारखे नेते कचरत होते. हे विसरून चालणार नाही. यावरून भारतीयांसंबंधी त्यांनी असलेली सहानुभूती आणि भारतात विद्रोहाची स्फोटक परिस्थिती निर्माण झाल्यास ती ब्रिटिश सरकारबरोबर भारतीयांनाही हानिकारक ठरेल. त्यासाठी भारताची प्रगती सरकारच्या साहाय्यानेच सनदशीरपणे होणे अधिक श्रेयस्कर ठरेल अशी त्यांची भावना होती. त्यामुळेच या दुहेरी भूमिकेतून सर ह्युम काँग्रेसच्या स्थापनेला प्रवृत्त झाले असावेत. राष्ट्रीय काँग्रेसचा संस्थापक एक ब्रिटिश अधिकारी असल्यामुळे या संघटनेच्या कार्यात शासनाकडून अडथळे येणार नाहीत व ही संघटना अधिक विधायक कार्य करू शकेल असे वाटल्यामुळे नामदार गोखले, सुरेंद्रनाथानीही काँग्रेसमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला असावा.

### सर हेन्री आणि सुरेंद्रनाथ बॅनर्जी

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचा इतिहास अभ्यासत असताना एक बाब प्रकर्षाने लक्षात येते की, काँग्रेसच्या संस्थापकांनी सुरेंद्रनाथ बॅनर्जींना प्रारंभी हेतुपुरस्सर बाजूला ठेवले याचे कारण काय असावे ? राष्ट्रीय काँग्रेसच्या संस्था सर हेन्री हे स्थापनेच्या दृटीने प्रयत्न करीत असताना त्यांनी दादाभाई नौरोजी, मेहता, न्या. तेलंग इ. अनेक भारतीय नेत्यांची भेट घेतली. मात्र सुरेंद्रनाथ बॅनर्जींना भेटले नाहीत हे एक ऐतिहासिक सत्य आहे. तसेच त्यांना काँग्रेसच्या अधिवेशनाचे औपचारिक निमंत्रणही फार उशिरा मिळाले. खरं तर राजकीय चळवळ आयोजित करण्यातील सुरेंद्रनाथाचा पुढाकार व राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित करण्याची त्यांची धडपड सर्वांना माहीत होती. तरी सर हेन्री यांनी त्यांची भेट घेतली नाही, याचे स्पष्टीकरण करताना डॉ. आर. सी. मुजुमदार म्हणतात, 'सुरेंद्रनाथ हे जहाल विचारांचे होते. सरकारच्या काळ्या यादीत त्यांचे नाव होते. सर ह्युमनाही त्यांची राजकीय कार्यप्रणाली पटत नव्हती. म्हणून त्यांची भेट घेण्यात आली नाही. तसेच लॉर्ड डफरीनचा रागही त्यांनी २६ एप्रिल १८८६ ला लॉर्ड क्रॉसला लिहिलेल्या पत्रात व्यक्त केला आहे. परंतु सुरेंद्रनाथांनी राष्ट्रीय कार्य महत्त्वाचे मानून सन १८८६ मध्ये ते व त्यांचे सहकारी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले.

## स्वयं अध्ययन प्रश्न ३

### (अ) योग्य पर्याय निवडा.

१. 'काँग्रेसच्या स्थापनेची मूळ कल्पना कोणाची हे अजून गूढच राहिले आहे' हे मत ............. यांनी व्यक्त केले आहे.

(अ) डॉ. पट्टाभिसितारामय्या (ब) दादाभाई नौरोजी (क) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

२. 'यंग इंडिया' नावाचा ग्रंथ ............ यांनी लिहिला.

(अ) लो. टिळक (ब) लाला लजपतराय (क) दादाभाई नौरोजी

३. राष्ट्रीय काँग्रेसच्या संस्थापकांनी ............ यांना प्रारंभी हेतूपुरस्सर बाजूला ठेवले.

(अ) न्या. तेलंग (ब) ॲनी बेझंट (क) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

४. ॲनी बेझंट यांच्या मते राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची मूळ कल्पना .......... येथील थिऑसॉफीकल सोसायटीच्या बैठकीत झाली.

(अ) मद्रास (ब) मुंबई (क) कलकत्ता

५. भारतीयांच्यातील असंतोषाला शांततापूर्ण सनदशीर सोडवाट (safety valve) मिळावी असे ............ मत होते.

(अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी (ब) लॉर्ड डफरीन (क) सर ह्युम

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर काँग्रेसने सामाजिक काय हाती घ्यावे असे कोणाचे मत होते ?

२. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचे यश कोणत्या व्यक्तीकडे जाते ?

३. 'राईज ॲन्ड ग्रोथ ऑफ काँग्रेस इन इंडिया' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

४. राष्ट्रीय काँग्रेसने सुरुवातीस कोणते धोरण स्वीकारले होते ?

५. सन १८८६ मध्ये आपल्या सहकाऱ्यांसह कोण राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले ?

## २.३ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

**१. राष्ट्रभावना किंवा राष्ट्रवाद** : आपल्या देशावर असणारे प्रेम, अभिमान इ.

**२. चार्टर ॲक्ट** : ईस्ट इंडियाच्या काळात ब्रिटिश पार्लमेंट दर वीस वर्षांनी भारतीयांच्यासाठी सुधारणा कयादा जारी करत असे त्याला चार्टर ॲक्ट नावाने ओळखले जाई.

**३. सेफ्टी व्हॉल्व्ह** : म्हणजे सोडवाट – भारतीयांच्यातील असणाऱ्या असंतोषाला शांततापूर्ण सनदशीर मार्ग म्हणून राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली. ब्रिटिश आणि भारतीय यांच्यातील सेफ्टी व्हॉल्व्ह म्हणून राष्ट्रीय काँग्रेस कार्य करणार होती.

## २.४ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. सन १८३७ २. सुरेंद्रनाथ बॅनर्जी ३. मुंबई

४. गणेश वासुदेव जोशी ५. सन १८५२

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. राष्ट्रवाद म्हणजे आपल्या देशावरील प्रेम, अभिमान, जिव्हाळा इ.

२. सन १८८५ ३. वंगभाषा प्रकाशिका सभा

४. लंडन ५. शिशिरकुमार घोष

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. मध्यम वर्ग २. इंग्रज ३. वृत्तपत्र

४. इंडियन अॅन्ड होम मेमरीज ५. आनंदमठ

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. लॉर्ड मेकॉले २. वाघिणीचे दूध ३. थॉमस मन्रो

४. द हिंदू ५. स्वतंत्रता

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. डॉ. पट्टाभिसितारामय्या २. लाला लजपतराय ३. सुरेंद्रनाथ बॅनर्जी

४. मद्रास ५. सर ए. ओ. ह्युम

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. लॉर्ड डफरिन २. सर ए. ओ. ह्युम

३. सी. एफ. अॅन्ड्र्युज व मुखर्जी ४. नेमस्त/मवाळ ५. सुरेंद्रनाथ बॅनर्जी

## २.५ सारांश

सन १८७५ ते १८८५ हा काळ भारतीय राष्ट्रवादाच्या बीजारोपणाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. जनमानसात धुमसत असलेल्या प्रखर असंतोषाची तीव्र जाणीव मध्यमवर्गीय सुशिक्षितांना होऊन त्याचे पडसाद वेगवेगळ्या प्रांतात प्रामुख्याने बंगाल, मद्रास, महाराष्ट्र या ठिकाणी स्थापन झालेल्या स्थानिक राजकीय संघटना आणि त्यांचे कार्य यामधून दिसून येते. ब्रिटिश राज्य हे भारताला लाभलेले वरदान आहे ही आरंभी धारणा विरून जावून बुद्धिजीवी वर्गाचे डोळे उघडू लागले होते. ब्रिटिश राज्यात देशाचा आर्थिक विकास होईल ही सुरुवातीची भावना लयाला जावून उलट या साम्राज्यवादी शासनाने देशाची चालविलेली आर्थिक पिळवणूक जास्त धोकादायक वाटत होती. राज्यकर्त्यांनी घडवून आणलेल्या भौतिक सुधारणा त्यांनी भारतीयांच्या कल्याणासाठी नव्हे तर स्वतःच्या स्वार्थासाठी केल्या. त्यामुळे सुरुवातीस जे आधुनिकीकरण वाटले ते मुळात वसाहतीकरण होते याची जाणीव होताच ब्रिटिशनिष्ठा ढळू लागली. राष्ट्रीयत्वाचे स्पष्ट हुंकार ऐकू येऊ लागले.

भारतातील या अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे सर ए. ओ. ह्युम सारखा उदारमतवादी पण साम्राज्यनिष्ठ ब्रिटिश मुत्सद्दी अस्वस्थ झाला. या परिस्थितीवर काही विधायक तोडगा ताबडतोब शोधला नाही तर राष्ट्रीय उठाव होण्यास फार काळ राहणार नाही. यासाठी भारतीयांच्यात ब्रिटिश उदारमतवादावर व न्यायप्रियतेवर विश्वास असणारी अनेक लोक होते. त्यांचा विश्वास आणि सहकार्य मिळविणे आवश्यक होते. त्याचबरोबर त्या सर्वांना विधायक कार्यासाठी जुंपता आले तर त्यांच्यातील असंतोष विध्वंसक मार्गाने प्रकट होण्याचा धोका टाळता येऊ शकेल असे वाटून सन १८८४ ला त्यांनी इंग्लंडला जावून भारताविषयी सहानुभूती असलेल्या लॉर्ड नॉर्थब्रुक, लॉर्ड रिपन, जॉन ब्राईटसारख्या मुत्सद्यांची भेट घेतली. त्यांनी सर ह्युम यांच्या सुशिक्षित भारतीयांची एक राष्ट्रीय संघटना उभारण्याच्या कल्पनेस उत्तेजन दिले. सर ह्युमनी भारतात आल्यानंतर लॉर्ड डफरीनची भेट घेतली. त्यांनी सुशिक्षित भारतीयांची कायम स्वरूपाची राष्ट्रीय संघटना स्थापन करण्याच्या योजनेला दुजोरा दिला.

राष्ट्रीय काँग्रेसच्या उभारणीला तत्कालीन लॉर्ड लिटनचे आत्यंतिक प्रतिगामी धोरण कारणीभूत ठरलेले होते. उदा. त्याचे अफगाणिस्थानशी केलेल युद्ध, आर्म्स ॲक्ट पास केला. भारतीय वृत्तपत्रांची केलेली मुस्कटददघाबी, मुलकी सेवा परीक्षेसाठी उमेदवारांची वयोमर्यादा २१ वरून १९ वर्षांवर आणण्याच्या सरकारच्या निर्णयाने सुरक्षित भारतीयांना जबरदस्त फटका बसला. अनेक वर्षांपासून भारतीयांच्यात धुमसत असलेल्या असंतोषाला वाचा फोडणे गरजेचे होते. या संदर्भात सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी पुढील भाष्य केले होते, 'जे उद्दिष्ट कित्येक वर्षाच्या आंदोलनाने साध्य झाले नाही ते लिटनच्या चार वर्षांच्या आत्यंतिक प्रतिगामी शासनाच्या काळात साध्य झाले.' थोडक्यात लॉर्ड लिटनच्या प्रतिगामी धोरण आणि त्याच्या नंतर आलेले लॉर्ड रिपनचा कार्यकाळ त्यांच्या उदारमतवादी नीतीमुळे राष्ट्रीय भावनेच्या प्रसाराला पोषक ठरला.

राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ज्या परिस्थितीत, ज्या पद्धतीने, ज्या व्यक्तीच्या पुढाकाराने झाली त्यावरून ही संघटना स्थापन करण्यामागील उद्देशाबाबत आणि त्यातील सर ह्युम यांच्या भूमिकेबाबत बरेच मतभेद व मतांतरे राजकीय पुढाऱ्यांनी आणि इतिहासकारांनी दिली आहेत. ब्रिटिश साम्राज्यवादी सत्ता भारतात स्थिर होत असताना एका सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्याने ब्रिटिश मुत्सद्यांच्या व अधिकाऱ्यांच्या पूर्वसंमतीने राष्ट्रीय स्वरूपाची राजकीय संस्था प्रस्थपित करण्यात पुढाकार का घ्यावा हा प्रश्न अनेक विचारवंतांनाही पडला. या घटनेबाबत तत्कालीन संबंधित राजकीय पुढाऱ्यांनी वेगवेगळी वक्तव्ये केली असल्यामुळे हा विषय अधिकच वादग्रस्त ठरला. त्याचेच विश्लेषण करण्यात आले आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश

१. सन १८८५ च्या पूर्वीच्या बंगालमधील राजकीय संघटनांची माहिती विशद करा.

२. सन १८८५ ला स्थापन झालेल्या 'राष्ट्रीय काँग्रेस'ची कारणे स्पष्ट करा.

३. राष्ट्रीय काँग्रेसच्या उगमस्थाना संबंधीत असणारे मतभेद विशद करा.

**(ब) टीपा लिहा.**

१. ब्रिटिश इंडियन असोसिएशन

२. सार्वजनिक सभा

३. बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन

४. पाश्चात्य शिक्षण

५. ए. ओ. ह्यूम यांचे उदारमतवादी धोरण

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | आधुनिक भारत | जावडेकर आचार्य शं. द. |
| २. | भारताचा आर्थिक इतिहास | गोखले, प्रा. रामचंद्र महादेव |
| ३. | आधुनिक भारताचा इतिहास | कोलारकर, डॉ. श. शो. |
| ४. | आधुनिक भारत | कदम (प्राचार्य) य. ना. |
| ५. | आधुनिक भारताचा इतिहास – एक नवीन मूल्यांकन | ग्रोवर बी. एल. अनुवाद वेल्हेकर एन. के. |
| ६. | हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास | पवार, डॉ. जयसिंगराव |
| ७. | Modern India (1707-1967) | Khurana K. L. |
| ८. | India's Struggle for Independence | Chandra Bipan and Others |
| ९. | Modern India (1885-1947) | Sarkar Sumit |
| १०. | History of Modern India | Chaurasia R. S. |


✡✡✡

# घटक – ३

# प्रारंभीचा राष्ट्रवाद


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ मवाळ आणि आर्थिक राष्ट्रवाद

 ३.२.२ मवाळांच्या कार्याचे महत्त्व आणि मूल्यमापन

 ३.२.३ हिंदू पुनरुज्जीवन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ३.० उद्दिष्टे

या घटकात आपल्याला लक्षात येईल की –

१. मवाळांचे कार्य आणि त्यांचा आर्थिक राष्ट्रवाद काय होता हे समजून घेणे.

२. मवाळांच्या कार्याचे महत्त्व आणि मूल्यमापन पाहणे.

३. हिंदू पुनरुत्थान कसे, कोणी केले हे पाहणे.

## ३.१ प्रस्तावना

राष्ट्रीयत्व म्हणजे आपल्या देशाबद्दलचे प्रेम. भारतात राष्ट्रवादाचा उदय १८८५ साली झाला असे काही इतिहासकार मानतात, तर काहींच्या मते प्राचीन काळापासून हिंदी लोकांनी आपल्या देशावर प्रेम केले. मध्ययुगीन काळात राष्ट्रीयत्वाची भावना थोडी लुप्त झाली पण इंग्रज राजवटीत ती जागृत झाली. तिने उग्र स्वरूप

धारण केले. जगात इतरत्र राष्ट्रवादाची कल्पना वाढीस लागली. त्यावेळेस हिंदी राष्ट्रवादाने मूळ धरले. या देशाबद्दलचे प्रेम व देशाभिमान भारतीय लोकांमध्ये पहिल्यापासून दिसून येत होता. यामुळेच भारताचा प्राचीन इतिहास वैभवशाली व रोमहर्षक बनला. येथील लोकांनी स्वातंत्र्य मनसोक्त उपभोगले. प्रचंड साम्राज्ये उभारली. परकीय सत्तांशी प्रामाणिकपणे लढा दिला. काही वेळा आक्रमकांना धुडकावून लावले. हिंदू धर्म व हिंदू संस्कृती इतरांचा कधीही द्वेष करीत नाही म्हणून तिने इतर धर्मियांना, संस्कृतींना आपल्यामध्ये सामावून घेतले. यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना कमी झाली आणि देशाला विस्कळीत स्वरूप प्राप्त झाले. युरोपप्रमाणे भारतातही छोट्या-छोट्या राज्यांचा उदय झाला. आणि हिंदी लोक अखंड देशाचा विचार न करता आपल्या छोट्या राज्याचा विचार करू लागले. राज्य, धर्म, संस्कृती, जात-पात यामध्ये मश्गुल झाले. पण १७ व्या शतकात इंग्रजी सत्ता भारतात स्थिरावू लागली आणि पुन्हा एकदा भारतीय राष्ट्रवादाने डोके वर काढले. १८५७ च्या उठावानंतर याचे प्रमाण वाढले आणि १८८५ च्या राष्ट्रसभेच्या स्थापनेनंतर निश्चित अशा राष्ट्रवादी ध्येय-धोरणाने देशाला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा कार्यक्रम आखला गेला व पुढे त्याला १९४७ साली यश आले.

## ३.३ विषय विवेचन

### २.२.१ मवाळ आणि आर्थिक राष्ट्रवाद

१८८५ साली झालेली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना ही एक आकस्मिक घटना किंवा एक अपघात नव्हता तर राष्ट्रीय जागृतीच्या प्रक्रियेचा तो सर्वोच्च बिंदू होता. १८६० आणि १८७० च्या दशकात ही प्रक्रिया सुरू झाली. १८८० च्या दशकात तिला वेग आला आणि १८८५ हे वर्ष या प्रक्रियेतील मैलाचा दगड ठरले. अखिल भारतीय राष्ट्रीय संघटना नव्या राष्ट्रीय चैतन्याचे व्यासपीठ बनली, प्रतिक ठरली. पहिल्या कालखंडातील काँग्रेसचे नेते उदारमतवादी व मवाळ होते. त्यामध्ये ज्यांनी राष्ट्रसभा स्थापण्यासाठी मुख्य प्रयत्न केले. ते अे. ओ. ह्यूम, सर हेन्री कॉटन हे इंग्रज तर सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दादाभाई नौरोजी, फिरोशहा मेहता, ना. गोपाळकृष्ण गोखले, न्या. तेलंग इ. सर्व नेते उदारमतवादी होते. त्यांच्यावर पाश्चात्य शिक्षण व संस्कृती यांचा प्रभाव पडला होता. इंग्रजांची न्याय-प्रियता, सत्यता, उदारता यावर या लोकांचा पूर्ण विश्वास होता. ब्रिटिश राजवट म्हणजे हिंदुस्थानला एक वरदान आहे अशी त्यांची भावना होती. हिंदुस्थानचा विकास इंग्रजांशिवाय शक्य नाही म्हणून या देशात रहावेत असे या मवाळ उदारमतवादी नेत्यांना वाटत होते. १९०५ पर्यंत काँग्रेस या मवाळ उदारमतवादी नेत्यांच्या हातात होती. यांनी जहाल वा आक्रमक भूमिका स्वीकारली नाही म्हणून ती मवाळ काँग्रेस म्हणून ओळखली जाते.

### (अ) मवाळांच्या विचारधारेची वैशिष्ट्ये

**१. इंग्रज राजवटीशी निष्ठा** : नेमस्त किंवा उदामतवादी नेते नेहमीच इंग्रज सत्तेची एकनिष्ठ राहिले. इंग्रज राजवट भारतीयांसाठी एक वरदान आहे असे त्यांना वाटे. त्यामुळे इंग्रजांच्या चुकांकडे ते उदारतेने पाहत असत. इंग्रजांना भारतीय लोकांच्या समस्येचे ज्ञान नसल्यामुळे त्यांच्याकडून चुका होतात अशी त्यांची ब्रिटिशांबद्दलची

धारणा होती. आपण इंग्रजांच्या हातून होणाऱ्या चुका दाखवून दिल्या तर ते लोकशाही मार्गाने त्या चुका दुरूस्त करतील असा भाबडा विश्वास मवाळांचा होता. मात्र इंग्रजांना या देशातून हाकलून दिले पाहिजे ही भावना त्यांच्यामध्ये कधीच निर्माण झाली नाही. सुरेंद्रनाथ बॅनर्जी म्हणतात, ''इंग्रजांची सभ्यता, संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ आहे. ही सभ्यता इंग्लंड व भारतातील अखंडतेचे चिन्ह होय.'' ही सभ्यता भारतीयांसाठी अनेक अनेक आशीर्वाद आणि प्रसादांनी परिपूर्ण आहे. अशाप्रकारे इंग्रजांच्या चुकीवरती पांघरूण घालून त्यांची निष्ठा सांभाळण्यातच मवाळांनी धन्यता मानली.

**२. घटनात्मक साधनांवर विश्वास** : नेमस्तवादी किंवा मवाळवादी नेत्यांना जहाल, क्रांतिकारी घटनांवर विश्वास नव्हता. त्यामुळे १८५७ च्या उठाव काळातील जहाल घटना त्यांना मान्य नव्हत्या. जहाल मार्ग त्यांना आत्मघातकी व आताताई स्वरूपाचा वाटत होता. यामुळे इंग्रजी दुखावले जातील व भारतीयांच्या पदरी काहीच पडणार नाही असे त्यांना वाटत होते. मवाळांच्यावरती इंग्लंडमधील चळवळींचा, लोकशाहीचा प्रभाव पडला होता. त्यामुळे मवाळांनी आपल्या मागण्या पुढील काळात घटनात्मक व लोकशाही मार्गानेच इंग्रज सत्तेच्या कानावर घातल्या. यासाठी सभा, भाषणे, लेख, प्रार्थना, ठराव, शिष्टमंडळ इ. मार्गांचा त्यांनी वापर केला. चीड, संताप, मवाळांनी कधीच व्यक्त केली नाही.

**३. इंग्रजांच्या न्यायप्रियतेवर विश्वास** : इंग्रज न्यायप्रिय असून प्रत्येक गोष्ट्र न्यायानुसारच करतात. ते आपल्यावरती अन्याय करणार नाहीत. हिंदी संस्कृती भिन्न-भिन्न आहे. चुकून त्यांच्याकडून अन्याय घडला आणि आपण त्यांना जर दाखवून दिला तर आपणास न्याय मिळेल अशी या नेत्यांना खात्री होती. फिरोजशहा म्हणतात ''इंग्रज लोकन्यायप्रिय आहेत. त्याबद्दल मला मुळीच शंका नाही. ब्रिटिश राज्यकर्ते आमच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करतील.

**४. क्रमाक्रमाने सुधारणा यावर विश्वास** : उदारमतवाद्यांचा क्रमाक्रमाने सुधारणाद्वारे राजकीय प्रगती यावरती विश्वास होता. एकदम सुधारणा मिळाव्यात यावर त्यांचा विश्वास नव्हता, क्रमाक्रमाने सुधारणा मिळाव्यात ते पेलण्यासाठी आम्ही समर्थ झाल्यास पुढच्या आणखी सुधारणा मिळाव्यात या क्रमानेच राजकीय शिक्षण मिळावे अशी मवाळांची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी स्वराज्याची किंवा स्वशासनाची कधी मागणी केली नाही. सुधारणांबाबत त्यांच्या मागण्या उदार स्वरूपाच्या होत्या. थोडक्यात मवाळांचे ध्येय स्वराज्य नव्हते तर जनतेत राजकीय जागृती करणे हे होते. राष्ट्रासाठी बलिदान वा त्याग करण्याची जनतेची तर सोडाच पण नेत्यांचीसुद्धा फारशी तयारी या काळात नव्हती. सिन्हा म्हणतात, "With the exception of Tilak and possibly Gokhale the moderate leaders of the Congress were not prepared to make personal sacrifice and suffer hardship for the sake of liberty. थोडक्यात मवाळवादी नेत्यांनी इंग्रजांच्या न्यायप्रियतेवरती विश्वास ठेवून अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे हा घटनात्मक व लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. त्यांचे ध्येय मर्यादित होते. मार्ग सौम्य होता. तरीही पुढे-पुढे हीच मवाळ काँग्रेस क्रांतिकारक बनत गेली. मवाळांनीही राज्यकर्त्यांवर प्रसंगी तुफानी हल्ले चढविले.

**आर्थिक राष्ट्रवाद**

राष्ट्रवादी चळवळीचे दोन आधार आहेत –

राष्ट्रीय आंदोलन उभे करण्याकरिता दोन आधार घेतले गेले.

**१. आर्थिक आधार :**

१. पहिला आधार आर्थिक होता. आपला समाज मागासलेला आहे, गरीब आहे. विशेषतः पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेत आणि त्याचे मूळ कारण म्हणजे ब्रिटिशांनी केलेली आर्थिक पिळवणूक आहे असे तत्कालीन नेमस्तांना वाटत होते. इंग्रजांच्या साम्राज्यशाही धोरणांमुळे आपले आर्थिक शोषण होत आहे आणि त्यांना घालविल्याशिवाय आपली आर्थिक प्रगती होणार नाही ही गोष्ट जनतेला पटवून देवून, जनतेला आंदोलनात उतरण्यास प्रवृत्त करणे आवश्यक होते. आर्थिक प्रश्न हा राष्ट्रवादी चळवळीचा आणि नेमस्त विचारधारेचा पहिला आधार होता.

२. दुसरा आधार **धार्मिक** होता. धर्माच्या ऐक्यावर उभा राहणारा राष्ट्रवाद हिंदू धर्म आणि हिंदू राष्ट्र हे पुरातन आहेत आणि आम्ही अनादीकालापासून राष्ट्र आहोत या गृहीतकावर आधारित होता.

**ब्रिटिशांच्या शोषणाची जाणीव आणि आर्थिक राष्ट्रवादाची समीक्षा**

**१. वसाहतवादी शोषणाची जाणीव**

जगभरामध्ये वसाहतीमध्ये राष्ट्रीय चळवळी त्यांच्या त्यांच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या होत्या. या प्रत्येक चळवळींना माहीत होते की गुलामीमागचे किंवा पारतंत्र्यामागचे मुख्य कारण आर्थिक शोषण हेच आहे. भारतीय नेमस्त किंवा मवाळ नेत्यांनाही याची पूर्ण कल्पना होती. नेमस्तांनी आर्थिक समस्या, तपशिलवार तयार केली. ही समीक्षा राष्ट्रीय चळवळीच्या प्रगतीमधील नाटके, गाणी, प्रभातफेऱ्या या माध्यमातून चालविल्या गेलेल्या राष्ट्रीय आंदोलनाचे हे मुद्दे केंद्रबिंदू होते.

**२. आर्थिक राष्ट्रवाद आणि आधुनिक संकल्पनांचा स्वीकार** : इंग्रजांच्यापेक्षा आपण भौतिक विकासामध्ये खूप मागे आहोत आणि पाश्चिमात्यांनी आपला भौतिक विकास आधुनिकतेच्या साहाय्याने केला आहे. तसाच तो भारताचाही त्यांनी करावी. अशी अपेक्षा नेमस्तांची होती. तसेच भारतीय लोकांनीसुद्धा आधुनिकतेच्या संकल्पनांचा स्वीकार केला पाहिजे. बदलत्या परिस्थितीत पारंपरिक सरंजामशाहीची मूल्ये आणि त्यावर आधारलेल्या संस्था यांचा आपल्या समाजाच्या विकासाकरिता उपयोग नसल्याने त्यांचा त्याग करून आधुनिक मूल्ये आणि त्यावर आधारलेल्या संस्था यांचा स्वीकार केला पाहिजे. तरच आपला विकास शक्य आहे. हे राष्ट्रवादी चळवळीच्या मुळाशी होते. त्यासाठी सरंजामशाही मूल्यांच्या आधारावर उभा असलेला समाज मोडून त्याच्या जागी नवीन समाज उभा करणे आवश्यक होते. यामध्ये जुन्या व्यवस्थेला नष्ट करण्याचा व नवीन पुर्ननिर्माण करण्याचा दुहेरी कार्यक्रम आखण्याचे कठीण काम मवाळवाद्यांपुढे होते आणि हे त्यांनी जनतेपुढे मांडले व जनआंदोलनाचा पाठिंबा आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या मागे उभा केला.

**३. ब्रिटिश राजवटीचे आर्थिक विश्लेषण :** ब्रिटन एक औद्योगिक शक्ती म्हणून पुढे येत होता. भारतामध्येही आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांची सुरुवात करून ब्रिटन भारताची औद्योगिक शक्ती विकसित करेल अशी भाबडी आशा नेमस्तांना होती. पण भारतातील सामाजिक विकासाचे वास्तव आणि मवाळ नेत्यांच्या आशा-आकांक्षा यांच्यात मेळ बसत नसल्याचे लक्षात आल्यावर १८६० नंतर मवाळांचा मोठ्या प्रमाणावर भ्रमनिरास होऊ लागला. नव्या दिशेने होणारी प्रगती फार संथ गतीने व अडखळत होत आहे आणि एकंदरच देशाची पिछेहाट होत असून विकास अपुरा आहे. त्यामुळे मवाळ नेत्यांच्या मनातील ब्रिटिश राजवटीची प्रतिमा काळवंडत गेली.

१८७० ते १९०५ या कालखंडात ज्या अनेक व्यक्तींनी ब्रिटिश राजवटीचे आर्थिक विश्लेषण सुरू केले त्यामध्ये तीन व्यक्ती प्रमुख होत्या. त्यापैकी एक पितामह दादाभाई नौरोजी, दुसरी व्यक्ती न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि तिसरी व्यक्ती म्हणजे निवृत्त सनदी अधिकारी रोमेशचंद्र दत्त या सर्वांनी भारताच्या विकासातील मुख्य अडथळा वसाहतवाद हा आहे हे पटवून दिले आणि याविरुद्ध जनआंदोलन उभे करण्याचे दुहेरी कामही केले.

**४. भारतीय अर्थव्यवस्था ब्रिटिशांच्या दावणीला :** भारताची अर्थव्यवस्था ब्रिटिशांच्या दावणीला बांधावयाची हा ब्रिटिश साम्राज्यवादाचा गाभा असल्याचे मवाळवाद्यांच्या लक्षात आले होते. त्यामुळे व्यापार, उद्योग आणि वित्त या माध्यमातून ब्रिटिश भारताची किती, कशी आर्थिक पिळवणूक करतत याचा आलेख मांडला गेला. लुटालूट, खंडणी आणि व्यापारवाद या साधनांशिवाय मुक्त व्यापार व परकीय भांडवलाची गुंतवणूक या छुप्या माध्यमातून वसाहतवाद कसा पोखरला आहे याची माहिती भारतीयांना करून दिली. भारतातील कच्चा माल इंग्लंडला नेणे आणि पक्क्या मालाची खात्रीची बाजारपेठ तयार करणे हाच वसाहतवादाचा मुख्य गाभा आहे याचे स्पष्टीकरण केले गेले.

मवाळ नेत्यांनी या सर्व वसाहतवादी भूमिकेविरुद्ध विद्यार्थी-शिक्षक यांची एक प्रभावी बौद्धिक चळवळ उभी केली. ब्रिटिश आर्थिक निती समजून घेण्यासाठी व जनतेला समजून सांगण्यासाठी या चळवळीचा उपयोग करून घेतला. या चळवळीने मवाळांच्या माध्यमातून देशाला स्वतंत्र अर्थव्यवस्थेकडे जाणाऱ्या एका पर्यायी मार्गाचा स्वीकार केला. धीटपणा, रोखठोक व आकर्षक भाषेचा वापर हे या बौद्धिक चळवळीचे मुख्य वैशिष्ट्य होते. यातून भारतीय जनमानसात ब्रिटिशांच्या वसाहतवादी अर्थव्यवस्थेची भारताच्या मागासलेपणाची आणि ब्रिटिशांना सनदशीर मार्गाने विरोध करण्याचे तंत्र सापडले.

**५. भारतातील गरिबी व दारिद्र्य मानवनिर्मित :** पितामह दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारिद्र्याचा विशेष अभ्यास केला. देशाचे सतत चालू असणारे दारिद्र्यीकरण व दमछाक आणि देशाची हृदय पिळवटून टाकणारी व रक्त खवळणारी परिस्थिती याची भारतीयांना आणि ब्रिटिशांना जाणीव करून दिली. सार्वजनिक व्यासपीठ आणि वृत्तपत्रे यांमधून भारतीय माणूस उपाशी आहे अगदी अल्प किंवा अपुऱ्या अन्नावर तो जगत असल्याने अगदी किरकोळ कारणानेही त्याचा मृत्यू होतो असा सतत प्रचार केला.

हे सर्वंकष दारिद्र्य, उपासमार, परमेश्वर, निसर्ग याची अवकृपा म्हणनू नाही तर भारतीयांचे दारिद्र्य मानवनिर्मित आहे आणि ते दूर करता येऊ शकते हे वारंवार सांगितले गेले. रोमेशचंद्र म्हणतात, ''आज जर भारत गरीब असेल तर त्याची कारणे आर्थिक आहेत'' या सर्वाला ब्रिटिशांची आर्थिक निती, वसाहतवादी भूमिका कारण आहे. अशी परखड मांडणी केली गेली.

**६. औद्योगिक विकासाची गरज** : भारतातील दारिद्र्याची समस्या ही भारतीयांची उत्पादनशक्ती व उर्जा वाढविण्याची म्हणजेच देशाच्या आर्थिक विकासाची समस्या होती. त्यांच्या या विचारामुळे दारिद्र्य हा एक व्यापक विषय बनला. आधुनिक तंत्रज्ञान व भांडवलशाही उपक्रमांच्या आधारेच देशाचे पूर्ण आर्थिक परिवर्तन करता येईल याविषयी मवाळ नेत्यांच्यामध्ये कमालीची एकवाक्यता होती. औद्योगिकरण म्हणजे संस्कृतीची एक उच्च दर्जाची व श्रेष्ठ प्रकारची अवस्था असल्याचे जी. व्ही. जोशी मानीत असत. तर शाळा-महाविद्यालयापेक्षा कारखानेच राष्ट्रीय कार्याला नवजीवन मिळवून देतात असे मत न्या. महादेव गोविंद रानडे यांनी व्यक्त केले. त्यामुळे मवाळ नेत्यांनी औद्योगिकरणाला मनापासून पाठिंबा दिला आणि परराष्ट्र व्यापार, रेल्वेमार्ग, जकात कर व परकीय चलन, वित्त व कामगार आदी संबंधीत कायद्यांचा औद्योगिकरण या मुद्याच्या अनुषंगाने विचार केला. मात्र औद्योगिकरणाची गरज कितीही मोठी असली तरी तरी परकीय भांडवलाने नव्हे तर भारतीय भांडवलाने पूर्ण केली पाहिजे असे मत व्यक्तीकडे केले गेले.

**७. परदेशी भांडवलास विरोध** : मवाळ नेते परदेशी भांडवल एक घोर शाप असून त्याने देशाचा विकास न होता शोषण होते आणि त्यामुळे देश अधिकाधिक दरिद्री बनतो असे मानत होते. या संदर्भात दादाभाई नौरोजी म्हणतात, ''परदेशी भांडवल देशी साधनसंपत्तीचे शोषण व लूट यांचे प्रतिनिधित्व करते.'' त्यांच्या मते ''परदेशी भांडवलाच्या साहाय्याने देशाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजे वर्तमानकाळातील किरकोळ फायद्यासाठी आपला संपूर्ण भविष्यकाळच गहाण टाकणे होय.'' थोडक्यात, सर्वत्र मवाळ किंवा नेमस्त राष्ट्रवादी नेत्यांचे मत होते की देशाच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्याच्या मार्गातील परकीय भांडवल हाच सर्वात मोठा अडथळा आहे.

**८. देशी भांडवल गुंतवणुकीस उत्तेजन** : सुरुवातीच्या नेमस्तवादी नेत्यांनी ठामपणे सांगितले की, देशी भांडवलानेच औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू करून ती पुढे नेली तरच खरा आर्थिक विकास होऊ शकेल. परदेशी भांडवलाने ती प्रक्रिया सुरू करणे किंवा पूर्ण करणे योग्य होणार नाही.

**९. अपायकारक आर्थिक सुधारणा** : मवाळवादी नेत्याची आर्थिक राष्ट्रवादाची भूमिका मांडताना स्पष्ट केले की देशातील परंपरागत हस्तउद्योग यांचा सतत होणारा ऱ्हास व नुकसान हे अपघाताने घडून आले नाही तर ब्रिटिश कारखानदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी भारतीय उद्योगधंद्यांना नामशेष करण्याच्या जाणीवपूर्वक स्विकारलेल्या धोरणाचा तो अपरिहार्य परिणाम होता. रेल्वे मार्गांची बांधणी व देशाच्या औद्योगिक गरजा यांच्यामध्ये समन्वय नसल्याचेही या नेत्यांनी सांगितले. रेल्वेमार्गांनी औद्योगिक क्रांतीची नव्हे तर व्यापारी क्रांतीची सुरुवात झाली. असे रेल्वेमार्ग बांधणीचे फायदे भारताच्या नव्हे तर सर्वस्वी इंग्लंडच्या पदरात पडले आहेत. खरे तर रेल्वेमार्ग बांधणीवर होणारा खर्च म्हणजे देशाने ब्रिटिश उद्योगांना दिलेले अनुदान आहे असे मत

जी. व्ही. जोशी यांनी केली. 'दुसऱ्याच्या बायकोला दागिन्यांनी मढविणे' या शब्दात लो. टिळकांनी रेल्वे-मार्गाच्या बांधणीवर केल्या जाणाऱ्या खर्चाची संभावना केली.

**१०. घातक मुक्त व्यापार एक अडचण :** मुक्त व्यापाराचे धोरण ही देशाच्या जलद विकासातील मोठी अडचण होती. त्यामुळे एका बाजूला देशी हस्तोद्योगांचा ऱ्हास होतो तर दुसऱ्या बाजूला देशातील बाल्यावस्थेत असलेल्या अविकसित कारखानदारीला पूर्णपणे संघटीत व विकसित झालेल्या परकीय उद्योगांशी स्पर्धा करणे भाग पडते. अशी स्पर्धा अकाली, विषम आणि म्हणून अन्यायी व अरिष्टकारक असते. त्यामुळे ब्रिटिशांचे भारतातील आर्थिक धोरण ब्रिटनमधील भांडवलदारांच्या हितसंवर्धनासाठीच राबविले जात आहे. त्यामुळे या घातक मुक्त व्यापाराच्या धोरणावरती मवाळांनी कडाडून टीका केली.

**११. संपत्तीवहनाचा सिद्धांत** (Drain Theory) : पितामह दादाभाई नौरोजी यांनी 'संपत्ती वहनाचा' किंवा 'गळतीचा सिद्धांत' मांडला. मे १८६७ मध्ये त्यांनी भारतीय संपत्तीचा ब्रिटिशांकडून कसा अपहार होत आहे याचे चित्र स्पष्ट केले. देशातील मुलकी आणि लष्करी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतन, भारत सरकारने घेतलेल्या कर्जावरील व्याज, ब्रिटिश भांडवलदारांचा देशातील नफा आणि होम चार्जेस म्हणजे भारतीय प्रशासनावर इंग्लंडमध्ये होणारा खर्च आदी स्वरूपात भारतीय भांडवल व संपत्तीचा फार मोठा भाग ब्रिटनमध्ये हस्तांतरीत होतो. म्हणजे देशाच्या संपत्तीचे वहन होते हे मवाळ राष्ट्रवादी नेत्यांनी दाखवून दिले. देशातील आयातीपेक्षा निर्यात जास्त असल्यानेही देशातून संपत्तीचे वहन होते. संपत्तीचे वहन हे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या आठ टक्क्यांइतके होते. तेव्हा ब्रिटन भारताचे रक्तशोषण करीत असल्याचा आरोप दादाभाई दौरोजी यांनी केला. दादाभाईंनी ब्रिटिशांना हे सांगत असतानाच जनतेलाही सजग केले आणि ब्रिटिश सत्ता उलथवून टाकण्याच्या पूर्वतयारीसाठी या विचारांचा उपयोग झाला.

संपत्तीवहन बंद करा ही घोषणा यशस्वी चळवळीसाठी पुढे कामी आली. आधुनिक वसाहतवाद, संपत्तीचे वहन, हेच प्रश्न चळवळीचे आधार बनले आणि भारत हे वसाहतवाद्यांचे कसे कुरण झाले आहे राष्ट्रवादी मवाळ नेत्यांनी जनतेला पटवून सांगितले. त्यामुळे सुरुवातीच्या काळात चळवळीला एक वैचारिक पाठबळ, भक्कमपणा आला आणि आर्थिक साम्राज्यवादातून देशाचे कसे नुकसान झाले यासाठी राष्ट्रवादी विचार व कृतीची गरज सर्वच मवाळ नेत्यांनी अपेक्षिली.

## स्वयं अध्ययन प्रश्न १

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. सालापर्यंत मवाळांच्या ताब्यात होती.

(अ) १९०५ (ब) १९०७ (क) १९०९ (ड) १८८५

२. क्रमाक्रमाने सुधारणा यावरती ............. यांचा विश्वास होता.

(अ) जहाल (ब) क्रांतीकारक (क) मवाळ (ड) गदर पार्टी

३. रेल्वेमार्गाच्या बांधणीवर होत असलेला खर्च म्हणजे 'दुसऱ्याच्या बायकोला दागिन्यांनी मढविणे' असे ............. यांचे मत होते.

(अ) न्या. रानडे (ब) लो. टिळक (क) गोपाळकृष्ण गोखले (ड) दादाभाई नौरोजी

४. संपत्तीवहनाचा सिद्धांत ............. यांनी मांडला

(अ) दादाभाई नौरोजी (ब) लो. टिळक (क) न्या. रानडे (ड) न्या. तेलंग

५. ............. साली गळतीचा सिद्धांत मांडला गेला.

(अ) १८६१ (ब) १८६२ (क) १८८५ (ड) १८६७

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना कोणत्या साली झाली ?

२. अर्ज-विनंती-शिष्टमंडळे हे कोणत्या विचारधारेचे वैशिष्ट्य आहे ?

३. आर्थिक राष्ट्रवादाचे किती आधार आहेत ?

४. मवाळवादी विचारधारेचा कालखंड कोणता ?

५. नेमस्तवादी हा शब्दप्रयोग कोणासाठी वापरला जातो ?

## ३.२.२ मवाळांच्या कार्याचे महत्त्व आणि मूल्यमापन

भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासाचे प्रामुख्याने तीन टप्पे पडतात. १८८५ ते १९०५ हा पहिला काळ मवाळ कालखंड म्हणून ओळखला जातो. १९०५ ते १९२० हा जहाल कालखंड म्हणून ओळखला जातो तर १९२० ते १९४७ हा गांधी युग म्हणून कालखंड परिचित आहे. १८८५ ते १९०५ या मवाळ कालखंडात नेमस्तवादी नेत्यांनी पुढीलप्रमाणे कार्य केले त्याचे महत्त्व पुढीलप्रमाणे :

**१. वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय ठरविले :** मवाळवादी नेत्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी लढा दिला नाही तर आपली गाऱ्हाणी राज्यकर्त्यांकडून दूर करून घेण्यासाठी राष्ट्रसभा स्थापन केली आहे असे मत होते. मात्र इंग्रज नोकरशाहीने मवाळांच्या मागण्यांना केराची टोपली दाखविली. त्यामुळे १९०५ च्या वाराणसीच्या अधिवेशनात न्या. गोपाळकृष्ण गोखले यांनी अध्यक्ष या नात्याने भाषण करताना वसाहतीचे स्वराज्य हे काँग्रेसचे ध्येय आहे असे जाहीर केले. थोडक्यात संपूर्ण स्वातंत्र्य खूप लांबची गोष्ट होती पण वसाहतीचे स्वराज्य तरी हवे ही मागणी रेटली गेली. हे मवाळांच्या कार्याचे महत्त्व आहे.

**२. हिंदी लोक राज्यकारभार पाहण्यास पात्र आहेत हे दाखवून दिले :** हिंदी लोक, मूर्ख, अडाणी आहेत. त्यांना जबाबदारीने कोणतीही गोष्ट करता येणार नाही असा इंग्रजांचा समज होता. काँग्रेसने मिळविलेल्या अल्पाशा अधिकाराच्या साहाय्याने आपली कार्यक्षमता दाखवून टिकाकारांना चोख उत्तर दिले. १८९२ च्या कायदा कसा असमाधानकारक आहे यासाठी अधिकारात वाढ करा, तसेच राज्यकर्त्यांचे दोष चव्हाट्यावर आणले आणि हिंदी लोक कार्यक्षम असून ते जबाबदारी पेलू शकतात हे दाखवून दिले.

**३. हिंदी जनतेची गाऱ्हाणी सरकारपुढे मांडली :** रॉयल कमिशनची मागणी, स्पर्धा परीक्षा भारतात घ्या, परीक्षेसाठी उमेदवारांची वयोमर्यादा कमी करा, स्थानिक स्वराज्य संस्थेत हिंदी लोकांचे वाढते सहकार्य घ्या. वांशिक भेदभाव करणारे कायदे रद्द करा, नोकऱ्यांमध्ये हिंदी लोकांना स्थान द्या. याबरोबरच इंग्रज राजवटीचे गोडवे गात न बसता हिंदी तरुणांना राष्ट्रीच चळवळीत येण्यासाठी प्रवृत्त करणे, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळग्रस्तांना मदत, कमी व्याजदरात शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करा. औद्योगिकरणास चालना द्या. गरिबांवरील कर कमी करा इ. बाबतची जनतेची गाऱ्हाणी सरकारमध्ये वेगवेगळ्या प्रकारे मांडण्याचे काम मवाळांनी केले आणि यातील बऱ्याच गोष्टी सरकारला मान्य करावयास भाग पाडले.

**४. परदेशातील हिंदी लोकांसाठी कार्य :** ब्रिटिशांचे साम्राज्य साऱ्या जगभर पसरले होते. भारतामध्ये स्वस्त मजूर मिळत असल्यामुळे इंग्रजांनी येथील मजूर त्यांच्या वसाहतीमध्ये पाठविले होते. मात्र तेथे त्यांना असमानतेची वागणूक दिली जात होती. नाताळमध्ये हिंदी मजुरांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला होता. तर ट्रान्सव्हॉलमधील हिंदी मजुरांना शहराबाहेर राहण्याची सक्ती केली. काळा-गोरा भेद हा तर दैनंदिन होता. त्यांना पावलोपावली अपमानीत केले जात असे या सर्व प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. म. गांधीजींनी आफ्रिकेमध्ये सत्याग्रह करून तेथील लोकांना न्याय मिळवून दिला.

**५. भारत मंत्र्याचे कार्यालय :** भारतमंत्री व भारतमंडळ यांचा पगार हिंदी तिजोरीतून भागविला जात असे. यासाठी दरसाल ३४ लाख रुपये खर्च होत होता. मवाळ नेत्यांनी आपली भूमिका ताठर करत प्रश्न विचारला. भारत मंत्र्याचा व भारत मंडळाचा पगार भारताच्या तिजोरीतून का ? आणि १८८५ च्या पहिल्या अधिवेशनात ब्रिटिश संसदेने आपल्या तिजोरीतून पगार भागवावा असा ठराव मंजूर करून घेतला १९१९ मध्ये या कामी यश आले आणि हा पगार ब्रिटिश तिजोरीतून भागविला गेला.

**६. जनतेच्या अधिकाऱ्यासाठी आवाज उठविला :** काँग्रेसच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल अनेकांना विनाचौकशी तुरुंगात डांबले जात होते. मवाळ नेत्यांनी याविरुद्ध आवाज उठवून चळवळीत भाग घेणाऱ्या लोकांना संरक्षण दिले हे त्यांच्या कामाचे महत्त्व होय.

**७. राष्ट्रीय चळवळीचा पाया भक्कम केला :** १८८५ ते १९०५ या काळात मवाळ नेत्यांनी अर्ज-विनंत्या, शिष्टमंडळे या माध्यमातून लोकांची गाऱ्हाणी चव्हाट्यावरती आणली. राज्यकर्त्यांचे दोष उजेडात आणले. राज्यकारभार सुधारण्यास भाग पाडले. सभा, लेख, ठराव या द्वारे हिंदी जनतेला राष्ट्रीय चळवळीत येण्यास भाग पाडले. त्यांच्या हक्क-अधिकाराची जाणीव करून दिली. त्यामुळे तरुण पिढी स्वातंत्र्य चळवळीत मोठ्या संख्येने उतरली.

अशी अनेक प्रकारची कामे करून मवाळ नेत्यांनी भारतीय जनतेला गुलामीची जाणीव करून दिली. सरंजामशाहीचे तोटे, आर्थिक साम्राज्यवादी धोरणाने भारतीयांची परिस्थिती कशी केली आणि झाली आहे हे पटवून दिले आणि अर्ज, विनंती, शिष्टमंडळ, सभा, ठराव याद्वारे तरुणांना राष्ट्रीय चळवळीत आकर्षित केले.

**मूल्यमापन**

मवाळ काँग्रेसचे सुरुवातीचे कार्य म्हणजे चर्चा करणे, ठराव मांडणे, सरकारदप्तरी दाखल करणे, पुढील वर्षी मागील वर्षी काय झाले हे ते पाहात नसत. अगदी सुरुवातीला काँग्रेसवर सुशिक्षित व मध्यमवर्गाचा पगडा होता. त्यामुळे सर्व ठराव त्यांच्याशी निगडीत असत. यामुळे महात्मा फुले यांनी काँग्रेसवरती आक्षेप घेतला. जोपर्यंत काँग्रेसचे नेते महार, मांग आणि शेतकरी यांच्या हिताची कळकळ बाळगत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय सभा ही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय होऊ शकत नाही. एकमय होऊ शकत नाही. ब्रिटिशांचा उदारमतवाद, लोकशाही, कायद्यासमोर सारे समान, न्यायप्रियता यावर मवाळांचा विश्वास होता. यामुळेच ते भूतकाळातील राजवटीपेक्षा ब्रिटिशांप्रती निष्ठा प्रदर्शित करीत. संस्थापकांपैकी कित्येकजण उच्च विद्याविभूषीत होते. राणीच्या जाहीर-नाम्यावर त्यांचा विश्वास होता. सुरुवातीला त्यांच्या खूपच कमी व मूलभूत स्वरूपाच्या मागण्या होत्या. शांततामय व सनदशीर मार्गानेच आपल्या मागण्या पूर्ण करून द्याव्या लागतील याची त्यांना पूर्ण खात्री होती. ठराव मांडणे, चर्चा करणे, अर्ज-विनंती करणे, लंडनमधील राजकर्त्यांच्या कानावर सदैव गाऱ्हाणी घातल्यास आपले शोषण कमी होईल असे काँग्रेस नेत्यांना वाटत होते. लंडनमध्ये सभा घेणे, पत्रके लावणे, भारतीयांच्या समस्यांचा अभ्यास आकडेवारीसह करून तो मांडणे, शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविणे, पार्लमेंटमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणे इ. उपाय मवाळ आचरणात आणीत हे सगळे बुद्धीजीवी होते. हीच गोष्ट त्यांना एकत्र आणणारी होती.

हे जरी खरे असले तरी स्वतः राष्ट्रीय काँग्रेसने जी मूलभूत उद्दिष्टे स्वीकारली होती ती कितपत यशस्वी झाली यावरून सुरुवातीच्या राष्ट्रीय चळवळीचे यशापयश मोजता येईल. १८८० व्या दशकात अगदी लहान प्रमाणात सुरू झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसचे रूपांतर विसाव्या शतकात एका लोकप्रिय सार्वजनिक आंदोलनात झाले. १८८५ ते १९०५ या काळातील राष्ट्रीय काँग्रेसच्या प्राथमिक कार्याविषयी दादाभाई नौरोजी यांनी दिनेश वाच्छा यांना जानेवारी १९०५ मध्ये लिहिले होते. 'एक संथ व अप्रागतिक चळवळ' या प्रतिमेतून राष्ट्रीय काँग्रेसने आपल्याविषयी जो असंतोष व अधीरपणा नव्या पिढीत निर्माण केला आहे. तोच तिच्या कार्याच्या श्रेष्ठ परिणाम किंवा फलश्रुती आहे' या काळाचे मूल्यमापन करताना इ.स. १९०७ मध्ये गोपाळकृष्ण गोखले म्हणतात, ''देशाच्या प्रगतीच्या अशा अवस्थेमध्ये आपण आहोत की आपली कामगिरी मामुली वाटेल, अनेक वेळा निराशा पदरी येईल, देवाने या संघर्षातील आपले स्थान ठरवून दिले आहे. या स्थानावर जे करण्यासारखे आहे तेवढे कार्य आपण पार पाडल्यावर आपली जबाबदारी संपते. भावी पिढ्यांमधील आपले देशबांधव त्यांच्या यशस्वीतेतून देशाची सेवा करतील याच शंकाच नाही. आपल्या पिढीने मात्र आपल्या अपयशातून देशाची सेवा करण्यात समाधान मानले पाहिजे; कारण अवघड असले तरी या अपयशातूनच भावी काळात कामगिरी पार पाडण्याची शक्ती निर्माण होईल.

एकूणच राष्ट्रवादी नेते राजकारण व राजकीय पद्धतीयाच्या संदर्भात नेमस्त असले तरी आणि त्यांच्यापैकी अनेकांनी ब्रिटिश राजवटीशी एकनिष्ठ राहण्याचे मान्य केले असले तरी, त्यांनी साम्राज्याच्या राजकीय मुळावरच घाव घातला आणि देशात ब्रिटिश राजवटीप्रती निष्ठेचा अभाव, असंतोष यांची बीजे पेरली. ही या चळवळीची

महत्त्वाची फलश्रुती होती. इ.स. १८७५ ते १९०५ हा काळ वाढत्या बौद्धिक असंतोषाचा आणि राष्ट्रीय जाणिवेच्या प्रसाराचा काळ म्हणून ओळखला जातो. हा काळ राष्ट्रवादी चळवळीच्या बीजारोपणाचा काळ होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**(अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. मवाळ कालखंड म्हणून भारतीय इतिहासात कोणता काळ मानला जातो ?

२. १९२० ते १९४७ या काळाला कोणत्या नावाने संबोधले जाते ?

३. भारतमंत्र्यांचा पगार इंग्लंडच्या तिजोरीतून द्यावा हे कोणत्या कायद्याने मान्य झाले ?

४. दिनेश वाच्छा हे कोणत्या विचारधारेचे नेते होते ?

५. लो. टिळकांनी १९०५ नंतर कोणत्या विचारांचा स्वीकार केला ?

### ३.२.३ पुनरुत्थानवाद

**प्रस्तावना**

१९व्या शतकाचा पूर्वार्ध हा भारताच्या इतिहासातील मन्वंतराचा काळ होता. या काळात देशामध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक क्रांती घडून आली. बुद्धीवाद, तर्कनिष्ठा, शास्त्रीय प्रणाली, व्यक्तीवाद, राष्ट्रवाद, मानवतावाद इ. आधुनिक संकल्पना भारतीय समाजात प्रसृत होऊ लागल्या. त्याचबरोबर मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक नवा आधुनिक दृष्टिकोन विकसित होऊ लागला. देशाच्या अवनतीचे मूळ सामाजिक अधोगतीत आहे अशी त्यांची पक्की धारणा बनू लागली. भारतीय समाजात दृढमूल झालेल्या अंधश्रद्धा, कर्मकांडाचे स्तोम, परंपरानिष्ठ, खोलवर रुजलेल्या जातिप्रथेसारख्या अनिष्ठ चालीरिती व रूढी, कुपमंडूक वृत्ती व यामुळे आलेली गतीहिनता ही सर्व समाजाच्या अधोगतीची कारणे आहेत आणि त्याचे निमूर्लन करून त्याजागी आधुनिक विचारांचे बीजारोपण केल्याशिवाय देशाच्या प्रगतीचा अवरुद्ध झालेला मार्ग खुला होणार नाही अशी त्यांची ठाम समजूत बनली. हा काळ वैचारिक क्रांतीचा मूलभूत वैचारिक परिवर्तनाचा काळ होता. पण यातून पुन्हा स्वधर्म, त्याची तत्त्वे, ईश्वर, चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे समर्थन इत्यादीनाही महत्त्वाचे स्थान मिळाले. म्हणजे हा प्रबोधनाचा उदय द्वंद्वात्मक प्रक्रियेतून झाला.

**सामाजिक सुधारणा चळवळीचे टप्पे**

सामाजिक सुधारणा चळवळीचे प्रामुख्याने तीन टप्पे किंवा तीन प्रवाह आढळून येतात.

१. पहिल्या प्रवाहाचे किंवा टप्प्याचे प्रणेते राजा राममोहन रॉय होते. सुधारणेचा विचार समाजावर थोपवून भागणार नाही तो विचार समाजातूनच उदयाला यायला पाहिजे त्यासाठी लोकजागृतीची निकड आहे. यासाठी वृत्तपत्रीय लिखाण, पत्रके, समस्यांवरती जाहीर चर्चा, समाजविघातक कायद्यांना विरोध यासाठी संस्थात्मक कार्याचा प्रारंभ ही भूमिका होती.

२. दुसरा प्रवाह भिन्न विचारसरणीचा होता. या गटाला समाजाच्या सुधारणेची, समाजातील उणीवा, दोष,

नष्ट करण्याची गरज जाणवली होती. यासाठी पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार होणे आवश्यक वाटत होते. परंतु भारतीय समाजव्यवस्थेत व धर्मव्यवस्थेत परकीय शासकांच्या हस्तक्षेपाला विरोध होता. त्याला त्यांनी कसून विरोध केला. या गटाचे अर्ध्वयू बंगालचे राधाकांत देब हे होते. पाश्चात्य संस्कृतीच्या झगमगाटाने दिपून गेलेल्य व त्या प्रभावामुळे भारतीय संस्कृती त्याज्य मानणाऱ्या तरुण वर्गाला आवर घालण्याचे कार्य त्यांनी केले. आणि प्राचीन हिंदू संस्कृतीचे रक्षण करण्याचे महत्तम कार्य केले. या गटात राधामाधव मुखर्जी, काशीनाथ बॅनर्जी ही मंडळी होती.

३. तिसरा गट किंवा प्रवाह कट्टर बुद्धीवादी जहाल सुधारकांचा होता. या गटाचे नेतृत्व बंगालमधील हेन्री डेरोझिओ या प्रतिभावान तरुणाने केले. भारताची सर्वांगीण प्रगत व्हावी, बुद्धीनिष्ठ समाजव्यवस्था निर्माण व्हावी. मात्र यासाठी युरोपीय संस्कृतीचे अंधानुकरण नको म्हणणारा हा गट. सनातनी गटाच्या प्रखर विरोधामुळे हा गट लवकर संपुष्टात आला.

## धार्मिक प्रतिक्रिया – धर्म आणि राष्ट्रवाद

इंग्रज राज्यकर्त्यांबरोबर ख्रिश्चन मिशनरीही भारतात आले. इंग्रजांचे राज्य हे परकियांचे राज्य, परधर्मियांचे राज्य अशी भारतीयांची समजूत होणे स्वाभाविक होते. परधर्मियांचे आपल्या धर्मावर होणारे आक्रमण परतवून लावण्याची निकड येथील लोकांना वाटू लागली. एकीकडे ख्रिश्चन धर्मात जे काही आहे त्यापेक्षा अधिक चांगले आमच्या हिंदू धर्मात आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न होता. त्याबरोबर ख्रिश्चन धर्माच्या तुलनेत आपल्या हिंदू धर्मातील दोष काढून टाकणे गरजेचे वाटू लागले. यातूनच धर्मसुधारणा चळवळी सुरू झाल्या. आमचा देश, आमची संस्कृती, आमचा धर्म पाश्चात्यांपेक्षा श्रेष्ठ नाही ही भारताच्या राष्ट्रवादाची धार्मिक प्रेरणा होती. भारतामध्ये बहुसंख्य नागरिक हिंदू आहेत, तेव्हा हे राज्य हिंदूराज्यच आहे अशी कंपनी सरकारची भावना होती. त्यामुळे हिंदूंना मदत करण्याचे धोरण कंपनी सरकारने स्वीकारले होते.

**१. आर्यसमाज** : स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची पाळेमुळे पंजाब, राजस्थान, गुजरात, बंगाल, महाराष्ट्र इ. प्रांतात रुजवली. ब्राह्मण कुटुंबात जन्माला आलेल्या स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल, १८७५ रोजी मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. या समाजाने वेदांना हिंदू धर्माचा मुख्य आधार व प्रेरणास्थान मानले.

**तत्त्वज्ञान** :

१. परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान वेदात असून वेदांचे अध्ययन करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

२. वेद अध्ययनाचा हक्क सर्व स्त्री-पुरुषांना आहे.

३. वेद हा आर्यांचा पवित्र धर्मग्रंथ असून तो प्रमाण मानला पाहिजे.

४. चातुर्वर्ण्य जन्मसिद्ध नसून गुणकर्मावर आधारीत असावे.

५. वैदिक धर्माची दारे सर्व धर्मियांसाठी खुली असावीत. परधर्मातील कोणाही व्यक्तीस शुद्धीकरणाने वैदिक धर्मात प्रवेश मिळावा.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी वेदावर भाष्य केलेला सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ आर्य समाजाचा आदर्श ग्रंथ बनला.

आर्य समाजाने हिंदू धर्माला वाचविण्यासाठी 'Back to the Vedas' असा आपल्या धर्मबांधवांना आदेश दिला आणि हिंदू धर्माच्या पुनरुत्थानासाठी स्वामी दयानंद सरस्वती आणि आर्य समाजाचे काम प्रोत्साहन देणारे ठरले. 'आर्यावर्त' ही आर्यांची भूमी आहे आणि ज्या हिंदूनी परकीय ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्माचा नाईलाजाने स्वीकार केला. केला अशा सर्व हिंदूना परत स्वधर्मात आणण्याठी आर्य समाजाने शुद्धी आंदोलन चालविले. यामुळे हिंदू धर्माला ऊर्जितावस्था आली. लोकांच्यामध्ये चैतन्य निर्माण झाले. याबरोबर स्वराज्यप्रेम व राष्ट्राभिमान निर्माण झाला.

**२. रामकृष्ण मिशन**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे राष्ट्रवादाच्या उभारणीच्या काळात भारतीयांमध्ये स्वदेश व स्वधर्माप्रती अभिमान उत्पन्न करण्याचे कार्य ज्या-ज्या संस्थानी केले त्यामध्ये रामकृष्ण मिशनचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. दिव्यदृष्टी, परमेश्वराचा साक्षात्कार या गोष्टी रामकृष्ण परमहंस यांच्याशी संबंधित होत्या. रामकृष्ण परमहंस यांनी आपले तत्त्वज्ञान अत्यंत साध्या सोप्या भाषेत सांगितले. परमेश्वराचे अस्तित्व हा त्यांच्या धार्मिक उपदेशातील महत्त्वाचा भाग होता. स्वामी विवेकानंदानी रामकृष्ण परमहंसाचे शिष्यत्व पत्करले. त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना १८९७ साली केली.

**कार्य**

१. रामकृष्ण मिशनने हिंदू धर्म व संस्कृतीचे श्रेष्ठत्व पटवून दिले. हिंदू धर्म व संस्कृती जगामध्ये श्रेष्ठ आहे हे पटवून दिले. हिंदू धर्माला नवे रूप दिले. हिंदू धर्माचा वैभवशाली भूतकाळ लोकांपुढे मांडला.

२. रामकृष्ण मिशनने वेदांताची मूलतत्वे लोकांना समजून सांगितली.

३. वेदांत शिक्षणाला उत्तेजन दिले.

४. हिंदू धर्माविषयी ख्रिस्ती धर्मोपदेशक तिरस्काराने बोलत तोच धर्म जगाच्या उद्धाराचा मार्ग दाखविणारा धर्म आहे असे ठासून सांगून त्यांनी जिज्ञासू पाश्चिमात्यांची मने हिंदू धर्माकडे आकर्षित केली.

स्वामी विवेकानंदानी अमेरिकेत केलेल्या भाषणांमुळे व त्यानंतरच्या अनेक भाषणांतून त्यांनी खऱ्या हिंदू धर्माची ओळख अमेरिकन लोकांना करून दिली. तेजस्वी व्यक्तिमत्व, ओजस्वी वाणी, गाढ विद्वत्ता, व्यापक दृष्टीकोण, प्रखर बुद्धिमत्ता यांचा विलक्षण प्रभाव पाश्चात्य जगावरती पडला. स्वामी विवेकानंदानी हिंदू धर्माची विजयपताका पाश्चात्य जगात फडकविली. त्यामुळे भारतीयांची हिंदू धर्मियांची मान ताठ झाली. यामुळे भारतीयांमध्ये स्वधर्माविषयी अभिमान जागृत झाली. धार्मिक आणि सामाजिक सुधारणेबरोबर राष्ट्रवादाचा संदेश देणारा प्रेषित म्हणून विवेकानंदाचे स्थान अनन्यसाधारण आहे. स्वामी विवेकानंदाच्या कार्याबाबत पाश्चात्य लेखक व्हॅलेंटाईन चिरोल म्हणतो, ''प्राचीन भारतीय संस्कृतीची व नवजात भारतीय राष्ट्रवादाची पाश्चात्यांना प्रभावीपणे जाणीव करून देणारा पहिला हिंदू होय.''

### १८५७ चा उठाव आणि हिंदू पुनरुत्थान

ब्रिटिशांच्या काळात स्वधर्मावरती चोहोबाजूंनी हल्ले चालले होते. स्वधर्म धोक्यात आला होता. आपला हिंदू धर्म बुडणार कारण ख्रिस्ती मिशनऱ्यांचे तांडेच्या तांडे भारतात येऊन ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार करीत होते. गरीब जनतेच्या असहायतेचा फायदा घेऊन सक्तीने धर्मांतर राज्यकर्ते करू लागले. ब्रिटिशांनी केलेल्या सामाजिक सुधारणा या सुधारणावादी व मानवतावादी असल्या तर हिंदू धर्म धोक्यात आणणाऱ्या होत्या. यामुळे हिंदू सैनिक स्वधर्माच्या रक्षणासाठी १८५७ च्या उठावात त्वेषाने लढले. हिंदी शिपायावरील सक्ती, अनेक बंधने, धार्मिक भावना दुखावणारी होती. काडतूस प्रकरणानंतर प्रत्यक्ष उठावाला सुरुवात झाली. या सर्वांमधून हिंदू परंपरा, धर्माचे रक्षण या गोष्टींना आळा मिळाला आणि धर्मरक्षणासाठी शिपाई मरायला तयार झाले.

### जहाल विचारधारा आणि हिंदू पुनरुत्थान

हिंदू पुनरुत्थानाला ज्या-ज्या घटनेमुळे, व्यक्तींमुळे बळकटी मिळावी. त्यामध्ये जहाल नेत्यांचे आणि त्यांच्या विचारधारेचे योगदान महत्त्वाचे आहे. बंकीमचंद्र चट्टोपाध्याय जहाल राष्ट्रवादाचे जनक मानले जातात. आध्यात्मिक क्षेत्रात भारतीय संस्कृती अधिक संपन्न आहे असे त्यांचे मत होते. अनुशीलनाचा विचार हा भारतीय तत्त्वज्ञानातील भक्ती तत्त्वावर आधारीत आहे. यासाठी गीतेचा आधार घेताना 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या गीतेतील कर्मवीराप्रमाणे आपण मातृभूमीची भक्ती केली पाहिजे असे त्यांचे मत होते. या क्रांतिकारी देशभक्तामध्ये अरविंद बाबू, मानवेंद्र रॉय, भगिनी निवेदिता, स्वामी विवेकानंद यांचा समावेश होतो.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अभिनव भारत संघटना स्थापन करून मॅझिनीला दैवत मानले. त्यांनी राष्ट्रवादी दृष्टिकोनातून इतिहासाचे पुनर्लेखन केले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील पहिल्या पिढीचे नेतृत्व हे धार्मिक नसले तरी त्यांच्या राष्ट्रवादी प्रेरणा या धर्मातच दिसतात. अरविंद बाबू, बिपिनचंद्रपाल, लो. टिळक यांच्या राष्ट्रधर्माला लाला लजपतराय त्यांनी वेदांतीक राष्ट्रवाद हे नाव दिले.

लो. टिळकांनी गणपती उत्सव आणि शिवजयंती या समारंभाचा उपयोग राष्ट्रवादी विचार पसरविण्यासाठी केला. कोणत्याही मार्गाने राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करणे हे त्यांचे ध्येय होते. हिंदू धर्मग्रंथाचा अभ्यास, गीतारहस्य आणि आर्यांचे उत्पत्तीस्थान या ग्रंथसंपदावरून टिळकांचा हिंदू धर्मशास्त्राचा अभ्यास लक्षात येतो. मात्र टिळकांना जमातवादी नेते म्हणजे इष्ट ठरणार नाही. पण धर्म आणि संस्कृतीच्या नावाने राष्ट्रवाद उभे करणारे प्रमुख राष्ट्रवादी म्हणून आपल्याला स्वातंत्र्यवीर सावरकरांचेच नाव घ्यावे लागेल.

## ३.२.४ सारांश

अशा प्रकारे हिंदू पुनरुत्थान सामाजिक आणि धार्मिक घटकात घडून आले. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या सक्तीच्या धर्मांतरामुळे इस्लाम धर्मीयांना ब्रिटिशांनी दिलेल्या विशेष सवलती, हिंदू धर्माची वारंवार होत असलेली अवहेलना, हेटाळणी, हिंदूंना जाणीवपूर्वक दिली जाणारी अपमानास्पद वागणूक या सर्वांचा परिपाक म्हणून हिंदू विचारधारा, प्रकर्षाने पुढे आली. क्रियेला-प्रतिक्रिया म्हणून धर्मसुधारणा चळवळी, जहाल नेते यांनी हिंदू प्रतिकांचा वापर करून हिंदू राष्ट्रवाद जनमानसात रुजविण्यास सुरुवात केली. याचा जसा चांगला परिणाम झाला

तसा पुढील काळात वाईट परिणाम झाला. तो म्हणजे जमातवादी राजकारणाला तोंड फुटले. समाजामध्ये जातीय तेढ निर्माण झाली. जमातवादी भूमिकेतून राष्ट्राची विभागणी झाली असे त्याचे दुष्परिणामही आहेत.

## ३.३ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

**१. पुनरुत्थान** : पुनरुत्थान म्हणजे जुन्या गोष्टींना विचारांना, संस्कृतीला उजाळा देणे व त्याप्रमाणे जुन्या किंवा मागील विचारांचा प्रतिके वापरून वर्तमानातील चळवळी करणे.

**२. नेमस्त** : नेमस्त किंवा नेमस्तवादी म्हणजे मवाळ विचारधारेचे नेते, लोक ज्यांचा ठराव, शिष्टमंडळ, सभा, भाषणे या विधायक व अहिंसक मार्गावर विश्वास होता.

**३. राष्ट्रवाद** : अस्तित्वात असलेल्या किंवा अस्तित्वात येण्याची क्षमता असणाऱ्या राष्ट्राची स्वायत्तता, ऐक्य, अस्मिता यांच्या संपादनाकरिता किंवा ते टिकविण्याकरिता जी तात्त्विक चळवळ असते तिला राष्ट्रवाद म्हणतात.

## ३.४ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. १९०५ (अ) २. मवाळ (क) ३. लो. टिळक (ब)
४. दादाभाई नौरोजी (अ) ५. १८६७ (क)

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ साली झाली.

२. अर्ज-विनंत्या-शिष्टमंडळे हे मवाळ विचारधारेचे वैशिष्ट्य होय.

३. आर्थिक राष्ट्रवादाचे दोन आधार आहेत.

४. १८८५ ते १९०५ हा मवाळवादी विचारधारेचा कालखंड होय.

५. नेमस्तवादी शब्दप्रयोग मवाळ नेत्यांना वापरला जातो.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**(अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. १८८५ ते १९०५ हा कालखंड मवाळ कालखंड म्हणून ओळखला जातो.

२. १९२० ते १९४७ या काळाला गांधीयुग म्हणून संबोधले जाते.

३. १९१९ च्या कायद्यान्वये भारतमंत्र्याचा पगार इंग्लंडच्या तिजोरीतून द्यावा हे मान्य झाले.

४. दिनेश वाच्छा हे मवाळवादी नेते होते.

५. लो. टिळकांनी १९०५ नंतर जहाल विचारांचा स्वीकार केला.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. मवाळांचा आर्थिक राष्ट्रवाद स्पष्ट करा.

२. मवाळांच्या विचारधारेची वैशिष्ट्ये सांगा.

३. मवाळ किंवा नेमस्तांच्या आर्थिक राष्ट्रवादीची समीक्षा करा.

४. १८८५ ते १९०५ या काळातील मवाळांचे कार्य स्पष्ट करा.

५. हिंदू पुनरुत्थानवाद म्हणजे काय सांगून राष्ट्रीय चळवळीतील त्याचे योगदान स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. डॉ. सुधाकर देशमुख, राष्ट्र आणि राष्ट्रवाद, संकल्पना आणि विकास, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००९.

२. डॉ. सुमन वैद्य, शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहस, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४.

३. बिपिनचंद्र, भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००३.

४. डॉ. राऊत शिंदे, थोरात, आधुनिक भारताचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१४.

५. आचार्य श. द. जावडेकर, आधुनिक भारत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९९४.

६. डॉ. काकडे अकलूजकर, आधुनिक भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर २००५.

७. गायकवाड, थोरात - भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, १९९७.

८. डॉ. शिंदे, थोरात, आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, २०११.


✡✡✡

## घटक – ४

# भारतीय राष्ट्रवादाचा उदय

# जहालमतवादी

### (अ) जहालमतवाद / जहाल तत्त्वज्ञान

### (ब) जहालवादी गटाचे उद्देश आणि कार्यपद्धती

### (क) जहालांच्या कार्याचे महत्त्व आणि मूल्यमापन


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ जहालमतवाद किंवा जहाल तत्त्वज्ञान

    ४.२.२ जहालवादी गटाचे उद्देश आणि कार्यपद्धती

    ४.२.३ जहालमतवादांच्या कार्याचे महत्त्व आणि मूल्यमापन

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तक


### ४.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला

- राष्ट्रीय चळवळीतील जहालमतवादाच्या उदयाची कारणे समजतील.
- भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील जहालमतवादी युगाची माहिती होईल.
- जहालांची विचारसरणी किंवा तत्त्वज्ञान कोणती ते लक्षात येईल.


- जहालांचे उद्देश व कार्यपद्धती कोणती ते लक्षात येईल.
- जहाल मतवादी चळवळीचे महत्त्व व कार्य कळून येईल.

## ४.१ प्रस्तावना

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस स्थापन झाल्यापासून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ झाला, हे खरे असले तरी ज्या संथ गतीने चळवळ चालू होती, त्यातून भरीव काही निर्माण होण्याची शक्यता कमी होत चालली होती. कॉंग्रेसमधील नेमस्त (Moderates) नेत्यांनी ब्रिटीश सरकारकडे अर्ज-विनत्या करीत सनदशीर मार्गाने आपल्या मागण्या सरकारपुढे मांडल्या. पण सरकार त्यांच्या विनंती-अर्जाची दखल घेत नव्हते, मागण्या पूर्ण केल्या जात नव्हत्या. सरकारकडून कॉंग्रेसच्या मागण्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने कॉंग्रेसच्या सदस्यांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण होऊ लागले. त्यामुळे काही उत्साही व तरुण कार्यकर्त्यांच्या मनामध्ये कॉंग्रेसच्या नेतृत्वाविषयी अविश्वासाची भावना निर्माण होऊ लागली होती. अनेक तरुण सदस्य कॉंग्रेसच्या अधिवेशनताच कॉंग्रेसच्या ध्येय-धोरणावर टीका करू लागले होते. अश्विनीकुमार दत्त यांनी 'कॉंग्रेसचे अधिवेशन म्हणजे केवळ तमाशा' आहे असे कॉंग्रेसच्या धोरणाबद्दल उद्वीग्नतेचे उद्‌गार काढले व कॉंग्रेसमध्ये सामान्य जनतेला सहभागी करून घेण्याची सूचना केली. कॉंग्रेसची संघटना ही राष्ट्रकार्याचे प्रभावी माध्यम बनावयाची असेल तर ती मूठभर आंग्ल शिक्षित उच्च-मध्यम वर्गियांपुरती मर्यादित ठेवून चालणार नाही, तर सर्वसामान्य जनतेला यात सहभागी करून घेऊन ती खऱ्या अर्थाने राष्ट्रीय संघटना बनवली पाहिजे तरच तिचे दडपण सरकारवर येईल आणि या दडपणाखालीच भारतीयांना काही अधिकार मिळवून घेता येईल, अशी या तरुणांची धारणा होती. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. भारताबाबत ब्रिटीश नीती ही शोषक साम्राज्यवादाची असल्याने याचकवृत्तीने त्यांच्याकडे मागून काहीच मिळणार नाही तर त्यासाठी निःशस्त्र प्रतिकार चळवळ सुरू करून सरकारवर दबाब आणावा, अशा विचारांचा तरुणांचा एक गट १९व्या शतकाच्या अखेरीला कॉंग्रेसमध्ये निर्माण झाला. त्याचा परिपाक म्हणजे भारतामध्ये जहालवादाचा उदय झाला व पुढे तो वेगाने फोफावत राहिला. इ.स. १९०५ ते १९२० हा कालखंड कॉंग्रेसच्या इतिहासातील 'जहालमतवादी कालखंड' म्हणून ओळखला जातो. जहालवादी विचारांचे प्रतिनिधित्व लोकमान्य टिळक, लाल लजपतराय, अरविंद घोष, बिपीनचंद्र पाल इ. नेत्यानी केले. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचे बोट धरून त्यांच्या कलाने भारताची प्रगती करू इच्छिणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांच्या गटाला 'मवाळ' (Moderates) तर भारताच्या प्रगतीसाठी स्वावलंबनाचा, आत्मनिर्भरतेचा व जनजागृतीचा मार्ग पुरस्कृत करणाऱ्या राष्ट्रवादी गटाला 'जहाल' (Extremists) म्हटले जाऊ लागले.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ जहालमतवादाच्या उदयाची कारणे




- **ब्रिटीश सत्तेच्या खऱ्या रूपाची जाणीव**

प्रारंभीच्या काँग्रेस नेत्यांनी लिहिलेल्या अभ्यासपूर्ण लेखांनी व माहितीमुळे भारतातील ब्रिटीश सत्तेचे खरे स्वरूप समोर येण्यास मदत झाली. भारताच्या दारिद्र्याचे मूळ कारण इंग्रजांची सत्ता व त्यांचे धोरण आहे, हे त्यांनी आकडेवारीने सिद्ध करून दाखविले. दादाभाई नौरोजी, न्या. रानडे व रमेशचंद्र दत्त यांनी विविध पुस्तके लिहून ब्रिटीश सत्तेचे शोषक रूप स्पष्ट केले. आनंद चारलू, आर. एन. मुधोळकर, दिनशा वाच्छा, गोपाळ कृष्ण गोखले, मदन मोहन मालवीय इत्यादी राष्ट्रीय नेत्यांनी ब्रिटीश साम्राज्यवादाचा पर्दाफाश केला. त्यामुळे जहालवादाला पोषक वातावरण निर्माण झाले.

- **नैसर्गिक आपत्तीकडे सरकारचे दुर्लक्ष**

१९व्या शतकाच्या शेवटी हिंदी जनतेला भयंकर दुष्काळ व रोगराई या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. इ.स. १८९६-९७ साली देशात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळाचा फटका दोन कोटी लोकांना बसला व हजारो लोक भूकबळी झाले. ब्रिटीश सरकारला जनतेबद्दल फारशी सहानुभूती नसल्याने दुष्काळ निवारणासाठी सरकारने कोणतीही उपाययोजना केली नाही. त्याचवेळी महाराष्ट्रात विशेषतः पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला. सरकारने प्लेग निवारणाच्या नावाखाली लोकांच्या धार्मिक भावना दुखावतील अशीच कृत्ये केली. लोकांच्यावर अत्याचार केले. त्याची परिणती म्हणजेच चाफेकर बंधूनी प्लेग कमिशनर मि. रँड व त्याचा सहकारी लेफ्टनंट आयर्स्ट याचा खून केला. चाफेकर बंधूना फाशी देण्यात आली तर त्यांना लोकमान्य टिळकांनी

प्रेरणा दिली असा त्यांच्यावर आरोप ठेवून त्यांना दीड वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा देण्यात आली. त्यामुळे तरुण वर्ग संतप्त झाला ही परिस्थिती जहालमतवादाच्या उदयास पोषक ठरली.

- **सरकारचे जुलमी आर्थिक धोरण**

जास्तीत जास्त फायदा मिळविणे हा ब्रिटीश साम्राज्यवादाचा पाया होता. ब्रिटिशांनी नीती-अनितीचा अजिबात विचार न करता भारताची सर्व मार्गांनी अखंडपणे आर्थिक पिळवणूक केली. हा अन्याय आणि विदारक परिस्थिती दादाभाई नौरोजी यांनी सखोल अभ्यास करून साधार सिद्ध केली. त्यांनी आपल्या 'ड्रेन थेअरी' (आर्थिक निःसारणाचा सिद्धांत) या सिद्धांतातून दाखवून दिले की, ब्रिटीश या देशातून तरसाल तीन कोटी पौंड एवढी रक्कम मायदेशी घेऊन जात आहेत. गझनीच्या महंमदाने अठरा स्वाऱ्यातून केलेल्या लुटीपेक्षा ही एक वर्षाची लूट मोठी असून कित्येक वर्षे सतत ही लूट चालू आहे. दादाभाईप्रमाणेच सोमेशचंद्र दत्त, न्या. रानडे, दिनशा वाच्छा या विचारवंतानी ब्रिटीश भारताची कशाप्रकारे आर्थिक पिळवणूक करत आहे, हे आकडेवारीनुसार सिद्ध केले. सरकारच्या या पिळवणुकीच्या धोरणाला प्रत्युत्तर म्हणून हिंदी लोकांनी स्वदेशी मालाचा पुरस्कार करावा व परदेशी मालावर बहिष्कार घालावा, अशी जहाल विचारसरणी भारतामध्ये निर्माण झाली.

- **१८९२ च्या कायद्याने केलेली निराशा**

१८९२ साली ब्रिटीश सरकारने भारतीयांना सुधारणा देणारा कायदा पास केला. त्यानुसार केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळातील बिन सरकारी हिंदी सदस्यांच्या संख्येत वाढ केली व त्यांना काही हक्कही बहाल केले असले तरी हिंदी लोकांना मिळालेल्या सवलती व हक्क अगदी निराशा करणारे होते. दोन्ही ठिकाणच्या कायदेमंडळात सरकारी सभासदांचेच बहुमत होते व जे काही हिंदी सभासद होते अल्पमतात असल्याने त्यांनी केलेल्या विरोधाचा सरकारच्या धोरणावर व कृत्यांवर काहीही परिणाम होत नव्हता. बंगालच्या कायदेमंडळात सुरेंद्रनाथ बॅनर्जी तर मुंबईच्या कायदेमंडळात फिरोजशहा मेहता हे हिंदी सदस्य होते. अर्थात तेही अप्रत्यक्ष निवडणूक पद्धतीने कायदेमंडळात गेले होते. म्हणजे ते प्रत्यक्ष जनतेचे प्रतिनिधी नव्हते. तरीही ते सदस्य जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडत होते. पण अनियंत्रित व सार्वभौम सरकारवर त्याचा परिणाम होत नव्हता. ही सर्व परिस्थिती व अनुभव पाहता हिंदी जनतेतील असंतोष वाढत गेला.

- **सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी**

हिंदू धर्म व समाज सुधारणा करण्याच्या उद्देशाने १९व्या शतकात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी झाल्या. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, थिऑसॉफीकल सोसायटी इत्यादी संघटनांनी धर्मसुधारणेबरोबर जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. या कार्यामुळे भारतीयांना भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची जाणीव झाली. त्यांच्यात स्वाभिमान निर्माण झाला. त्यांची अस्मिता जागृत झाली. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, डॉ. ॲनी बेझंट यांनी भारतातील समाजसुधारणा चळवळीचे नेतृत्व केले. या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींनी १९व्या शतकात देशात जहालमतवादाचा पाया घातला.

● **ब्रिटिशांचा पक्षपातीपणा**

ब्रिटीश राज्यकर्ते सर्वच क्षेत्रात भारतीयांना पक्षपाती वागणूक देत असत. ब्रिटीश राजवटीत मुलकी व लष्करी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गोऱ्या लोकांची भरती होत असे. हिंदी लोकांना कनिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या दिल्या जात असत. त्याशिवाय भारतातील चहाचे व कॉफीचे मळे, अनेक उद्योग गोऱ्यांच्या हाती होते. तिथे काम करणाऱ्या हिंदी मजुरांना अमानुष वागणूक दिली जात असे. न्यायपालिकेत न्यायाधिश हे गोरे लोक असल्याने न्यायदानात उघडउघड पक्षपात केला जाई. आपला धर्म व संस्कृती श्रेष्ठ असून भारतीय धर्म व संस्कृती केवळ कनिष्ठच नव्हे तर रानटी आहे, असे गोऱ्या लोकांना वाटत असे.

अशाच प्रकारची वागणूक आफ्रिकेत स्थायिक झालेल्या हिंदी लोकांना देण्यात येत होती. १९व्या शतकात हजारो हिंदी लोक मजुरी व व्यापारासाठी दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश वसाहतीमध्ये स्थायिक झाले होते. घरे बांधणे, मुलांना चांगल्या शाळेत घालणे, पहिल्या वर्गातून रेल्वे प्रवास न करणे इत्यादी यासंबंधी भारतीय लोकांच्यावर अनेक बंधने घालण्यात आली होती. इंग्रजांच्या या पक्षपाती व वर्णविद्वेषी वागणुकीमुळे भारतीयांमध्ये जहालवाद वाढत गेला.

● **आंतरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव**

या काळात घडलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय घटनांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर परिणाम होत होता. इ.स. १८९१ साली ॲबसिनिया या आफ्रिकन राष्ट्राने इटली या युरोपियन राष्ट्राचा युद्धामध्ये पराभव केला. इ.स. १९०५ साली जपान या आशियाई राष्ट्राने रशिया या युरोपियन राष्ट्राचा पराभव केला. या दोन घटनांमुळे आफ्रिकन व आशियाई राष्ट्रे युरोपियनांचा पराभव करू शकतात तर भारतीय इंग्रजांना पराभूत का करू शकत नाहीत अशी भावना भारतीय राष्ट्रीय नेत्यांमध्ये निर्माण झाली. इजिप्त, इराण, तुर्कस्थान येथील राष्ट्रवादी चळवळीमुळे भारतीयांच्या मनात नव्या आशा-आकांक्षा निर्माण झाल्या. इटलीतील नेते मॅझिनी, गॅरिबाल्डी आणि काहूर यांनी इटालियन जनतेत राष्ट्रवादी भावना निर्माण केली आणि इटली या स्वतंत्र नवराष्ट्राचा उदय झाला. या घटनांचा परिणाम होऊन भारतीय जहालवादाकडे झुकले.

● **लॉर्ड कर्झनची दडपशाही**

भारतातील जहालमतवादाच्या उदयाला ब्रिटिश राज्यकर्त्यांची अन्यायी व दडपशाही धोरणे मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरली. लॉर्ड कर्झनच्या इ.स. १८९८ ते १९०५ या काळात दडपशाहीचा कळस झाला. लॉर्ड कर्झन हा पक्का साम्राज्यवादी विचारसरणीचा राज्यकर्ता होता. त्याने १८९९ या कलकत्ता कार्पोरेशन ॲक्ट, वृत्तपत्रांवर निर्बंध घालणारा कायदा, १९०४ चा विद्यापीठ कायदा इत्यादी कायदे करून भारतीयांची गळचेपी केली. लॉर्ड कर्झन भारतीय संस्कृती व विद्वानांना तुच्छ लेखत असे. तो भारताला राष्ट्र मानावयास तयार नव्हता. भारतीयांच्या चळवळीला तो 'हवेचे बुडबुडे' (Letting of gas) म्हणत असे. ब्रिटीश लोक हे वंशाने व संस्कृतीने श्रेष्ठ असून दुसऱ्यावर सत्ता गाजविण्यासाठीच पृथ्वीवर जन्माला आले आहे. भारतीय लोक इंग्रजांची बरोबरी कधीच करू शकत नाहीत, अशी तो वल्गना करीत असे. कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान

समारंभप्रसंगी लॉर्ड कर्झनने हिंदी संस्कृतीची निंदानालस्ती केली होती. कर्झनच्या या जुलमी धोरणामुळे जनतेतील असंतोष वाढत गेला आणि जहालमतवादाला अनुकूल वातावरण तयार झाले.

- **बंगालची फाळणी**

बंगालचा फाळणीने भारतीय जहालमतवादास फार मोठी चालना मिळाली. फाळणीमुळे हिंदी राष्ट्रवादाने जहाल व आक्रमक स्वरूप धारण केले. लॉर्ड कर्झनचा सर्वात मोठा दडपशाहीचा निर्णय होता. बंगाली जनतेचा व काँग्रेसचा विरोध असूनही कर्झनने १९०५ साली बंगलाची फाळणी केली. भारतीय जनमताला आमच्या दृष्टीने काहीच महत्त्व नाही हे या घटनेतून कर्झनने व इंग्लंड सरकारने दाखवून दिले. बंगालचे विभाजन म्हणजे हिंदू-मुसलमानांमध्ये मतभेद निर्माण करण्यासाठी धार्मिक आधारावर केले गेलेले कुटील कारस्थान होते. कर्झनच्या या कृत्यामुळे सर्व भारतीयांमध्ये संतापाची लाट उसळली. सुरेंद्रनाथ बॅनर्जी जनतेची प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणतात, ''बंगालच्या विभाजनाची घोषण आमच्यावर बॉम्बगोळ्याप्रमाणे कोसळली. बंगालची फाळणी म्हणजे आमच्या अस्मितेला हेतुपुरस्सर सरकारने धक्का दिला.'' यावरून हे सिद्ध झाले की मवाळांच्या मार्गाचा ब्रिटिशांवर काहीही परिणाम होत नव्हता. या फाळणीमुळे भारतीयांतील असंतोष पराकोटीला पोहोचला. त्यामुळे जहालमतवादाचा उदय होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

- **लाल-बाल-पाल यांचे नेतृत्व**

वरील विविध कारणांमुळे जहालवादास पोषक वातावरण देशामध्ये निर्माण झाले होते. अशा वातावरणाचा अचूक लाभ घेत स्वातंत्र्य चळवळीला योग्य वळण देण्याचे काम लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष या जहाल नेत्यांनी केले. जहालमतवादाचे प्रचारक म्हणून 'लाल-बाल-पाल' ही त्रिमूर्ती इतिहासप्रसिद्ध झाली असली तरी जहालवादाला आध्यात्मिक बैठक देऊन त्यांचे उदात्तीकरण करण्याचे मौलिक कार्य मात्र प्रामुख्याने अरविंद घोष यांनी केले. अर्ज-विनंत्या करून राजकीय हक्क मिळू शकणार नाहीत, त्यासाठी मातृभूमीवरील प्रेमाने, निर्भयपणे आणि निःस्वार्थीपणे क्रांतिकारी चळवळी हाती घेतल्या पाहिजेत. त्यासाठी वाट्टेल तो त्याग सोसण्याची व कष्ट उपसण्याची हिंदी समाजाने तयारी केली पाहिजे, ही शिकवण जहाल नेत्यांनी हिंदी समाजाला दिली.

### ४.२.१ जहालमतवाद किंवा जहाल तत्त्वज्ञान
(Ideological Basis of Extremism)

भारतातील ब्रिटीश सत्ता ही ईश्वरी संकेतानुसार निर्माण झाली आहे. इंग्रज लोक उदारमतवादी, सुसंस्कृत आणि लोकशाहीवादी नागरीक आहेत. तेव्हा आपण आपली पात्रता सिद्ध केल्यास आपणासही लोकशाही हक्क व शासनपद्धती देतील असे विचार आणि विश्वास मवाळवाद्यांचा होता. म्हणून इंग्रज राज्यकर्त्यांशी संघर्ष नको, विरोधाऐवजी सहकार्य करून त्यांची मर्जी राखावी आणि हक्क मागावते, असे त्यांना वाटे. परंतु मवाळांचा हा मार्ग आणि तत्त्वज्ञान जहालमतवाद्यांना मान्य नव्हते. जहालमतवाद्यांचे तत्त्वज्ञान काही मूलभूत विचारांवर आधारलेले होते. ब्रिटिशांच्या उदारमतवादावरील निष्ठा अनाठायी आहे, कोणतीही साम्राज्यवादी सत्ता ही

**जहालमतवादी कालखंड**

(टिळक युग)

↓

(इ.स. १९०५ ते १९२०)

↓

प्रमुख नेते

| लाल | बाल | पाल |
|---|---|---|
| लाला लजपतराय | बाळ गंगाधर टिळक | बिपीनचंद्र पाल |
| (पंजाब) | (महाराष्ट्र) | (बंगाल) |

↓

जहालमतवादी कार्यपद्धती

(टिळकांची चतुःसूत्री)

| स्वराज्य | स्वदेशी | बहिष्कार | राष्ट्रीय शिक्षण |
|---|---|---|---|

कल्याणकारी असू शकत नाही. शोषण हेच साम्राज्यशाहीचे मूलभूत सूत्र असते आणि हे शोषण राजकीय सुधारणांनी नव्हे तर स्वराज्य मिळाल्याने थांबेल अशी जहाल नेत्यांची ठाम समजूत होती. तसेच देशातील स्वातंत्र्याची चळवळ अधिक परिणामकारक व्हायची असेल तर त्यात बहुजन समाज सामील होणे अतिशय आवश्यक आहे. मूठभर लोकांच्या नव्हे तर केवळ जनतेच्या चळवळीचेच दडपण सरकारवर येऊ शकेल आणि तसेच दडपण आल्याशिवाय ब्रिटीश राज्यकर्ते भारतीयांना कोणतेही राजकीय हक्क किंवा सुधारणा देणार नाहीत असे जहालांचे मत होते. म्हणून वार्षिक अधिवेशने, चर्चासत्रे, अर्जविनंत्या हे मार्ग सोडून देऊन लोकजागृती, लोकसंग्रह व लोकसंघटना यांचे महत्त्व ते मांडत होते. लोकमान्य टिळक 'राष्ट्रीय सभेच्या कामाची दिशा' या लेखात म्हणतात, ''हक्कांसाठी रडून किंवा भीक मागून काही उपयोग नाही. त्यााठी सरकारला अडवले पाहिजे. शक्य तेवढा उद्योग केला पाहिजे.'' पंजाबचे जहालवादी नेते लाला लजपतराय म्हणतात, ''हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नात इंग्रज मंडळींचा फारसा उपयोग होणार नाही. आपले स्वातंत्र्य आपणच लढा देऊन मिळविले पाहिजे.

स्वातंत्र्याचा लढा अधिक तीव्र करायचा असेल तर त्यात बहुजनसमाज मोठ्या प्रमाणात सहभागी झाला पाहिजे आणि तो सहभागी व्हायचा असेल तर त्यांच्यात प्रखर राष्ट्राभिमान जागृत करणे गरजेचे आहे. जनतेचा राष्ट्राभिमान जागृत करण्यासाठी भारताच्या इतिहासातील महान व्यक्तींना स्फूर्तिस्थाने बनवून भारतीयांची अस्मिता जागृत केली पाहिजे, तरच भारतीय जनता स्वातंत्र्यलढयासाठी सज्ज होईल, असे जहालवाद्यांचे मत

होते. लोकजागृतीसाठी इंग्रजी भाषेचा वापर न करता मातृभाषेचाच वापर केला पाहिजे. पाश्चात्त्य शिक्षण–व्यवस्थेवर भर न देता राष्ट्रीयत्वाची भावना रुजविणारा अभ्यासक्रम शैक्षणिक संस्थांमधून शिकविला पाहिजे. त्यासाठी भारतीयांनी स्वतःच्या शिक्षणसंस्था निर्माण केल्या पाहिजेत, असे जहालांना वाटत होते. तसेच भारतीय समाजावर धर्माचा पगडा असल्यामुळे राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यासाठी धार्मिक निष्ठांचा पुरेपूर वापर करून घेतला पाहिजे, असे त्यांचे मत होते आणि म्हणूनच भारत ही आपली मायभूमी असून तिला गुलामीच्या शृंखलेतून मुक्त करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे अशी जहालमतवाद्यांची विचारसरणी होती. स्वराज्य हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते, ते मिळविण्यासाठी सनदशीर मार्गांचा अवलंब केला पाहिजे असे त्यांना वाटत होते. परंतु त्यांची सनदशीर मार्गाची व्याख्या मवाळांपेक्षा वेगळी होती. जनतेला कायद्याने दिलेले अधिकार, राजसत्तेनी दिलेली आश्वासने व ब्रिटीश पार्लमेंटने देऊ केलेल्या सवलती याची माहिती जनतेला करून देणे व या सवलतींना व अधिकारांना भारत सरकार मूर्त स्वरूप देत नाही हे जनतेच्या निदर्शनास आणून देणे, त्यांना आवश्यक वाटत होते. स्वतःच्या हक्कासाठी संघटितरित्या लढण्यास व आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा नेटाने प्रतिकार करण्यास त्यांना प्रवृत्त करणे त्यांना गरजेचे वाटत होते. मात्र हा प्रतिकार सक्रिय असला तर कायदेशीर व सनदशीर असला पाहिजे असे त्यांचे मत होते. या राष्ट्रकार्यासाठी निःस्वार्थीपणे व निर्भीडपणे कोणतेही कष्ट सोसण्याची तयारी जनतेने ठेवली पाहिजे असे जहाल नेत्यांचे मत होते. जहाल नेत्यांनी केवळ विचारच मांडले नाहीत तर आपल्या कृतीने देशापुढे एक आदर्श निर्माण केला होता आणि म्हणूनच त्यांच्या विचारसरणीचा जनमानसांवर मोठा प्रभाव पडला व जहाल नेत्यांना प्रचंड लोकमान्यता व लोकप्रियता मिळाली.

जहालमतवाद्यांचे तत्त्वज्ञान व कार्यक्रम कसा असेल, याचे उत्कृष्ठ विवेचन कलकत्त्याचे अधिवेशन झाल्यावर भरलेल्या एका जाहीर सभेतील लोकमान्य टिळकांनी केलेल्या भाषणातून स्पष्ट होते. ते म्हणतात, – ''जहाल हा शब्द प्रगतिसूचक आहे. प्रत्येक नवा पक्ष जहाल म्हणून जन्माला येतो आणि मवाळ म्हणून अंत पावतो. कोणतीही राजकीय शिष्टाई करताना तुमची मागणी फेटाळली गेली तर लढण्याची तुमची तयारी किंवा योजना हवी तशी असेल तर मागणी फेटाळली जात नाही आणि नसेल तर कदाचित कायमची फेटाळली जाईल याची खात्री बाळगा. नियंत्रणाची सर्व सत्ता आमच्या हाती आली पाहिजे. माझ्या घराची किल्ली माझ्या ताब्यात हवी. स्वराज्य हे आमचे आहे. आमच्या राज्यकारभाराचा ताबा आम्हास हवा आहे. हे सरकार जे आमच्यावर राज्य करते ते आपल्या अंगच्या बळाने करीत नसून या वस्तुस्थितीसंबंधी आम्हास अज्ञानात ठेवून करीत आहे. स्वतंत्र होण्याची तुमची इच्छा असेल तर तुम्ही स्वतंत्र होऊ शकाल, नसेल तर तुमचा अधःपात होईल आणि त्या स्थितीत तुम्ही कायम राहाल. बहिष्कार हे राजकीय शस्त्र आहे. सारा वसुलीस व शांतता रक्षणास आम्ही त्यास सहकार्य करणार नाही. न्यायदानाचे कार्य करण्यास आम्ही मदत करणार नाही. आम्ही आमचे कोर्ट स्थापन करू आणि वेळ आल्यावर करही देणार नाही. संघटित प्रयत्नांनी तुम्हाला हे करता येईल. त्यांना अर्धी भाकरी दिली ती घेऊन उरलेली मिळविण्याचा मी प्रयत्न करीन.''

लोकमान्य टिळकांच्या या भाषणातून जहालवाद्यांच्या तत्त्वज्ञानाचे खरे स्वरूप स्पष्ट होते. सशस्त्र क्रांती शक्य नसल्याने निःशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. सरकारचे नाक दाबल्याशिवाय तोंड

उघडणार नाही. उग्र चळवळी करून व बहिष्काराचे हत्यार चालवून इंग्रजी सत्तेला नमवता येईल, हेच त्यांच्या विवेचनाचे सार आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न : १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'कॉंग्रेसचे अधिवेशन म्हणजे केवळ तमाशा आहे' हे विधान ........... यांचे आहे.

(अ) लोकमान्य टिळक (ब) लाला लजपतराय (क) अश्विनीकुमार दत्त (ड) महात्मा गांधी

२. इ.स. १९०५ ते १९२० या काळाला ............ कालखंड म्हणून ओळखला जातो.

(अ) मवाळ (ब) जहालमतवादी (क) गांधीयुग (ड) राष्ट्रवादी

३. ब्रिटीश सरकारने प्लेग कमिशनर म्हणून ......... याची निवड केली.

(अ) मि. आर्यस्ट (ब) मि. रँड (क) लॉर्ड कर्झन (ड) मि. बेली.

४. आर्थिक निःसारणाचा सिद्धांत ........... यांनी मांडला.

(अ) दादाभाई नौरोजी (ब) लोकमान्य टिळक (क) अरविंद घोष (ड) न्या. म. गो. रानडे

५. इ. स. १९०५ साली .............. या राष्ट्राने रशियाचा पराभव केला.

(अ) चीन (ब) इंग्लंड (क) भारत (ड) जपान

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'भारतीय चळवळ म्हणजे हवेचे बुडबुडे आहेत' हे असे कोणी म्हटले आहे ?

२. जहालमतवादाला आध्यात्मिक बैठक कुणी दिली ?

३. प्लेग कमिशनर मि. रँड याचा खून कोणी केला ?

४. भारतात सर्वात भीषण दुष्काळ किती साली पडला होता ?

५. बंगाल फाळणीविरोधात कोणते आंदोलन झाले ?

### ४.२.२ जहालवादी गटाचे उद्देश आणि कार्यपद्धती

लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय आणि अरविंद घोष कॉंग्रेसमध्ये नव्याने उदयास आलेल्या जहालमतवादी गटाचे नेतृत्व करीत होते. या नेत्यांनी जहालवादाची व्याख्या केली, त्यांच्या इच्छा-आकांक्षांचे स्पष्टीकरण केले व कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले. लोकमान्य टिळकांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच.'' अशी घोषणा केली. स्वराज्य मिळविणे हे स्वातंत्र्य चळवळीचे अंतिम उद्दिष्ट म्हणून जहालवाद्यांनी स्वीकारले. जहालमतवादी नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीच्या अंतिम

उद्दिष्टाबाबत कोणतीही संदिग्धता ठेवली नव्हती. जहालवाद्यांची स्वराज्याची मागणी म्हणजे 'परकीय नियंत्रणातून कारभार चालविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होय.' मवाळ नेत्यांनी वसाहतीच्या स्वराज्याची मागणी केली होती, तर जहाल नेत्यांनी 'संपूर्ण स्वराज्य' हे आपले अंतिम ध्येय ठरविले होते. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीने एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रवेश केला होता. जहालमतवादी चळवळीने आणखी दोन उद्दिष्टे आपल्यासमोर ठेवली होती. एक म्हणजे काँग्रेसच्या धोरणाला व कार्यपद्धतीला नवी दिशा देणे आणि दुसरे उद्दिष्ट म्हणजे जनतेत राजकीय जागृती निर्माण करून त्यांना कार्यप्रवण बनविणे. जहाल नेत्यांनी जनतेच्या मनात स्वातंत्र्याची व त्याच्या प्राप्तीसाठी वाट्टेल तो त्याग करण्याची प्रखर भावना निर्माण केली. ब्रिटीश सरकारच्या अमर्यादित शक्तीची भिती जनतेच्या मनातून काढून त्यांच्यात आत्मविश्वास जागविण्याचा प्रयत्न जहाल नेत्यांनी केला. जहाल नेते बिपीनचंद्र पाल यांनी जहालमतवाद्यांच्या धोरणाचे वर्णन नेमक्या शब्दात केले आहे, ते असे – ''भारतीय लोक साधे असल्याने त्यांनी शासकवर्गाच्या शब्दांवर विश्वास ठेवला. आपला कारभार सांभाळण्यास भारतीय पात्र नाहीत असे त्यांना सांगण्यात आले. सरकार शक्तिशाली असून त्यापुढे जनता दुर्बल आहे असे बिंबवण्यात आले. भारत मानवतेच्या खालच्या स्तरावर असून या जंगली लोकांना सुसंस्कृत बनविण्यासाठीच इंग्रज भारतात आले. ह्या सर्व मायाजलाचा, कपटनीतीचा बुरखा फाडण्याचे कार्य जहालांनी केले. परिणामी, जनता जागी झाली. तिचा ब्रिटिश सत्तेबद्दल भ्रमनिरास झाला. आपल्या शक्तीची जाणीव होऊन स्वसंस्कृतीविषयी विश्वासाची भावना उत्पन्न झाली.

**❖ जहालांची कार्यपद्धती**

लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली जहालमतवादाचा उदय झाला. केवळ अर्ज, विनंत्या करून इंग्रज सरकार सुधारणा देणार नाही. त्यासाठी आक्रमक स्वरूपाची पण निःशस्त्र क्रांतिकारक मार्गाची आवश्यकता टिळकांनी सांगितली. त्यादृष्टीने ते आपल्या मतांचा आपल्या 'केसरी' वृत्तपत्रातून, भाषणातून आणि प्रत्यक्ष जनसंपर्कातून ते प्रचार करीत होते. त्याची आवश्यकता व महत्त्व पटवून देत होते. जनजागृती करीत होते. टिळकांनी चार मार्गांचा जहालमतवाद सांगितला. ती त्यांची चतुःसुत्री होय. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ही चार सूत्रे होती. जहाल नेत्यांनी या सूत्रांचा प्रभावीपणे प्रचार केला आणि प्रत्यक्षात राबविली. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळ विकसित व्हायला मदत झाली. स्वराज्य हे राष्ट्रीय चळवळीचे अंतिम ध्येय मानण्यात आले होते, तर स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण हे स्वराज्यप्राप्तीचे मार्ग ठरविण्यात आलेले होते.

**१. स्वदेशी** : स्वदेशी म्हणजे भारतीय लोकांनी आपल्या देशात तयार झालेल्या वस्तूंचा वापर करावा. यासाठी सुरू केलेली स्वदेशी चळवळ होय. टिळकांनी फार व्यापक दृष्टीकोनातून स्वदेशीचा आग्रह धरला. एक राजकीय चळवळ म्हणून त्यांनी स्वदेशीकडे पाहिले. बंगालच्या फाळणीनंतर स्वदेशी चळवळीला खरा जोर आला. बंगालच्या फाळणीमुळे संपूर्ण देशभर ब्रिटिशांच्या विरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यामुळे वंगभंग आंदोलन लोकप्रिय झाले. स्वदेशी आणि बहिष्कार यामुळे हे आंदोलन अत्यंत तीव्र बनले. त्यामुळे बंगालमधील ब्रिटिश मालाची विक्री एकदम घसरली आणि त्यामुळे अस्वस्थ झालेल्या ब्रिटीश कारखानदारांनी बंगालची फाळणी रद्द करावी, अशी सरकारला विनंती केली. सर्वांनी स्वदेशीच्या वस्तू वापरायच्या, स्वदेशी मालाच्या उत्पादनाला व विक्रीला प्रोत्साहन द्यावयाचे असे स्वदेशी चळवळीचे स्वरूप होते. देशभर या

चळवळीला मोठा प्रतिसाद मिळाला. स्वदेशी चळवळीमुळे देशी उद्योगधंद्यांना, ग्रामोद्योगांना चालना मिळाली. देशभर स्वदेशी कापड गिरण्या, नित्य उपयोगाच्या वस्तू उत्पादनाचे कारखाने सुरू झाले.

**२. बहिष्कार** : बहिष्कार म्हणजे परकीय वस्तूंचा वापर टाळणे आणि अर्थातच स्वदेशी वस्तूंचाच वापर करणे होय. पण एवढ्यावरच न थांबता आपला निषेध अधिक स्पष्ट व तीव्रतेने व्यक्त करण्यासाठी, सरकारच्या निदर्शनास आणून देण्यासाठी देशभर विलायती कपड्यांची होळी करण्यात येऊ लागली. पुण्यामध्ये विलायती कपड्यांची मोठी होळी केली गेली. 'स्वदेशी प्रचारिणी सभा' या संस्थेचे प्रमुख टिळक यांनी एक सहकारी भांडार सुरू केले. माफक दरात धोतरे पुरविण्याची त्यांनी मुंबईतील गिरणीमालकांना विनंती केली. त्यांनी पुण्यामध्ये एक कंपनीही सुरू केली. प्रारंभी बहिष्काराचा मार्ग ब्रिटीश कपड्यापुरता मर्यादित होता, पण अल्पावधीतच त्याची व्याप्ती वाढून दारू, साखर, कागद, औषधे, रसायने, सिगारेट, खेळणी इत्यादी सर्वच ब्रिटीश मालावर बहिष्कार सुरू झाला. लाला लजपतराय हे जहाल नेते पंजाबमध्ये असल्याने तिथे बहिष्कार चळवळ जोमात होती. रावळपिंडीतील व्यापाऱ्यांनी विलायती साखरेची खरेदी-विक्री बंद केली. ही चळवळ देशभर पसरली. समाजातील सर्व थरातील लोक यात सहभागी झाले. परकीय मालाच्या दुकानांपुढे निदर्शने व निरोधने होऊ लागली. बिपिनचंद्रांनी बहिष्काराचा व्याख्या आणखी व्यापक करून शासनावर बहिष्कार घालण्याचे व सरकारशी असहकार करण्याचे आवाहन जनतेला केले.

**३. राष्ट्रीय शिक्षण** : लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचाही चतुःसूत्री कार्यक्रमात समावेश केला होता. मुलांना राष्ट्रप्रेम, स्वधर्म व संस्कृती यांचे माहात्म्य सांगणारे राष्ट्रीय शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. अशा राष्ट्रीय शिक्षणातून देशासाठी कसलाही त्याग करण्यास सिद्ध असणारी राष्ट्रप्रेमी पिढी तयार होईल, असे त्यांचे मत होते. तेव्हा सामाजिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय शिक्षण संस्था सुरू करून येथील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण द्यावे असे आवाहन केले. त्यानुसार संपूर्ण देशात राष्ट्रीय शिक्षण चळवळ सुरू झाली. 'डॉन' या इंग्रजी पत्राचे संपादक सतिशचंद्र मुखर्जी यांनी १८९८ साली राष्ट्रीय शिक्षणाची योजना तयार केली. रविंद्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतनची स्थापना करून राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग आखून दिला. १९०६ साली बंगालमध्ये 'बंगाल' राष्ट्रीय कॉलेज स्थापन झाले. या कॉलेजच्या अभ्यासक्रमात विज्ञान व तंत्रज्ञानाला महत्त्व दिले गेले. पुण्यामध्ये चिपळूणकर, आगरकर व लोकमान्य टिळक यांनी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रारंभ केला होता. बंगालमध्ये सुरेंद्रनाथांनी अनेक शैक्षणिक संस्था सुरू केल्या. पंजाबमध्ये आर्य समाजाने या कार्याला सुरुवात केली होती. या शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावनेची बीजे वाढवू शकेल असा अभ्यासक्रम तयार करण्यात आला. तसेच तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणही सुरू करण्यात आले. वंगभंग चळवळीत सहभागी असणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले तेव्हा या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तीन वर्षांत बंगालमध्ये तीनशे प्राथमिक व पंचवीस माध्यमिक शाळा सुरू झाल्या.

**४. स्वराज्य** : स्वराज्य म्हणजे आपले राज्य प्रजेच्या प्रतिनिधीमार्फत चालविले जाणारे राज्य. असे स्वराय मिळविणे हे स्वातंत्र्य चळवळीचे अंतिम ध्येय म्हणून टिळकांनी हे एक सूत्र सांगितले. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असा टिळकांचा ठाम निर्धार होता. स्वदेशी बहिष्कार व

राष्ट्रीय शिक्षण या साधनांचा अवलंब करून स्वराज्याची प्राप्ती करावयाची, अशी त्यांची योजना होती. टिळकांच्या मते, 'नैतिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अनुकूल परिस्थिती फक्त स्वराज्यातच असते. स्वराज्य हे धार्मिक व नैतिकदृष्ट्या आवश्यक आहे. इंग्रजांना इंग्लंडमध्ये जे हक्क मिळतात ते हक्क भारतीयांना भारतात मिळाले पाहिजेत. हिंदुस्थानचे सरकार हे हिंदी लोकांचेच असले पाहिजे व भारतीयांची प्रगती केवळ स्वराज्यातच होऊ शकते.

लोकमान्य टिळकांनी सांगितलेली ही चतुःसुत्री पुढे स्वातंत्र्य चळवळीची मार्गदर्शक तत्त्वे बनली. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत दिर्घकाळ चालविल्या गेलेल्या या चळवळीत सतत या तत्त्वांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे वापर केलेला दिसतो. टिळकांच्यानंतर राष्ट्रीय सभेची सूत्रे महात्मा गांधीकडे गेली. त्यांनीसुद्धा आपल्या चळवळीत स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या तत्त्वांचा वापर केलेला होता.

**५. बंगाल फाळणीची घटना** : आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये 'बंगालची फाळणी' या घटनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या घटनेनंतर राष्ट्रीय सभेचे नेतृत्व जहालमतवादी गटाकडे गेले व व राष्ट्रीय सभेत त्या गटाचे वर्चस्व निर्माण झाले. स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व जहाल नेत्यांकडे गेले. यास बंगालची फाळणी हा घटक कारणीभूत होता. त्यावेळच्या बंगाल प्रांतात बंगाल, बिहार, ओरिसा, छोटा नागपूर या प्रदेशांचा समावेश होता. त्याची लोकसंख्या आठ कोटी होती. या प्रांताच्या विशालतेमुळे राज्यकारभारात अनेक अडचणी येत होत्या. राज्यकारभाराच्या सुलभतेसाठी बंगालच्या विभाजनाची योजना पुढे आली. परंतु अशा प्रकारच्या फाळणीला काँग्रेस व बंगाली जनतेने प्रखर विरोध दर्शविला. जनतेच्या विरोधाला न जुमानता गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन याने ७ जुलै, १९०५ रोजी सिमला येथून बंगाल फाळणीची घोषणा केली.

बंगाल प्रांताची पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल अशी विभागणी करण्यात आली. चित्तगांव, डाक्का, राजेशाही हे विभाग, माल्डा जिल्हा व आसाम यांचा समावेश पूर्व बंगालमध्ये करण्यात आला. या नवीन प्रांताचे क्षेत्रफळ १,०६,५४० चौ. मैल असून लोकसंख्या ३ कोटी १० लाख होती. त्यातील १ कोटी ८० लाख मुस्लिम होते तर पश्चिम बंगालमध्ये बंगालचा पश्चिम भाग, छोटा नागपूर, संबळपूर, ओरिसामधील पाच संस्थाने या प्रदेशाचा समावेश करण्यात आला. याप्रमाणे बंगालची फाळणी करण्यात आली.

**वंगभंग आंदोलन**

या फाळणीमुळे ब्रिटीश सरकारविरुद्ध भारतीय जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. फाळणीमागे राष्ट्रीय चळवळीचे खच्चीकरण करणे व हिंदू-मुस्लीम यांच्यातील ऐक्य संपुष्टात आणणे हा ब्रिटिशांचा डाव जनतेच्या लक्षात आला. त्यामुळे बंगाली नेत्यांनी काँग्रेसच्या आदेशाची वाट न पाहता वंगभंग आंदोलन सुरू केले. फाळणीविरोधी लढा फाळणी रद्द होईपर्यंत चालवायचा या निर्धारानेच या लढ्याला प्रारंभ करण्यात आला. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी या लढ्याचे नेतृत्व स्वीकारले. या लढ्याला बंगाली जनतेने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. लोकमान्य टिळकांनी या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा व्यक्त केला. त्यांच्या चतुःसूत्रीचे प्रात्यक्षिक बंगालमध्ये मोठ्या उत्साहाने सुरू झाले. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या तत्त्वांचा संदेश

खेड्यापर्यंत पोहोचवला गेला. संपूर्ण बंगालमध्ये स्वदेशी व बहिष्काराचे आंदोलन जोरात सुरू झाले. सर्वत्र परदेशी मालाच्या होळ्या करण्यात येऊ लागल्या. ठिकठिकाणी परदेशी मालाविरुद्ध निदर्शने सुरू झाली. पुढे बंगालमधील व्यापारी व जमिनदार वर्गही यामध्ये सहभागी झाला. हळूहळू बंगालमधील आंदोलनाची व्याप्ती वाढली. जहालमतवादी नेत्यांनी ही चळवळ आपापल्या प्रांतामध्ये सुरू केली. लोकमान्य टिळकांनी संपूर्ण महाराष्ट्रभर हे आंदोलन नेऊन पोहोचविले. बंगालची फाळणी रद्द होणे ही फक्त बंगालचीच गरज नसून ती राष्ट्रीय गरज आहे, हे टिळकांनी भारतीयांना पटवून दिले. टिळकांप्रमाणेच लाला लजपतराय यांनी हे आंदोलन संपूर्ण पंजाबमध्ये सुरू केले.

संपूर्ण देशाने या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात साथ दिली. वर्तमानपत्रांनीही यास पाठिंबा देऊन तिचा देशभर प्रचार केला. शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने यात सहभागी झाले. इतकेच नाहीतर मुस्लीमही या आंदोलनात सामील झाले. त्यामुळे या आंदोलनाची तीव्रता वाढत गेली. ब्रिटिश सरकारने विविध मार्गांचा वापर करून हे आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पण ते दडपले गेले नाही. शेवटी या आंदोलनापुढे ब्रिटीश सरकारला नमते घ्यावे लागले व १२ डिसेंबर, १९११ रोजी दिल्ली या ठिकाणच्या दरबारामध्ये ब्रिटीश सम्राट पंचम जॉर्ज याने बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा हा पहिला दैदिप्यमान विजय होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न : २**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'इंग्रज लोक उदारमतवादी आहेत' यावर........... यांचा विश्वास होता.

(अ) जहालमतवादी (ब) मवाळ गट (क) क्रांतिकारक (ड) गांधीवादी

२. लोकजागृतीसाठी ........... भाषेचाच वापर करावा, असे जहालांचे मत होते.

(अ) मराठी (ब) इंग्रजी (क) मातृभाषा (ड) बंगाली

३. लोकमान्य टिळकांनी लोकजागृतीसाठी ........... या वृत्तपत्राचा आधार घेतला.

(अ) केसरी (ब) वंदे मातरम (क) डॉन (ड) मिरर

४. ........... यांनी जहालांची चतुःसूत्री मांडली.

(अ) बिपीनचंद्र पाल (ब) लाला लजपतराय (क) लोकमान्य टिळक (ड) अरविंद घोष

५. .............. येथील व्यापाऱ्यांनी विलायती साखरेची खरेदी-विक्री बंद केली.

(अ) लाहोर (ब) काबूल (क) दिल्ली (ड) रावळपिंडी

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय चळवळीतील जहालांचे अंतिम उद्दिष्ट कोणते होते ?

२. ब्रिटिशांच्या उदारमतवादावरील निष्ठा अनाठायी आहे, असे कोणाला वाटत होते ?

३. लोकमान्य टिळकांची चार सूत्रे कोणती ?

४. 'डॉन' या इंग्रजी वृत्तपत्राचे संपादक कोण होते ?

५. किती साली बंगालमध्ये बंगाल कॉलेजची स्थापना झाली ?

### ४.२.३ जहालमतवाद्यांच्या कार्याचे महत्त्व आणि मूल्यमापन

काँग्रेसमधील मवाळ व जहाल गटांच्या कार्याचे मूल्यमापन आधुनिक भारताच्या इतिहासकारांनी आपापल्या विचारधारेनुसार केले आहे. काहींनी मवाळांच्या कार्याचे महत्त्व प्रतिपादन करून जहालांचा मार्ग त्याकाळी अव्यवहार्य होता, असे म्हटले आहे, तर काहींनी जहालांचा निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग हाच राष्ट्रीय चळवळ परिणामकारक बनविण्याचा योग्य मार्ग होता. हे दोन्ही विचार लक्षात घेता जहालांच्या कार्याचे मूल्यमापन तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात करणे आवश्यक आहे. शिवाय जहालवादाचे मूल्यमापन करताना एक गोष्ट विसरता कामा नये आणि ती म्हणजे जहालवाद एक सुसंघटित राजकीय तत्त्वज्ञान नव्हते. जहालांच्या समर्थकांमध्ये सामान्य जनतेपासून ते क्रांतिकारकापर्यंत अनेक सहभागी होते. दहशतवादाच्या विरोधात असणारे लोकही त्यात होते. एवढेच नव्हे तर जहाल नेते लोकमान्य टिळक, बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय, अरविंद घोष यांच्यात राजकीय आदर्श व कार्यपद्धतीबाबत भिन्नता होती. या नेत्यांचे विचारही कालानुरूप बदलत गेले आहेत. 'स्वराज्य' या संकल्पनेबाबत नेत्यांचे स्वतःचे असे दृष्टीकोण होते, 'स्वराज्य म्हणजे स्वयंशासन' असे टिळकांना वाटत होते. अरविंद घोष यांना 'स्वराज्य म्हणजे परकिय राजवटीपासून पूर्ण मुक्तता' असे वाटत होते. अरविंद घोष व काही सहकाऱ्यांना असे वाटत होते की, 'स्वातंत्र्य चळवळ सामान्य लोकांपर्यंत न्यावयाची असेल तर तिला सामाजिक जागृतीचे पाठबळ मिळाले पाहिजे. सामाजिक सुधारणांच्याबाबत टिळक प्रतिगामी विचारांचे होते. राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या लोकांकडूनच अशा प्रकारच्या सामाजिक सुधारणांची मागणी झाली पाहिजे, कोणत्याही परिस्थितीत परकीय राजवटीने समाजव्यवस्थेत हस्तक्षेप करू नये, असे त्यांचे मत असल्याने टिळकांनी मुलींच्या संमतीवयाच्या कायद्याला विरोध केला. टिळकांनी गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव, गोहत्या प्रतिबंध असे कार्यक्रम हाती घेतल्यामुळे टिळक 'हिंदू राष्ट्रीयत्वाचे पुढारी' म्हणून ओळखले जाऊ लागले. त्याचप्रमाणे बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय हे सुधारणांचे पुरस्कर्ते असले तरी हिंदू धर्मीयांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी हिंदुस्थान 'हिंदू राष्ट्र' असावे, या मागणीचे खंदे समर्थक होते. थोडक्यात, जहालवाद्यांमध्ये राजकीय व सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते, हिंदू राष्ट्राचे पुरस्कर्ते असा वैचारिक गोंधळ पहायला मिळतो.

## ❖ राष्ट्रसभेच्या धोरणात बदल

काँग्रेसच्या धोरणाला व कार्यपद्धतीला नवी दिशा देणे हे जहालवाद्यांचे एक मुख्य उद्दिष्ट होते. त्यासाठी त्यांनी लोकजागृती व लोकसंघटन ही राजकीय कार्याची त्रिसुत्री ठरविली होते. आपले हे उद्दिष्ट पूर्ण करण्यामध्ये जहाल नेते अत्यंत यशस्वी झाले. आतापर्यंत राष्ट्रसभा ही मवाळांच्या प्रभावाखाली होती. 'स्वराज्य' या मागणीला मवाळ नेते अनुकूल नव्हते. तीच मागणी जहालांनी राष्ट्रसभेच्या व्यासपीठावरून एकमुखाने केली. जनतेच्या या मागणीला मोठा पाठिंबा मिळतो आहे हे पाहून मवाळांनी स्वराज्याच्या मागणीला उचलून धरले. जहालवादी नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीला अधिक व्यापक स्वरूप दिले. त्यामुळे राष्ट्रसभेच्या इतिहासात नवे पर्व सुरू झाले.

## ❖ जनमानसात आदराचे स्थान

इ.स. १९०५ ते १९२० हा जहालमतवादी विचारांचा कालखंड मानला जातो. वास्तविक डिसेंबर, १९०७ मध्ये सुरत अधिवेशनावेळी मवाळ व जहाल यांच्यात संघर्ष झाल्यावर मवाळ नेत्यांनी लोकमान्य टिळक व जहाल नेत्यांची काँग्रेसमधून हकालपट्टी केली होती व काँग्रेसवर आपली पकड घट्ट केली होती. तरीही हा कालखंड 'जहालमतवादी कालखंड' म्हणून ओळखला जातो. कारण या काळात जहालमतवादी विचारांचा देशाच्या सर्व भागात प्रभाव होता. देशातील तरुण मंडळी जहाल विचारांनी भारावलेली होती. जहाल नेत्यांना जनमानसामध्ये मोठे आदराचे स्थान प्राप्त झाले होते.

## ❖ भारतीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला

जहालमतवादी चळवळीचे सर्वात मोठे कार्य म्हणजे तिने भारतीयांमध्ये नवी आत्मविश्वासाची, स्वशक्तीची भावना निर्माण केली. जहाल नेत्यांनी ब्रिटीश सत्तेचे खरे रूप जनतेसमोर मांडले. ब्रिटीश शासनामुळे देशावर होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव जनतेला करून देणे, जहालांना आवश्यक वाटत होते. म्हणून लोकजागृती, लोकसंग्रह व लोकसंघटन ही त्यांनी आपल्या राजकीय कार्याची त्रिसुत्री ठरविली होती. जहालांच्या या कार्यामुळे जनतेमध्ये ब्रिटीशांबद्दल असणारी भितीची भावना कमी झाली व लोक या राष्ट्रीय चळवळीत व्यापक प्रमाणात सहभागी होऊ लागले.

## ❖ भारतीय संघर्षासाठी सज्ज झाले

जहाल नेत्यांच्या कार्यामुळे भारतीय जनता ब्रिटिशांविरोधातील संघर्षासाठी सज्ज झाली. राजकीय हक्क मागून मिळत नसतात, त्यासाठी संघर्षच करावा लागतो. म्हणून जनतेने आत्मनिर्भर राहून स्वराज्याच्या प्राप्तीसाठी निर्णायक संघर्ष करण्यास सिद्ध झाले पाहिजे, अशी जहालांची विचारसरणी होती. भारतीय समाजातील वाढत्या असंतोषाला कृतिशील बनविण्याचे व शब्दांना कृतीची जोड देण्याचे कार्य जहाल गटाने केले. जहाल नेत्यांनी स्वतःच्या उदाहरणाने राष्ट्रकार्य हेच जीवनाचे साध्य मानून त्यासाठी कोणताही त्याग करण्याचा आदर्श जनतेला घालून दिला. हे पाहून जनताही संघर्षासाठी सज्ज झाली.

### ❖ राष्ट्रीय चळवळीसाठी जनआंदोलनात रूपांतर

जहाल नेत्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी राष्ट्रीय चळवळ सर्वसामान्य लोकांपर्यंत नेऊन पोहोचविली. जहाल नेत्यांचा जनतेच्या सामर्थ्यावर विश्वास होता. राष्ट्रीय चळवळीमध्ये सामान्य जनता सहभागी झाल्या–शिवाय तिची ताकत वाढणार नाही आणि सरकारही तिची दखल घेणार नाही, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच राष्ट्रीय चळवळीला अधिक व्यापक सामाजिक आधार मिळावा यासाठी अथक प्रयत्न केले. वृत्तपत्रे काढून त्यांनी राष्ट्रीय चळवळीचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविला. त्यामुळेच राष्ट्रीय चळवळीला जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले.

### ❖ स्वदेशी उद्योगधंद्याचा विस्तार

स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य हा जहालांचा कार्यक्रम होता. विदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशी चळवळीमुळे भारतीय उद्योगधंद्यांचा विस्तार झाला व भारतीयांना काम करण्याची व नोकरी करण्याची संधी मिळाली. या चळवळीने ग्रामोद्योग व कित्येक मोठ्या उद्योगधंद्यांना चालना मिळाली. अनेक ठिकाणी स्वदेशी कापड गिरण्या, आगपेट्या व साबणाचे कारखाने उभे राहिले. जमशेदपूर येथील 'टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनी'चे सर्व भांडवल भारतीयांनी तीन महिन्यात उभे केले. मोठ्या व्यापाऱ्यांनी व जमीनदारांनी राजकीय नेत्यांशी सहकार्य करून बँका, विमा कंपन्या तसेच जहाज वाहतूक कंपन्यासुद्धा सुरू केल्या.

### ❖ बंगालची फाळणी रद्द

गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झनने राष्ट्रीय चळवळीला शह देण्यासाठी १९०५ साली बंगालची फाळणी केली. या विरोधात जहाल नेत्यांनी वंगभंग आंदोलन सुरू केले. अल्पावधीत हे आंदोलन संपूर्ण देशभर पसरले. सरकारविरोधात स्वदेशी व बहिष्काराचे शस्त्र वापरण्यास सुरुवात झाली. सरकारने हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला पण ते न दडपता अधिक तीव्र बनत गेले. शेवटी १२ डिसेंबर, १९११ रोजी दिल्ली येथे दरबार भरवून ब्रिटीश सम्राट पंचम जॉर्ज यांनी बंगालची फाळणी रद्द झाल्याची घोषणा केली. जहाल नेत्यांच्या उग्र आंदोलनाचा हा परिणाम होता. भारतीय राष्ट्रीय चळवळीला मिळालेला हा पहिला मोठा विजय होता.

### ❖ माँटेग्यूची घोषणा

हिंदुस्थानाला स्वराय देणे हे आमच्या राजवटीचे अंतिम उद्दिष्ट आहे, ही जी घोषणा ऑगस्ट १९१७ मध्ये भारतमंत्री माँटेग्यू यांने केली. ती काही सहजासहजी केली नाही. आंतरराष्ट्रीय दडपण व भारतातील जहाल चळवळीने निर्माण केलेला असंतोष व जागृती याचा तो परिणाम होता.

### ❖ राष्ट्रीय चळवळीने 'स्वराज्य' हेच अंतिम ध्येय मानले

स्वराज्य मिळविणे हे स्वातंत्र्य चळवळीचे अंतिम ध्येय म्हणून लोकमान्य टिळकांनी हे एक सूत्र सांगितले आणि त्यांनी घोषणा केली की, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला. पुढे राष्ट्रीय चळवळीने 'स्वराज्य' हेच आपले अंतिम ध्येय मानले. गांधीयुगात

राष्ट्रीय चळवळीला संघटित स्वरूप प्राप्त झाले असले तरी त्याची पार्श्वभूमी जहालमतवादी चळवळीने तयार केली होती.

**स्वयं अध्ययन प्रश्न : ३**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. सामाजिक सुधारणांबाबत लोकमान्य टिळक ........... विचारांचे होते.

(अ) पुरोगामी (ब) प्रतिगामी (क) सनातनी (ड) आधुनिक

२. 'स्वराज्य म्हणजे परकीय राजवटीपासून पूर्ण मुक्तता' असे ........... यांना वाटत होते.

(अ) लोकमान्य टिळक (ब) बिपीनचंद्र पाल (क) लाला लजपतराय (ड) अरविंद घोष

३. 'हिंदू राष्ट्रीयत्वाचे पुढारी' म्हणून ........... यांना ओळखले जाते.

(अ) राजाराम मोहन रॉय (ब) स्वामी दयानंद सरस्वती

(क) लोकमान्य टिळक (ड) स्वातंत्र्यवीर सावरकर

४. ........... अधिवेशनाची मवाळांनी जहाल नेत्यांची काँग्रेसमधून हकालपट्टी केली.

(अ) कलकत्ता (ब) मुंबई (क) मद्रास (ड) सुरत

५. ........... यांनी बंगालची फाळणी रद्द झाल्याची घोषणा केली.

(अ) सम्राट पंचम जॉर्ज (ब) लॉर्ड कर्झन (क) लॉर्ड माँटेग्यू (ड) राणी व्हिक्टोरिया

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'ऑगस्ट घोषणा' लॉर्ड माँटेग्यू याने किती साली केली ?

२. 'टाटा आयर्न अॅन्ड स्टील कंपनी' कोठे स्थापन झाली ?

३. जहालांच्या राजकीय कार्याची त्रिसूत्री कोणती होती ?

४. लोकमान्य टिळकांनी कोणते उत्सव सुरू केले ?

५. मुलींच्या संमती वयाच्या कायद्याला कोणी विरोध केला ?

## ४.३ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

**१. मवाळ** : राष्ट्रीय चळवळीत संवैधानिक व शांततेच्या मार्गाचा पुरस्कार करणारा आणि राजपदाप्रती निष्ठा असलेला राष्ट्रीय सभेतील एक गट, नेमस्त

**२. जहाल** : राष्ट्रीय चळवळीत आंदोलनाच्या मार्गाचा पुरस्कार करणारा राष्ट्रीय सभेतील एक गट.

**३. चतु:सूत्री** : जहालवादाने राष्ट्रीय आंदोलनासाठी वापरलेले स्वराज, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे चार मार्ग.

**४. लोकमान्य** : सर्वसामान्य जनतेने बाळ गंगाधर टिळक यांना दिलेली पदवी.

**५. पर्व** : एक नवीन अध्याय.

## ४.४ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

### स्वयंअध्ययन प्रश्न – १

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. (क) अश्विनीकुमार दत्त　२. (ब) जहालमतवादी　३. (ब) मि. रॅंड

४. (अ) दादाभाई नौरोजी　५. (ड) जपान

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. लॉर्ड कर्झन　२. अरविंद घोष　३. चाफेकर बंधू

४. सन १८९६-९७　५. वंगभंग आंदोलन

### स्वयंअध्ययन प्रश्न – २

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. (ब) मवाळ　२. (क) मातृभाषा　३. (अ) केसरी

४. (क) लोकमान्य टिळक　५. (ड) रावळपिंडी

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. स्वराज्य　२. जहालमतवादी

३. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण　४. सतिशचंद्र मुखर्जी

५. इ.स.१९०६

### स्वयंअध्ययन प्रश्न – ३

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. (ब) प्रतिगामी　२. (ड) अरविंद घोष　३. (क) लोकमान्य टिळक

४. (ड) सुरत　५. (अ)सम्राट पंचम जॉर्ज

### (ब) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. इ. स. १९१७

२. जमशेदपूर

३. लोकजागृती, लोकसंघटन व लोकसंग्रह

४. गणेशोत्सव व शिवजयंती

५. लोकमान्य टिळक

## ४.५ सारांश

भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर प्रारंभी नेमस्त विचारसरणीचा प्रभाव होता. उदारमतवादाने प्रभावीत झालेल्या नेमस्त नेत्यांनी सनदशीर व शांततापूर्ण मार्गाने राजकीय अधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु ब्रिटीश सरकारकडून नेमस्त नेत्यांच्या मागण्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने तरुण मंडळी अस्वस्थ बनली. नेमस्त मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळू शकत नाही, याबद्दल त्यांची खात्री बनली. अशातच दुष्काळ, प्लेग इत्यादी वेळी सरकारचे दुर्लक्ष, कर्झनची दडपशाही, बंगालची फाळणी, १८९२ च्या कायद्याने केलेली निराशा यामुळे १९व्या शतकाच्या शेवटच्या दशकात जहालमतवादाचा उदय झाला.

लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपीनचंद्र पाल, अरविंद घोष हे जहाल गटाचे पुढारी होते. या नेत्यांनी भारतीय जनतेतील देशाभिमान जागृत करून तिला आंदोलनाचा मंत्र दिला. हा मार्ग नेमस्तांना पसंत नसल्याने साहजिकच नेमस्त व जहाल यांच्यात मतभेद निर्माण झाले. अशा परिस्थितीत लॉर्ड कर्झन याने १९०५ साली बंगालची केली. हिंदू-मुसलमानांत फूट पाडून राष्ट्रीय चळवळ कमजोर करण्याचा डाव यामागे होता. परिणामी, बंगालमध्ये वंग-भंग आंदोलन सुरू झाले. कालांतराने हे आंदोलन देशभर पसरले. यामुळे जहालमतवादाला पोषक वातावरण निर्माण झाले. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री दिली. जहाल नेत्यांनी या सूत्रांचा प्रभावीपणे प्रचार केला आणि प्रत्यक्षात राबविली. या नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीला अधिक व्यापक स्वरूप दिले. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीला जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी जनतेला लढाऊ राष्ट्रवाद सांगितला. त्यासाठी जहाल नेत्यांना स्वकीयांकडून अपमान तर ब्रिटीश सरकारकडून तुरुंगवास सोसावा लागला. परंतु त्यांनी आपले ध्येय सोडले नाही. अशाप्रकारे राष्ट्रीय आंदोलनामध्ये जहालमतवादी गटाचा उदय, त्यांचे तत्त्वज्ञान व कार्यपद्धतीची माहिती आपण या घटकात अभ्यासली आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश

१. जहालमतवादाच्या उदयाची कारणे सांगा.

२. राष्ट्रीय आंदोलनातील जहालांच्या कार्याची चर्चा करा.

३. जहालवादी गटाचे उद्देश्य व कार्यपद्धतीची चर्चा करा.

४. बंगालच्या फाळणीचा वृत्तांत द्या.

५. जहालमतवादांच्या कार्याचे मूल्यमापन करा.

**(ब) लघुत्तरी प्रश्न (टिपा लिहा)**

| | |
|---|---|
| १. स्वदेशी | ४. स्वराज्य |
| २. बहिष्कार | ५. जहालांची चतुःसूत्री |
| ३. राष्ट्रीय शिक्षण | ६. जहालांचे तत्त्वज्ञान |

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. वैद्य, डॉ. सुमन, कोठेकर, डॉ. शांता, आधुनिक भारताचा इतिहास, २०१५.

२. देव, डॉ. प्रभाकर, आधुनिक भारत, विद्याभारती प्रकाशन, लातूर १९९८.

३. ग्रोवर, बी. एल. अनु. बेल्हेकर, डॉ. एन. के. आधुनिक भारताचा इतिहास, एक नवीन मूल्यांकन, एच. चंद एण्ड कंपनी, लि. २००३.

४. कदम, प्राचार्य य. ना., समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, २००३.

५. जावडेकर, आचार्य, आधुनिक भारत.

६. आठल्ये, डॉ. विभाग, आधुनिक भारताचा इतिहास, अंशुल पब्लिकेशन, नागपूर.

७. के. सागर, आधुनिक भारताचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन, पुणे, १९९४.


✡✡✡